मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

मुंबई/ पालघर | बुधवार, २३ ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - १२३ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

Email : vrittamanas1@gmail. com

## “21 वेळा भारत माँ की जय”चा नारा देत फैझल निसारचे पापक्षालन

**भोपाळ :** भारतात पाकिस्तानच्या बाजूने नारे देणाऱ्या फैझल निसारचे पापक्षालन झाले आहे. त्याला 21 वेळा 'भारतमाता की जय' म्हणायला लावून आणि भारताच्या झेंड्याला सलाम करायला लावण्यात आला आहे. त्याने 21 वेळा 'भारतमाता की जय'चा नारा दिला आणि भारताच्या राष्ट्रध्वजाला सलाम केला. भोपाळ पोलिसांनी या वर्षी मे महिन्यात एका आरोपीला अटक करून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला. हा आरोपी जाहीरपणे “पाकिस्तान जिंदाबाद, हिंदुस्तान मुर्दाबाद” अशा घोषणा देत असल्याचा आरोप होता. फैझलला न्यायालयाने अट घातली की, त्यानं महिन्यातून दोन वेळा स्थानिक पोलीस स्थानकात हजेरी लावायची. यावेळी त्यानं पोलीस स्थानकाच्या वर फडकत असलेल्या तिरंग्याला 21 वेळा सॅल्युट करायचा आहे.



विश्वास प्रस्थापित करायला वेळ लागेल...


पान 8

# ‘महाविकास’चा ठरला फॉर्म्युला 105-95-80

## राज्यात काँग्रेस तर मुंबईत ठाकरे सेना मोठा भाऊ

**प्रतिनिधी**
**मुंबई**

महाविकास आघाडीतील तणाव अखेर बऱ्यापैकी निवळला आहे. काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरेंची भेट घेतल्यानंतर महाविकास आघाडीतील जागावाटपाचा फॉर्म्युला जवळपास निश्चित झाला आहे. त्यामध्ये, मुंबईतील बहुतांश जागांवर शिवसेनेचे उमेदवार असणार आहेत. महाविकास आघाडीच्या ठरलेल्या फॉर्म्युल्यानुसार काँग्रेस-103 ते 108 जागांवर निवडणूक लढेल. तर, शिवसेना ठाकरे गटाला 90 ते 95 जागा देण्यात येणार आहेत. महाविकास आघाडीत (MVA) तिसऱ्या नंबरचं स्थान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीला 80 ते 85 जागा देण्यात येणार असून मित्रपक्षांसाठीही जागा सोडण्यात येत आहेत. महाविकास आघाडीतील मित्र पक्षांसाठी 3 ते 6 जागा सोडण्यात आल्याचे समजते.



काँग्रेस नेते बाळासाहेब थोरातांची शिष्टाई फळाला आली असून महाविकास आघाडीत मुंबई आणि विदर्भावरुन सुरू असलेला वाद अखेर निवळला आहे. बाळासाहेब थोरांत यांच्या मध्यस्थीनंतर ठाकरे आणि काँग्रेसनं सामंजस्याची भूमिका घेतली आहे. त्यानुसार, महाविकास आघाडीतील मुंबईच्या जागा वाटपाचा फॉर्म्युला जवळपास निश्चित झाला असून मुंबईत ठाकरेंची शिवेसनाच मोठा भाऊ आहे. मुंबईत महाविकास आघाडीत सर्वाधिक जागा ठाकरे गट लढवणार असून शिवसेना ठाकरे युबीटी पक्षाला 18 जागा देण्यात येत आहेत. तर, काँग्रेस 14 जागांवर निवडणूक लढेल. (त्यापैकी 11 जागांवर शिक्कामोर्तब तर 2 जागांवर चर्चा सुरू आहे). शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला (शरद पवार गट) मुंबईत केवळ 2 जागा मिळणार आहेत. (अणुशक्ती नगर आणि घाटकोपर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता). तर, समाजवादी पार्टी- 1 (शिवाजी नगर) आणि आम आदमी पक्ष 1 जागा सुटणार असल्याचा मुंबईतील फॉर्म्युला निश्चित झाल्याचे समजते. दरम्यान, मुंबईतील वर्सोवा, भायखळा आणि वांद्रे पुर्व या तीन जागांवर ठाकरे गट आणि कांग्रेसमध्ये आज तोडगा निघणार आहे.

दरम्यान, महाविकास आघाडीचे जागावाटप करताना मविआच्या मित्रपक्षांचाही विचार करण्यात आला आहे. या सर्व जागांचे वाटप झाल्यानंतर समाजवादी पक्षाला सामावून घेण्यासंदर्भात निर्णय झाल्याची माहिती आहे. आज दुपारी मविआच्या नेत्यांची यशवंतराव चव्हाण सेंटरला बैठक पार पडली. त्यानंतर ठाकरे सेना, शरद पवार गट आणि काँग्रेसकडून उमेदवारांची यादी जाहीर होण्याची शक्यता आहे. लवकरच महाविकास आघाडीच्या उमेदवारांची यादी जाहीर होईल.

## उद्धव ठाकरेंचे काँग्रेससमोरचे लोटांगण दुर्दैवी

**प्रतिनिधी**
**मुंबई**

राज्यात विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर सत्ताधारी पक्षाकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरू आहे. यातच भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी महाविकास आघाडीवर टीकेची तोफ डागली. मविआ मुळातच अनैसर्गिक असल्याने असल्याने विदर्भातील जागावाटपावरून सुरू असलेल्या वादात उद्धव ठाकरे यांना कॉंग्रेस लोटांगण घालायला लावत असल्याचा दावा बावनकुळेंनी केला आहे.



बावनकुळे म्हणाले, भाजप-शिवसेना युतीमध्ये आम्ही मातोश्रीलाच मान द्यायचो. शिवसेनाप्रमुख हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितले होते की, ज्या दिवशी शिवसेनाला कॉग्रेसकडे जावे लागेल त्या दिवशी पक्ष बंद करेन. असे सांगताना याकरिता सर्वस्वी उद्धव ठाकरे हेच जबाबदार असून कॉग्रेस कधीही उद्धव ठाकरे यांना स्वीकारणार नाही व सहन करणार नाही. तर महायुती ही नैसर्गिक युती असून सर्वच उमेदवार सक्षम आहेत, जागावाटप होत असताना काही उमेदवार जात असतील तर काहीच समस्या नाही.

मी आणि देवेंद्र फडणवीस एकाच दिवशी अर्ज दाखल करणार आहोत. महायुतीमध्ये शिंदे नाराज असल्याच्या बातम्या कपोलकल्पित असल्याचे सांगत साकोलीमधून भाजपाचा उमेदवार लढणार असून जागावाटपात केवळ 8 ते 10 जागांवरच चर्चा व्हायची आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## बंडखोरी टाळण्यासाठी महायुतीचा ‘धोनी पॅटर्न’

**प्रतिनिधी**
**मुंबई**

भाजपने पहिली यादी जाहीर करताच अनेक मतदारसंघांतून बंडखोरीच्या बातम्या येऊ लागल्या आहेत. काही ठिकाणी भाजपमधील इच्छुक नाराज आहेत, तर काही ठिकाणी राष्ट्रवादीतील इच्छुकांचा हिरमोड झालेला आहे. त्यामुळे आता भाजप दुसरी यादी उशिरा प्रसिद्ध करण्याच्या विचारात आहे. भाजपचे मित्रपक्ष शिंदे सेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या उमेदवार याद्याही उशिरा येऊ शकतात.

महेंद्रसिंह धोनीकडे भारतीय संघाची धुरा असताना त्यानं एक





विशिष्ट पॅटर्न राबवला. सामना शेवटपर्यंत घेऊन जायचा. आधी हाराकिरी करायची नाही. अखेरच्या षटकात प्रतिस्पर्ध्यांवर दबाव आणून सामना निकाली काढायचा, हा धोनीचा पॅटर्न बराच गाजला. थंड डोक्याच्या धोनीने याच फॉर्म्युल्याच्या जोरावर टी-20 वर्ल्डकप, चॅम्पियन्स ट्रॉफीचे अंतिम सामने अखेरच्या षटकात जिंकले. आता तोच पॅटर्न वापरण्याची तयारी महायुतीने केल्याचे दिसत आहे.

महायुतीच्या उमेदवारांची यादी 28 ऑक्टोबरपर्यंत येऊ शकते. अर्ज भरण्याची अखेरची तारीख 29 ऑक्टोबर आहे. त्यामुळे एक दिवस बाकी असताना उमेदवारी यादी जाहीर करण्याची खेळी महायुतीकडून केली जाऊ शकते. त्यामुळे बंडखोरी काही प्रमाणात टाळता येईल, असं महायुतीमधील वरिष्ठांना वाटतं. आताच उमेदवार यादी जाहीर केल्यास नाराज नेते, इच्छुक महाविकास आघाडीच्या गळाला अलगद लागतील, अशी भीती महायुतीला आहे.

अर्ज भरण्यास एक दिवस असताना याद्या जाहीर झाल्यास होणारी बंडखोरी कमी असेल, असं महायुतीच्या नेत्यांना वाटतं. उमेदवारी देण्यास विलंब केल्यास तिकीट न मिळालेले अपक्ष लढतील. पण नाराज नेते मविआच्या गळाला कमी लागतील. कारण तोपर्यंत मविआचे उमेदवार जाहीर झालेले असतील, असा महायुतीच्या वरिष्ठांचा कयास आहे.

## भाजपने दिलेला शब्द पाळला नाही

### शरद पवारांचा हात पकडताना नाईकांचा भाजपवर आरोप

**प्रतिनिधी**
**नवी मुंबई**

2019 मध्ये भाजपमध्ये प्रवेश केल्यावर जो शब्द देण्यात आला होता तो पाळला गेला नाही, असा गंभीर आरोप संदीप नाईक यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करताना केला. जनतेला नको असलेला उमेदवार थोपवला. पक्षादेश मानून आम्ही या उमेदवाराचे काम करून बहुमताने निवडून आणले. परंतु, बेलापूरच्या आमदाराने दहा वर्षे कार्यकर्त्यांचा अपमान केला. त्यांच्या स्वाभिमानाला ठेच पोहोचवली. बेलापूर शहराच्या विकासाचा बट्ट्याबोळ केला. पक्षाने 2019 मध्ये आणि 2024 मध्ये शब्द पाळला नाही. वारंवार आपली कोंडी करण्याचे काम केले. एक वेळ आमचा अपमान सहन करू, परंतु कार्यकर्त्यांचा सन्मान आणि स्वाभिमानाला ठेच पोहचू देणार नाही, असे नाईक यांनी स्पष्ट केले. कार्यकर्त्यांच्या सन्मानाची आणि शहराच्या विकासाची ही लढाई असून आपण ती लढू आणि जिंकू, असा विश्वास संदीप नाईक यांनी यावेळी व्यक्त केला. आपली लढाई बेलापूरच्या सन्मानाची लढाई



आहे. कार्यकर्त्यांच्या स्वाभिमानाची आणि शहराच्या विकासाची लढाई असल्याचे संदीप नाईक म्हणाले.

भाजपचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी मंगळवारी हातातील कमळ जमिनीवर ठेवत हातात तुतारी घेतली. वाशीमधील विष्णुदास भावे नाट्यगृहामध्ये झालेल्या निर्धार मेळाव्यामध्ये हजारो कार्यकर्त्यांनी संदीप नाईक यांनी बेलापूर मतदारसंघातून विधानसभेची निवडणूक लढवावी, असा प्रचंड आग्रह धरला. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत त्यांनी पक्षप्रवेश केला. बेलापूर मतदारसंघातील सर्व प्रभागातील कार्यकर्त्यांनी या निर्धार मेळाव्याचे आयोजन केले होते. यावेळी संदीप नाईक यांनी ही बेलापूरच्या सन्मानाची लढाई असल्याचे म्हटले. कार्यकर्त्याच्या स्वाभिमानाची आणि शहराच्या विकासाची लढाई असल्याचे ते आवर्जून म्हणाले. शरद पवार यांनी नवी मुंबई शहराचे हित नेहमीच जपले असून प्रकल्पग्रस्तांचे नेते दि. बा. पाटील यांनी आग्रह धरलेल्या प्रकल्पग्रस्त बांधवांसाठी साडेबारा टक्क्याची योजना असो, माथाडी कामगारांसाठी घरांची योजना असो किंवा महापालिका मुख्यालयासाठी नाममात्र दराने भूखंड उपलब्ध करणे असो, हे सर्व शरद पवार यांच्यामुळे शक्य झाल्याचे संदीप यांनी सांगितले.

## सेबी प्रमुख माधबी पुरी-बुच यांना क्लिनचीट; कोणतीही कारवाई नाही

**प्रतिनिधी**
**मुंबई**



सेबीच्या अध्यक्षा माधबी पुरी-बुच यांना क्लिनचीट देण्यात आली आहे. त्यामुळे आता त्यांच्यावर कोणतिही कारवाई होणार नसून उर्वरीत चार महिन्यांचा कार्यकाळ त्या पूर्ण करणार आहेत. तपास यंत्रणा आणि अर्थ मंत्रालयाने त्यांची चौकशी पूर्ण केली असून त्यात काहीही आक्षेपार्ह आढळले नाही किंवा बूच यांच्यवरील आरोप सिद्ध करणारे कोणतेही पुराने नाहीत. त्यामुळे त्यांना क्लीनचिट देण्यात आली आहे.

बूच आपल्या पदाचा गैरवापर करत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करत असल्याचे आरोप करण्यात आले होते. या आरोपानंतर त्यांची चौकशी करण्यात आली. त्यात त्यांच्याविरोधात कोणतेही पुरावे आढळले नाहीत. त्यामुळे त्यांना क्लिनचीट मिळाली असून त्यांना दिलासा मिळाला आहे. आता त्या त्यांचा उर्वरित चार महिन्यांचा कार्यकाळ पूर्ण करणार आहेत. हिंडेनबर्ग रिसर्चच्या अहवालानंतर काँग्रेसने सेबी प्रमुख बूच यांच्यावर पदाचा गैरवापर आणि आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप केले होते. संसदेत हा मुद्दा बराच गाजला होता. या प्रकरणी त्यांची चौकशी करण्यात आली असून त्यांच्याविरोधात आर्थिक गैरव्यवहाराचे कोणतेही पुरावे आढळले नाहीत.



## माझ्यावर दबाव टाकून मविआ सरकार पाडण्याचा प्रयत्न झाला

### अनिल देशमुखांच्या पुस्तकाची चर्चा

**प्रतिनिधी**
**मुंबई**

एकीकडे राज्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झालेली असताना दुसरीकडे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी त्यांच्याविरोधात झालेल्या षडयंत्र पुस्तकाद्वारे बाहेर काढणार असल्याचा इशारा दिला आहे. यासंदर्भात त्यांनी आज एक्सद्वारे माहिती दिली.

एक्सवर पोस्ट करत अनिल देशमुख म्हणाले, “राज्यात महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये मी गृहमंत्री असताना षडयंत्र रचून माझ्यावर खोटे आरोप करण्यात आले. ईडी आणि सीबीआयच्या चौकशीचा ससेमिरा लावून मला 14 महिने तुरुंगात टाकण्यात आले.”

माझ्यावर दबाव टाकून महाविकास आघाडीचे सरकार पाडण्याचा प्रयत्न झाला. मला प्रचंड त्रास देण्यात आला. मी तुरुंगात असताना यावर पुस्तक लिहायला घेतले होते. ते “डायरी ऑफ होम मिनिस्टर” हे पुस्तक छापून तयार झाले असून लवकरच मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत बाजारात उपलब्ध होणार आहे, अशी माहिती अनिल देशमुख यांनी दिली.

अनिल देशमुख त्यांच्या पारंपरिक कटोल या विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. त्यांच्या नावाची अद्याप घोषणा झालेली नसली तरीही त्यांना तेथून उमेदवारी मिळू शकते. नोव्हेंबर 2021 मध्ये अनिल देशमुख यांना ईडीने मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात अटक केली होती.

पान 8 वर

## पोलिसांच्या पाच कोटींच्या कारवाईला राजकीय ब्रेक, रक्कम जप्तीनंतर सर्वच अधिकाऱ्यांचे कानावर हात

**प्रतिनिधी**
**पुणे**

राजगड पोलिसांनी धडाक्यात कारवाई करत खेड शिवापुर टोलनाक्यावरुन इनोव्हा कारसह हस्तगत केलेल्या रोख पाच कोटी रुपयांच्या कारवाईला काही तासातच राजकीय ब्रेक लागल्याचे निदर्शनास आले. रक्कम मोजुन झाल्यावर रक्कम किती, कोणाची रक्कम होती, कोठुन कुठे चालली होती व पुढे काय कारवाई झाली.

माहीती देण्यास अप्पर पोलिस अधिक्षक,हवेली प्रांताधिकारी तथा निवडणुक अधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी, निवडणुक



आयोगाचे अधिकारी व राजगडचे पोलिस निरीक्षक या सर्वांनीच कानावर हात ठेवत अक्षरक्ष: केलेल्या मोठ्या कारवाईचा फज्जा उडवला.

21 रोजी सायंकाळी सहा वाजता खेड शिवापुर टोलनाक्यावर पुणे बाजुकडुन सातारा दिशेने जाणारया इनोव्हा कार क्र. एमएच 45 एस एस 2526 वर छापा टाकत राजगड पोलिसांनी कारसह कारमधील पाचशेच्या नोटांचे बंडल असलेली कोट्यावधीची रक्कम ताब्यात घेतली होती. या कारवाई मध्ये कारमधील चारजण ताब्यात घेण्यात आले व शिवापुर चौकी येथे हवेलीचे प्रांताधिकारी तथा निवडणुक अधिकारी य़शवंत माने, अप्पर पोलिस अधिक्षक गणेश बिराजदार उपविभागीय पोलिस अधिकारी सुनिल पुजारी, निवडणुक आयोगाच्या एफएसटी पथकाचे प्रमुख मोहम्मद रहेमान, जिल्हा गुन्हे शाखेचे निरीक्षक अविनाश शिळीमकर यांच्या समक्ष रक्कमेची मोजणी केली.

**पान 8 वर**

## युक्रेन युद्ध चर्चेनेच थांबेल; भारत यासाठी सर्वतोपरी मदत करण्यास तयार - मोदी

**वृत्तसंस्था**
**कझान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियातील कझान येथे द्विपक्षीय बैठकीसाठी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांची भेट घेतली. यावेळी युक्रेनचा संघर्ष शांततापूर्ण मार्गाने सोडवला जावा, असा भारताचा विश्वास





आहे आणि ते सर्व शक्य सहकार्य करण्यास तयार असल्याचे आश्वासन त्यांनी रशियास दिले आहे. ब्रिक्स शिखर परिषदेसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी रशियातील कझान येथे मंगळवारी दाखल झाले आहेत.

शिखर परिषदेपूर्वी त्यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांची भेट घेऊन द्विपक्षीय चर्चा केली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, रशिया आणि युक्रेनमध्ये सुरू असलेल्या संघर्षाच्या विषयावर आपण पुतीन यांच्य सतत संपर्कात आहोत. यापूर्वी म्हटल्याप्रमाणे समस्या शांततेच्या मार्गानेच सोडवण्यावर भारताचा विश्वास आहे. शांतता आणि स्थैर्याच्या स्थापनेस भारताचा पूर्ण पाठिंबा आहे. भारत आगामी काळात सर्वतोपरी सहकार्य करण्यास तयार आहे, असे आश्वासन पंतप्रधानांनी यावेळी दिले.

गेल्या तीन महिन्यांतील रशियास दिलेल्या दोन भेटी दोन्ही देशांमधील घनिष्ठ समन्वय आणि सखोल मैत्री दर्शवतात, असेही पंतप्रधानांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, यापूर्वी जुलैमध्ये मॉस्को येथे झालेल्या दोन्ही देशांच्या वार्षिक शिखर परिषदेने प्रत्येक क्षेत्रात आमचे सहकार्य अधिक मजबूत केल्याचेही पंतप्रधानांनी द्विपक्षीय चर्चेदरम्यान नमूद केले आहे.

## म ह त्त्वा चे

### बडतर्फ पोलिस अधिकारी सचिन वाझेना जामीन



**मुंबई :** महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते अनिल देशमुख यांच्याशी संबंधित कथित भ्रष्टाचाराप्रकरणी गुन्हा दाखल झालेले वादग्रस्त पोलिस अधिकारी सचिन वाझे यांना अखेर मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. ते मागील 2 वर्षांपासून तुरुंगात होते. पण आता ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांचा तुरुंगाबाहेर येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सचिन वाझे यांना मनसूख हिरेन हत्याकांड व उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या दक्षिण मुंबईतील निवासस्थानालगत स्फोटकांनी भरलेली कार पार्क केल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती. त्यानंतर मुंबईचे माजी पोलिस आयुक्त परमबीर सिंह यांनी महाराष्ट्राचे तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर महानगरातील रेस्टॉरंट व बारमधून दरमहा 100 कोटी रुपये गोळा करण्याचे टार्गेट दिल्याचा आरोप केला होता. या प्रकरणातही सचिन वाझे यांचे नाव आले होते. तेव्हापासून ते तुरुंगात होते.

### सोनम वांगचूक यांच्याशी सरकार करणार चर्चा



**लेह :** लडाखमधील कार्यकर्ते सोनम वांगचुक आणि इतरांना राष्ट्रीय राजधानीत जंतरमंतर येथे आंदोलन करण्याची परवानगी मागणारी याचिका दिल्ली उच्च न्यायालयात मागे घेण्यात आली. गृह मंत्रालयाने लडाखमधील कार्यकर्त्यांशी पुन्हा संवाद सुरू करण्याचा निर्णय जाहीर केल्यामुळे वांगचुक यांनी त्यांचे ताजे उपोषण संपवल्यानंतर एक दिवसानंतर ही घडामोड झाली आहे. याचिकेच्या सुनावणीदरम्यान, सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायमूर्ती प्रतिभा एम सिंग आणि न्यायमूर्ती अमित शर्मा यांच्या खंडपीठाला सांगितले की वांगचुक यांनी आपला विरोध मागे घेतला असल्याने याचिका टिकू शकत नाही. याचिकाकर्त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलांनी या घटनेची पुष्टी केली. गेल्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने दिल्ली पोलिसांना लडाखमधील ऍपेक्स बॉडी लेह या संस्थेने दाखल केलेल्या याचिकेवर उत्तर देण्यास सांगितले होते.

### शालिमार एक्सप्रेसचे दोन डबे रुळावरुन घसरले

**नागपूर :** सीएसएमटी-शालिमार एक्स्प्रेस दोन डबे हे रुळावरून खाली उतरल्याचं समोर आलं. नागपूर जिल्ह्यातील कळमना येथे आज दुपारच्या सुमारास ही घटना घडली. सुदैवानं या अपघातात कुणीही जखमी झालेलं नाही. समोर आलेल्या माहितीनुसार, ट्रेनचा S2 आणि पार्सलचा डब्बा रुळावरून घसरला. सीएसएमटी-शालिमार एक्स्प्रेस आज आपल्या निर्धारित वेळेत दुपारी 1 वाजता नागपूर रेल्वे स्टेशनकात दाखल झाली होती. नागपूर रेल्वे स्थानकात सर्व आवश्यक तपासण्या केल्यानंतर गाडी गोंदियाच्या दिशेनं निघाली असता, गाडी कळमना रेल्वे स्टेशन येथे दाखल झाली. त्यानंतर काही अंतर पुढे गेल्यानंतर अचानक रेल्वेचे दोन डबे हे रुळाच्या खाली उतरले. रेल्वे ट्रॅकच्या दुरुस्तीचं काम सुरू होतं.

*मुंबई: वरळी विधानसभेमध्ये स्थानिक उमेदवार हवा यासाठी शिवसेना महिला सेनेच्या वतीने आंदोलन करण्यात आले. दत्ता नरवणकर, सुशांत शेलार, संतोष खरात यापैकी कोणालाही उमेदवार द्यावी यासाठी जोरदार निदर्शने करण्यात आली.*



## थोडक्यात

### डॉ. अजित रानडेंच्या हकालपट्टीचा निर्णय रद्द

**मुंबई:** अर्थशास्त्रज्ञ आणि राजकीय विश्लेषक डॉ. अजित रानडे यांची गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था अभिमत विद्यापीठाच्या कुलगुरूपदावरून केलेली हकालपट्टी रद्द करण्यात आली आहे. त्याबाबतचा आदेश विद्यापीठाच्या कुलपतींनी मागे घेतल्याची माहिती विद्यापीठाच्या वतीने मंगळवारी उच्च न्यायालयात देण्यात आली. त्यामुळे, डॉ. रानडे हे विद्यापीठाच्या कुलगुरूपदी कायम राहणार आहेत.या प्रकरणी पुन्हा कारवाई केल्यास डॉ. रानडे यांना नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाप्रमाणे त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली जाईल, असेही विद्यापीठाच्यावतीने न्यायालयाला सांगण्यात आले. न्यायालयाने विद्यापीठाचे हे म्हणणे मान्य केले. तसेच, रानडे यांच्याबाबत भविष्यात प्रतिकूल निर्णय घेण्यात आल्यास त्याची आठवडाभर अंमलबजावणी न करण्याचे स्पष्ट केले. या सगळ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर हकालपट्टीविरोधात केलेली याचिका मागे घेत असल्याचे डॉ. रानडे यांच्यावतीने वकील विवेक साळुंके यांनी न्यायालयाला सांगितले. त्याला न्यायालयाने परवानगी दिली.

### सर्कससाठी मैदान देण्यास चेंबूरमधील नागरिकांचा विरोध

**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेने चेंबूरमधील सुभाष नगर परिसरातील भाऊ प्रधान क्रीडांगण एका सर्कससाठी दीड महिन्याकरीता भाड्याने देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र महापालिकेच्या या निर्णयाला स्थानिक रहिवाशांनी विरोध केला आहे. पालिकेने सर्कससाठी दिलेला परवाना तात्काळ रद्द करावा, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे.चेंबूरमधील सुभाष नगर परिसरातील मुलांना खेळण्यासाठी भाऊ प्रधान क्रीडांगण हे एकमेव मैदान आहे. या मैदानावर परिसरातील अनेक लहान-मोठी मुले विविध खेळ खेळण्यासाठी येतात. मात्र दिवाळीच्या सुट्टीत एका सर्कस चालकाने हे मैदाने महापालिकेकडून भाड्याने घेण्यासाठी पत्रव्यवहार केला आहे. महापालिकेनेही त्याला दीड महिन्यासाठी मैदाने भाड्याने देण्याची परवानगी दिली आहे. मात्र याबाबत माहिती मिळताच स्थानिक रहिवाशांनी त्याला विरोध केला आहे.

### पालघरमध्ये पोलिसांचा रूट मार्च

**पालघर :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पालघर पोलिस ठाण्यातर्फे आज (ता. २२) शहरामध्ये रूट मार्च काढण्यात आला. सुन्नी जामा मशिद, राम मंदिर, पालघर रेल्वे स्थानक, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत हा रूट मार्च काढण्यात आला. यामध्ये उपविभागीय पोलिस अधिकारी, पोलिस निरीक्षक, चार सहाय्यक पोलिस निरीक्षक, सीआयएसएफची एक तुकडी, ३० पोलिस अंमलदार व वाहने सहभागी झाली होती.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# बविआसाठी निवडणुकीतील आव्हान; ख्रिस्ती मतदारांसाठी करावा लागणार संघर्ष

प्रतिनिधी
■ वसई

वसई विधानसभा, नालासोपारा आणि बोईसर या तीन मतदारसंघांमध्ये यंदाच्या विधानसभा निवडणुकांमध्ये बहुजन विकास आघाडी (बविआ) ला मतांसाठी मोठा संघर्ष करावा लागणार आहे. लोकसभा निवडणुकीत बविआला गंभीर मतांचा फटका बसल्यामुळे या निवडणुकीत त्यांना चांगली कामगिरी करणे आव्हानात्मक ठरू शकते. वसई विधानसभा निवडणुकीत बविआचा उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला होता, तर नालासोपारा व बोईसरमध्ये देखील



अपेक्षित मते मिळाली नाहीत.

यावेळी आमदार हितेंद्र ठाकूर यांच्यासाठी जरी लढाई करणे अनिवार्य असले, तरी त्यांच्या अलीकडच्या मतफटकेमुळे ते वसईतून पुन्हा निवडणूक लढवत आहेत . वसईत वाढती बांधकामे, प्रशासकीय काळातील भ्रष्टाचार आणि स्थानिक पातळीवर राज्यकर्त्यांची उदासीनता या सर्व गोष्टी मतदारांचा कौल प्रभावित करू शकतात.

विशेषतः बविआला ख्रिस्ती मतांसाठी संघर्ष करावा लागू शकतो.नालासोपाऱ्यात आमदार क्षितीज ठाकूर यांच्यासाठी देखील आव्हानात्मक स्थिती आहे. आमदारकीत असताना वाढती अनधिकृत बांधकामे आणि बोकाळलेली गुन्हेगारी यावर प्रशासनाला अंकुश ठेवण्यात ते कमी पडले असल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी समाज माध्यमांवर व्यक्त केली आहे. याव्यतिरिक्त, नालासोपाऱ्यातील उत्तर भारतीय मतदारांची लक्षणीय संख्या यावेळी भाजपसाठी फायदेशीर ठरू शकते. ज्यामुळे भाजप बविआला तिथे धक्का देण्यासाठी सज्ज आहे.

बोईसर विधानसभा मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडीचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येत आहे. याठिकाणी आमदार राजेश पाटील यांच्याबाबत काही भागांत नाराजी असल्यामुळे बविआला येथे कडवा सामना करावा लागणार आहे.तिन्ही मतदारसंघांमध्ये बविआला आव्हानात्मक निवडणूक लागेल, असे राजकीय जाणकारांचे निरीक्षण आहे. यंदाच्या निवडणुकीत बविआला विविध आव्हानांना तोंड द्यावे लागणार आहे आणि त्यासाठी त्यांना रणनीतीची आवश्यकता आहे.

# सातिवलीमध्ये औद्योगिक वसाहतीची भिंत कोसळून तीन घरांचे नुकसान

## आमदारांचा तत्काळ हस्तक्षेप



प्रतिनिधी
■ वसई

वसई पूर्वेकडील सातिवली येथे औद्योगिक वसाहतीची निकृष्ट दर्जाची भिंत कोसळल्याने शेजारच्या तीन घरांचे मोठे नुकसान झाले आहे. ही घटना सोमवारी सायंकाळी घडली असली तरी सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटना समजताच स्थानिक आमदार राजेश पाटील यांनी घटनास्थळी भेट दिली आणि संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली.

सातिवलीच्या दामूपाडा परिसरात औद्योगिक वसाहतीमधील निकृष्ट बांधकामाच्या भिंतीमुळे शेजारच्या घरांवर मोठा धोका निर्माण झाला होता. भिंत कोसळल्याने तिथे राहणाऱ्या गरीब कुटुंबांच्या तीन खोल्या पूर्णतः उद्ध्वस्त झाल्या. सुदैवाने कोणालाही इजा झाली नाही.घटनास्थळी तत्काळ दाखल झालेल्या स्थानिक माजी नगरसेवकांनी आमदार राजेश पाटील यांना संपर्क करून परिस्थितीची माहिती दिली. आमदार पाटील यांनी पोलीस, महापालिकेचे जी प्रभागातील अधिकारी आणि संबंधित औद्योगिक वसाहतीच्या मालकाला घटनास्थळी बोलावून तात्काळ तपासणी केली.

आमदार पाटील यांनी भिंत कोसळण्याला जबाबदार ठरलेल्या औद्योगिक वसाहतीच्या मालकावर कठोर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. त्यांनी पोलिसांना संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले असून ज्या नागरिकांच्या खोल्या उध्वस्त झाल्या आहेत, त्यांना तत्काळ नवीन घरांची व्यवस्था करण्याचे औद्योगिक मालकाला सांगण्यात आले.

या घटनेत आणखी एक मुद्दा पुढे आला की, दामूपाडा वस्तीचा पारंपरिक रस्ता औद्योगिक वसाहतीच्या मालकाने अनेक दिवसांपासून पोलीस आणि महानगरपालिकेच्या सहकार्याने बंद केला होता. या रस्त्याच्या वापरासाठी स्थानिकांनी वारंवार मागणी केली होती. आमदार पाटील यांनी औद्योगिक मालकाला रस्ता पुन्हा उघडण्यासाठी निर्देश दिले. त्यानुसार, औद्योगिक वसाहतीच्या मालकाने रस्ता उघडण्याची आणि उद्ध्वस्त झालेल्या खोल्या पुन्हा बांधून देण्याची सहमती दिली आहे.

# वाहतुकीची कोंडी आणि अपुऱ्या बससेवेमुळे प्रवाशांची अडचण

प्रतिनिधी
■ वसई

मुंबई-अहमदाबाद महामार्गावर सुरू असलेल्या कामामुळे आणि शहरातील खराब रस्त्यांमुळे सध्या वाहतूकव्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. महाराष्ट्र एस.टी. महामंडळाच्या बसेस वेळेवर येत नाहीत किंवा आल्या तरी वाहतूककोंडीमुळे वेळेवर पोहोचत नाहीत. त्यामुळे प्रवाशांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. कामावर जाण्यासाठी प्रवासी बससेवेवर अवलंबून असतात, परंतु अपुऱ्या बससेवेमुळे आणि सततच्या उशिरांमुळे नागरिकांना रिक्षासारख्या महागड्या पर्यायांचा आधार घ्यावा लागत आहे.

अनेक सामान्य कामगारांना आवश्यक तेवढे वेतन मिळत नाही, परंतु रिक्षाचा खर्च जबरदस्त आहे. नागरिकांच्या उत्पन्नाचा विचार करता, त्यांना "आमदनी अठन्नी, खर्चा रूपैय्या" अशी स्थिती निर्माण झाली आहे. महामार्गाच्या काँक्रीटिकरणाचे काम गेल्या काही महिन्यांपासून सुरू असल्यामुळे एस.टी. बसेस नियमित उशिराने धावत आहेत. त्यातच वज्रेश्वरी आणि त्यासारख्या इतर भागांसाठी बससेवा आधीच अपुरी आहे, त्यामुळे प्रवाशांची अडचण आणखी वाढली आहे.

वसई बस डेपोतून रात्रीच्या सुमारास वज्रेश्वरीला जाणाऱ्या बसगाड्या उशिरा येत आहेत. रात्री 8:30 वाजता वज्रेश्वरीसाठी बस असते आणि पुन्हा रात्री 9:30 वाजता दुसरी बस असते. याशिवाय रात्री 8:00 वाजता करंजोण बस आहे, परंतु प्रवासी संख्या अधिक असतानाही या बसेस बऱ्याचदा रद्द केल्या जातात, ज्यामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.

महामार्गावर कोंडी असल्याने चाकरमान्यांना तासभर विलंब होतो. आधीच वाहतुकीच्या अडचणी आणि त्यात उशिराने धावणाऱ्या बसेस यामुळे प्रवासी त्रस्त झाले आहेत. मासिक बस पास असूनही प्रवाशांना कामाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी महागड्या रिक्षांचा वापर करावा लागत आहे.

# वसईत अनधिकृत बॉयलर कारखान्यांचा प्रश्न गंभीर

## महानगरपालिकेच्या निष्क्रियतेमुळे दुर्घटनांचा धोका

प्रतिनिधी
■ वसई

वसई-विरार क्षेत्रात मोठ्या प्रमाणात चालू असलेल्या अनधिकृत बॉयलर कारखान्यांमुळे स्थानिक नागरिकांचे जीवन धोक्यात आले आहे. अनेक ठिकाणी अग्निशमन विभागाच्या निर्देशांचे पालन होत नसल्याने मोठ्या दुर्घटनांचा धोका सतत वाढत आहे. दुर्दैवाने, वसई-विरार महानगरपालिकेचा अग्निशमन विभाग या गंभीर समस्येला तातडीने हाताळण्यात अपयशी ठरला आहे.

अनेक वर्षांपासून स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि पर्यावरणवादी संघटना या अनधिकृत कारखान्यांच्या विरोधात आवाज उठवत आहेत. या बॉयलर कारखान्यांमध्ये आवश्यक तांत्रिक आणि सुरक्षा नियमांचे पालन केले जात नाही जे स्थानिकांसाठी एक मोठा धोका निर्माण करीत आहे. अनेक वेळा या कारखान्यांमुळे झालेल्या आगीच्या दुर्घटनांमध्ये स्थानिकांना जीव गमवावा लागला आहे. पण या बाबींकडे प्रशासनाचे दुर्लक्षच दिसून येत आहे.

वसई-विरार परिसरात अशा अनेक कारखान्यांनी अग्निशमन विभागाच्या परवानग्या न घेताच आपले काम चालू ठेवले आहे. या कारखान्यांमध्ये बॉयलरचा वापर मोठ्या प्रमाणात होत असून कोणतीही सुरक्षा तपासणी न करता त्यांना काम सुरू ठेवण्याची मुभा मिळाल्याने तिथे काम करणारे मजूर आणि आसपास राहणारे नागरिक यांच्यावर कायमस्वरूपी धोक्याचे सावट आहे.शासनाने लागू केलेल्या विविध कायद्यांचे आणि सुरक्षाविषयक नियमांचे या कारखान्यांमध्ये पालन होत नाही. मात्र, स्थानिक प्रशासन आणि महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने वेळोवेळी कारवाई करण्याचे आश्वासन दिले असले तरी या कारखान्यांवर प्रभावीपणे आळा घालण्यात अपयश आले आहे.

दुर्घटनेनंतर स्थानिक प्रशासन तातडीने जागे होते. परंतु तेवढ्यापुरतेच हालचाल होताना दिसते. अग्निशमन विभाग आणि संबंधित अधिकारी नेहमीच मोठ्या अपघातानंतर जागे होतात आणि काही काळासाठी तपासणी किंवा कारवाई केली जाते. मात्र, ही कारवाई अपुरी आणि दीर्घकालीन नसल्यामुळे समस्या कायमच आहे. परिणामी, वसई-विरारमधील नागरिकांना कायमस्वरूपी या धोक्याचा सामना करावा लागत आहे.अनेक स्थानिक रहिवाशांनी या बाबतीत तक्रारी नोंदवल्या आहेत आणि प्रशासनाच्या अपयशावर नाराजी व्यक्त केली आहे. या कारखान्यांमुळे येणाऱ्या धोक्यामुळे पर्यावरणाचेही मोठे नुकसान होत आहे. हवामानातील प्रदूषण वाढत असून जलस्त्रोतांवरही याचा विपरीत परिणाम होत आहे. वसई-विरारमधील वाढत्या अनधिकृत कारखान्यांमुळे नागरिकांचे आरोग्य, सुरक्षितता आणि पर्यावरण यावर होणारे विपरीत परिणाम लक्षात घेता स्थानिक प्रशासनाने तत्काळ आणि कठोर पावले उचलणे गरजेचे आहे. जर वेळेत कारवाई केली नाही, तर भविष्यात मोठ्या दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

**जाहीर नोटीस**

या नोटीसीव्दारे तमाम नागरीकांना कळविण्यात येते कि. श्री वैभव भिका फसाळे रा.कोचाळे ता.मोखाडा जि. पालघर यांनी स्वतःच्या जन्माची नोंद उशीराने होउन मिळणेबाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केलेला आहे. श्री वैभव भिका फसाळे यांच्या जन्माची नारीख- १७/०४/१९९५ व जन्मस्थळ. कोचाळे. कारेगाव ता. मोखाडा असलेबाबत अर्जात नमूद केले आहे. ग्रामसेवक कार्यालय कारेगाव ता. मोखाडा जि. पालघर यांच्या अभिलेखात जन्माची नोंद करण्यात आली नसल्याबाबत जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र या न्यायालयात सादर केलेले आहे. सदर प्रकरणो निम्न स्वाक्षरीकार यांचे या न्यायालयात सुनावणीचे कामकाज चालु आहे. प्रकरणी नागरीकांचा आक्षेप/तक्रार/हरकती असल्यास त्यांनी आवश्यक त्या दस्ताऐवजासह नोटीस प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासुन १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात या नात्यालयात दाखल करावं, नमुद कालावधी नंतर येणा-या आक्षेप तक्रार हरवाचा विचार केला जाणार नाही. तसेच कोणतीही हरकत/आक्षेप/तक्रार या कार्यालयास प्राप्त न झाल्यास जन्म मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील तरतुदीनुसार नोंदीच्या अर्जाबाबत निर्णय घेण्यात येईल. त्याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्रकरण क्र. मह/जन्म-मृत्यु नोंद एस आर-२५७/२०२४ दिनांक:-२५/०७/२०२४
ठिकाण:- मोखाडा

**निवासी नायब तहसीलदार**
**तथा कार्यकारी दंडाधिकारी मोखाडा**

न-१. ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय कारेगाव ता. मोखाडा, 2/-सदरची नोटीस बोर्डावर प्रसिध्द करून जबाब पंचनाम्यासह प्रसिध्दी केलेबाबतचा प्रसिध्दी अहवाल सादर करावा.
2) तलाठी सजा- कारेगाव,
2/-सदरची नोटीस चावडीवर प्रसिध्द करून जबाब पंचनाम्यासह प्रसिध्दी केलेबाबतचा प्रसिध्दी अहवाल सादर करावा.

**जाहीर नोटीस**

या नोटीसीव्दारे तमाम नागरीकांना कळविण्यात येते कि, श्री. परशुराम बाळू मौळे रा. ब्राम्हणगाव पो-आसे ता. मोखाडा जि. पालघर यांनी स्वतःच्या आईच्या मृत्युची नोंद उशीराने होउन मिळणेबाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी अर्जात के. मथीबाई बाळु मौळे रा. ब्राम्हणगाव पो- आसे ता. मोखाडा जि. पालघर यांच्या मृत्युची तारीख - १९/०८/२०१२ रोजी झाल्याचे नमुद केलेले आहे. ग्रामसेवक, ग्रामपंचायत आसे ता. मोखाडा जि. पालघर तसेच अर्जदार यांनी अर्जात कै. भिका बारकू मौळे रा. ब्राम्हणगाव पो- आसे ता. मोखाडा जि. पालघर यांच्या मृत्युची तारीख- १३/०५/२००५ रोजी झाल्याचे नमुद केलेले आहे. ग्रामसेवक, ग्रामपंचायत आसे ता. मोखाडा जि. पालघर यांच्या अभिलेखात जन्माची नोंद करण्यात आली नसल्याबाबत जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र या न्यायालयात सादर केलेले आहे. सदर प्रकरणी निम्न स्वाक्षरीकार यांचे या न्यायालयात सुनावणीचे कामकाज चालु आहे. प्रकरणी नागरीकांचा आक्षेप / तक्रार / हरकती असल्यास त्यांनी आवश्यक त्या दस्तऐवजासह नोटीस प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासुन १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात या न्यायालयात दाखल करावे. नमुद कालावधी नंतर येणा-या आक्षेप तक्रार हरकतीचा विचार केला जाणार नाही. तसेच कोणतीही हरकत/आक्षेप / तक्रार या कार्यालयास प्राप्त न झाल्यास जन्म मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील तरतुदीनुसार नोंदीच्या अर्जाबाबत निर्णय घेण्यात येईल, त्याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्रकरण क्र.मह/जन्म-मृत्यु नोंद/एस आर-१९०/२०२४ दिनांकः-११/०६/२०२४
ठिकाण:- मोखाडा
प्रकरण क्र.मह/जन्म-मृत्यु नोंद/एस आर-१९१/२०२४ दिनांकः-११/०६/२०२४
ठिकाण:- मोखाडा

**(मयूर खगल)**
**तहसीलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी मोखाडा**

प्रत-१. ग्रामसेवक, ग्रामपंचायत आसे.
2/-सदरची नोटीस बोर्डावर प्रसिध्द करून जबाब पंचनाम्यासह अहवाल सादर करावा.
2) तलाठी सजा आसे,
2/-सदरची नोटीस चावडीवर प्रसिध्द करून जबाब पंचनाम्यासह अहवाल सादर करावा.

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वसई यांच कार्यालय**
**(महसूल शाखा)**
**किल्लाबंदररोड, मालोंडे-वसईगाव, ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१२०१**
**दुरध्वनी क्र. (०२५०) २३२२००७**

**क्र.मशा/कक्ष-१/फौजदारी/कावि-३३६/२०२४**
**दिनांक: १२/०९/२०२४**

**जाहीर नोटीस**

**अर्ज क्रमांक ३३६/२०२४**
**श्री. आदित्य आदेश बनसोडे** ......अर्जदार
**विरुद्ध**
**वसई विरार शहर महानगरपालीका, ता. वसई जि. पालघर** .....सामनेवाले

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी त्यांचे आजोबा कै. प्रकाश ज्ञानेश्वर बनसोडे यांनी त्यांचा मृत्यू दि.१९/०५/२०२० रोजी रहात्या घरी येथे झाला असून, त्याची मृत्यूची नोंद करण्याबाबत आदेश मिळण्याकरीता या कार्यालयात अर्ज क्रमांक ३३६/२०२४ दाखल केलेला आहे. या कोणी इसमास हरकत असेल त्यांनी या कार्यालयात हि नोटीस प्रसिध्दझाल्यापासून १५ दिवसाच्या आत लेखी हरकत करावी. सदरहू आदेश देण्याबाबत जर कोणत्याही इसमाची हरकत दाखल नझाल्यास योग्य ते पुरावे व कागदपत्र घेवून अर्जदार ह्यांना त्यांच्या मृत्यूचीनोंद करण्याबाबत आदेश देण्यांत येईल ह्यांची कृपया नोंद घेण्यांत यावी.

आज दि. १२/०९/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व शिक्यानिशी दिला.

**सही/-**
**तहसिलदार वसई**
**तहसिलदार वसई करिता**

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**प्रभाग समिती 'अे' बोळींज**
ता. वसई, जि.पालघर, पिन ४०१ ३०३ दूरध्वनी : ०२५० - २५५१५०१/२५५०१०२ ई-मेल :- amca.vvmc@gov.in

जा.क्र. व.वि.श.म./बो./कर/ ३६६/२०२४-२५ दिनांक:- २२/१०/२०२४

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अधिसुचित +तीन प्रकरण-८ मधील कलम १ (१) व २ (२) अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय बोळींज येथे झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत हितसंबंधकाने हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई-विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्या बोळींज येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका मध्ये याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र | दिनांक | वॉर्ड क्रमांक / मालमत्ता क्रमांक | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्याचे नांव किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नांव | खरीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नांव | मालमत्तेचे स्वरुप | पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०३-१०-२०२४ | BL०४ / १५९/९५ | मे. अमेय बिल्डर्स अॅण्ड प्रा डेव्ह/ मोरेश्वर कृष्णा बारीया | मोहन विठ्ठल पाटील | निवासी | तुलीप दुकान नं ०८ यशवंत नगर विरार रोड बोळींज |
| २ | ०३-१०-२०२४ | BL०४ / १४९/८० | माणिक जी मेहता | प्रशांत किरण घोलप व माधुरी प्रशांत घोलप | निवासी | यशवंत नगर विरार रोड पुनम आर्चिड सी / ३०४ |
| ३ | ०३-१०-२०२४ | BL०६/२०९/३१ | प्रसाद प्रमोद पिंपळे | विनोद कुमार अमरनाथ पांडे | निवासी | विनय युनिक रेसीडेन्सी बि नं २ रूम नं ६०९ विरार |
| ४ | ०३-१०-२०२४ | BL०४ / ९८/१३ | वसंत नाईक | सुरेश शांताराम जांभवडेकर व सानिका जांभवडेकर | निवासी | संस्कृती रूम नं ए/२०४, खारोडी नाका बोळींज |
| ५ | ०३-१०-२०२४ | BL०४/२२८/४६ | अनोरा रेसिडेन्सी | रमेशचंद्र नारायणदास शाह व कपिल रमेशचंद्र शाह व अलकायेन शाह | निवासी | अनोरा रेसीडेन्सी रूम नं ए/६०५ प्रीमीयल पार्क |
| ६ | ०३-१०-२०२४ | BL०७/२६५/१५ | ग्लोबस कंस्ट्रक्शन / फ्रान्सीस मार्शल डिकुन्हा व इतर १ | गणेश नंदकुमार हडकर व श्वेता गणेश हडकर | निवासी | वाय के एन एक्स एक्सपर्ट शाळे समोर स्टार सिरेन रूम नं ८/४०१ |
| ७ | ०३-१०-२०२४ | BL०७/१२/२५ | मधुसूदन चरणदास समेया व इतर २ | हरिश बंसीलाल विश्वकर्मा व रेडिलाल सुभार व किशनलाल देवीलाल सुथार व श्रवण दर्जी | निवासी | दुकान नं १२ ऋषीकेश अपार्टमेट विरार |
| ८ | ०३-१०-२०२४ | BL०७/२९५/११७ | निता सुकेतु शाह | रेखा देवी व अभिषेक कुमार यादव | निवासी | पेनिनसुला पार्क डी मार्ट जवळ डी/५०३, विरार |
| ९ | ०३-१०-२०२४ | BL०७/२७७/३२ | आशा किती कुमार मेहता | सुनिल मुरारी मिश्रा व अंकित मिश्रा | निवासी | पुनम नगर विवा कॉलेज रोड पुनम ऑटम पाचवा मजला रूम नं ए/५०२ |
| १० | ०३-१०-२०२४ | BL.०६/२१०/६७ | अमर आर सिंह व मनाली सिंह | संदिप प्रकाश बोरकर व स्नेहा संदिप बोरकर | निवासी | विनय युनिक रेसीडेन्सी बि नं ३ रूम नं ७०१ विरार |
| ११ | ०३-१०-२०२४ | BL०६/१९/६५ | सत्यनारायण शेणॉय | धीरेंद्र कुमार सिंह व सुगंधा धीरेंद्र कुमार सिंह | निवासी | पंचरत्न गोविंद नगर रूम नं सी / ३०३, विरार रोड |
| १२ | ०३-१०-२०२४ | BL०७/३१५/६९ | अदिती अभय पिंपळे व मोनाली पंकज घरत | प्रतिक्षा माणिक संखे व मोनाली पंकज घरत | निवासी | नविन विवा कॉलेजच्या मागे पॅराडाईज रेसीडेन्सी बि नं २ रूम नं बी/६०१ |
| १३ | ०३-१०-२०२४ | BL०१/२११/१ | शालिनी जिवनदास हेलगांवकर | मनिषा राजेश आमडसकर | निवासी | नानभाट रोड ग्रेस कॉलनी ४/बी रूम नं ०१ |
| १४ | ०३-१०-२०२४ | BL०३/२९५/८६ | उध्दव उमेश पाटील | गीता दिलीप सिथ्पुरा व झलक दिलीप सिधपुरा | निवासी | पद्मावती नगर लोकग्रुप रोड पुनम आरा रूम नं बी / ४०५ |
| १५ | १७-१०-२०२४ | BL०७ / १२८ / १९ | समिर चिपळुणकर व साक्षी समिर चिपळुणकर | साक्षी समीर चिपळुणकर | निवासी | मधुवन पार्क फेज २ रूम नं ए/४०३ तिरूपती नगर रोड |
| १६ | १७-१०-२०२४ | BL०७/२२८/२६ | सनीश नायर व ऐश्वर्या सनीश नायर | संदीप गोविंद आंबेकर व संजल संदीप आंबेकर | निवासी | मधुवन पार्क फेज २ रूम नं ए/३०४ तिरूपती नगर रोड |
| १७ | १७-१०-२०२४ | BL०७/५७/१४ | अमरेश कुमार दिवाण | सोहिल बाळाराम बोले व साची सोहिल बोले | निवासी | श्रेया अपार्ट रूम नं १०६, दिवकर हॉस्पीटल जवळ |
| १८ | १७-१०-२०२४ | BL०३/२८५/१५ | सुरेश धोंडू पडये व सुनंदा सुरेश पडये | किरण गणपत जोशी व प्रांजल किरण जोशी | निवासी | लोप्रभात बी / २ रूम नं ४०१ बोळींज आगाशी रोड |
| १९ | १७-१०-२०२४ | BL०४ / ६६ / ७७ | सुरेश अंकुश साकरकर व प्रसाद सुरेश साकरकर | प्रसाद सुरेश साकरकर | निवासी | ७५१ एम जी एम नगर रूम नं ३०२ एम जी एम रोड बोळींज |
| २० | १७-१०-२०२४ | BL०७/२५७/१७ | विवा महावीर इंटरप्रायजेस | महेश लल्लू भाई दोरा | निवासी | विद्या तारा रूम नं बी / १०२, विवा कॉलेज रोड विरार |

जा.क्र. वो/कर/ ३६६/ २०२४-२५
दिनांक : २२/१०/२०२४

**सही/-**
**सहा आयुक्त**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 123**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबावदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - १२३**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

*मुंबई: महाराष्ट्र विधान सभा निवडणूक 2024 अनुसंधाने नागरिकांच्या मनातील वातावरण दूर करण्यासाठी शांततेत मतदान व्हावे तसेच मतदारांमध्ये चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यासाठी मागाठाणे विधान सभा व दहिसर विधान सभा क्षेत्र संघात दहिसर पोलीस स्टेशन चा रूटमार्च दहिसर चेक नाका एम टी एन एल केतकीपाडा, वैशाली नगर सुहासिनी पावस्कर मार्ग, संत कबीर दास मार्ग, वाघदेवी नगर, खान कंपाऊंड, शनी मंदिर एकता नगर, रावळपाडा, एस एन दुबे रोड शेवट दहिसर पोलीस ठाण्यात रूटमार्च समारोप करण्यात आला.सदरचा रूटमार्च दहिसर पोलीस वरिष्ठ निरीक्षक अशोक होनमाने यांच्या मार्गदर्शनाखालीच करण्यात आला.तसेच रूटमार्च वेळी दहिसर पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि अंमलदार, गस्तीवरिल सर्व पोलीस वहाने व औद्योगिक सुरक्षा रक्षक यांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.*



# बाबा सिद्दीकींच्या मारेकऱ्यांनी झाडावर गोळ्या चालवून केला सराव

## लोकलने प्रवास,खोपोलीच्या जंगलात जाऊन निशाणा साधण्याची प्रॅक्टिस

## पोलिसांनी केले आरोपींच्या 'मोडस ऑपरंडी'चे स्पष्टीकरण

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्राचे माजी मंत्री आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते बाबा सिद्दीकी यांची गोळी झाडून हत्या करण्यात आल्याने मुंबईसह राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. त्यानंतर, पोलिसांनी वेगवान पद्धतीने तपासाची चक्रे फिरुन याप्रकरणातील मुख्य आरोपींना काही तासांतच अटक केली. मात्र, या घटनेच्या खोलात जाऊन पोलिसांचा तपास सुरू आहे. बाबा सिद्दीकी हत्याप्रकरणात पोलिसांकडून सखोल तपास करण्यात येत असून आरोपींकडून धक्कादायक माहिती समोर आली आहे. पोलिसांच्या चौकशीतून पुढे आलेल्या माहितीनुसार, शूटर्सने बाबा सिद्दीकींना निशाणा बनवण्यापूर्वी गोळी मारण्याचा सराव केला होता. त्यासाठी, कर्जत खोपोली रोडवरील एका जंगलात जाऊन गोळी मारण्याचा सराव केल्याचं आरोपींनीच पोलिसांना सांगितलं. पोलीस कोठडीत अटकेत असलेल्या आरोपी गुरमैल सिंह, धर्मराज कश्यप आणि फरार आरोपी शिवकुमार गौतम या तिघांनी येथील जंगलात जाऊन प्रॅक्टीस केली होती.





पोलिसांमधील एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी झाडावर गोळया चालवून गोळीबाराचा सराव केला होता. विशेष म्हणजे कर्जत-खोपोली रोडवरील एका धबधब्याजवळील पळसदरी गावाजवळ असलेल्या जंगलात जाऊन त्यांनी हा सराव केला होता. याच वर्षातील सप्टेंबर महिन्यात म्हणजेच गेल्याच महिन्यात येथील जंगल परिसरात जाऊन गोळी चालवण्याचा सराव आरोपींनी केल्याचे समजते.

कुर्ला स्टेशनवरुन लोकल ट्रेन पकडून आरोपी लौजी रेलवे स्टेशनवर उतरले. या स्टेशनवरुन त्यांनी ऑटोरिक्षाने जवळपास 8 किमी दूर असलेल्या पलसदरी गावांत जाऊन जंगलात हा सराव केला होता. येथील ऑटो ड्रायव्हरशी संवाद साधताना आपण येथे फिरायला आलो आहोत, असे त्यांनी म्हटले होते. तसेच, जिथं जंगल, झाडं आणि कोणीही माणसं नसतील अशा ठिकाणी आम्हाला घेऊन चला, असे आरोपींनी रिक्षावाल्याला म्हटले होते. त्यानंतर, रिक्षाचालकाने आरोपींना पळसदरी येथील धबधब्याजवळ जंगलात नेऊन सोडले. आरोपींनी अंदाज लावला होता की, धबधब्याच्या आवाजामुळे गोळीबाराचा आवाज कमी प्रमाणात येईल. त्यानुसार, येथील गावातील जंगलात असलेल्या एका झाडावर आरोपींनी अनेक दिवस प्रतिदिनी ५ ते १० राउंड फायर करत सराव केला होता.

### झिशान सिद्दीकींनी दोनदा घेतली पोलीस आयुक्तांची भेट

*बाबा सिद्दीकी हत्याप्रकरणी आज त्यांचा मुलगा आणि आमदार झिशान सिद्दीकी यांनी तिसऱ्यांदा मुंबई पोलीस आयुक्तालयाला भेट दिली. यादरम्यान, दोनवेळा त्यांनी पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांची भेट घेऊन चर्चा केल्याची माहिती आहे.*

# निवडणुकीच्या काळात सर्व तपास व अंमलबजावणी यंत्रणांनी सजग रहावे - भूषण गगराणी

## संशयास्पद प्रकरणी थेट जप्तीची कारवाई करावी

■ मुंबई

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या पार्श्वभूमीवर, मुंबई उपनगर जिल्हा आणि मुंबई शहर जिल्हा कार्यक्षेत्रामध्ये कायदा व सुव्यवस्था तसेच आर्थिक प्रकरणांशी संबंधित सर्व तपास व अंमलबजावणी यंत्रणांनी अधिक चोखपणे जबाबदारी पार पाडावी. पैशांची देवाणघेवाण, मादक द्रव्य, मद्य विक्री व तस्करी, सोने-चांदींची विक्री आणि तस्करी तसेच हवाला आदी संशयास्पद प्रकरणात कारवाई करण्यात कोणतीही हयगय करू नये. संशयास्पद प्रकरणी थेट व तात्काळ जप्तीची कारवाई करावी. तसेच आर्थिक खर्चाच्या बाबतीत संवेदनशील असलेल्या मतदारसंघांवर अधिक लक्ष केंद्रीत करुन तेथेही योग्य ती कारवाई करावी, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले आहेत.

विधानसभा निवडणूक अनुषंगाने, मुंबई महानगरातील कायदा व सुव्यवस्था तसेच आर्थिक प्रकरणांशी संबंधित विविध तपास व अंमलबजावणी यंत्रणांची महानगरपालिका मुख्यालयात मंगळवारी बैठक पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) श्री. अभिजीत बांगर, विशेष पोलिस महानिरीक्षक (प्रशासन) डॉ. आरती सिंह, सह पोलिस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) सत्या नारायण, महानगरपालिकेचे विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार आदी यावेळी उपस्थित होते. तसेच आयकर विभाग, राज्य उत्पादन शुल्क, सक्तवसूली व अंमलबजावणी, महसूल गुप्तवार्ता, केंद्रीय वस्तू व सेवा कर, राज्य वस्तू व सेवा कर, वस्तू व सेवा कर गुप्तवार्ता, सीमा शुल्क, राज्यस्तरीय बँकर्स समिती, अंमली पदार्थ नियंत्रण, वित्तीय गुप्तवार्ता विभाग; रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, तटरक्षक दल, रेल्वे सुरक्षा दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल, भारतीय विमानतळ प्राधिकरण, नागरी उड्डाण सुरक्षा, परिवहन विभाग, आचारसंहिता कक्ष, मुंबई पोलिस दलाचे कायदा व सुव्यवस्था विभाग यांच्यासह विविध यंत्रणांचे अधिकारीही या बैठकीला उपस्थित होते.

*मुंबई: आरक्षणवादी आघाडीच्या वतीने मुंबई मराठी पत्रकार संघ येथे पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी प्रकाश अण्णा शेंडगे, आनंदराज आंबेडकर, चंद्रकांत बावकर, काकासाहेब खंबाळकर, अरविंद डाफळे उपस्थित होते*



# आचारसंहिता भंगाच्या 910 तक्रारी प्राप्त तक पैकी 899 निकाली

■ मुंबई

राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ साठी १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. १५ ते २२ ऑक्टोबर २०२४ पर्यंत राज्यभरात सी-व्हिजिल (C-Vigil app) ॲपवर एकूण ९१० तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ८९९ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत. म्हणजे एकूण ९९ टक्के तक्रारी निकाली काढण्यात आल्याची माहिती राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी दिली आहे. या दरम्यान, ३४ कोटी ६२ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केल्याची माहितीही त्यांनी दिली.

सजग नागरिकांना आचारसंहिता पालनासाठी सहकार्य करणारे सी-व्हिजिल (C-Vigil app) ॲप हे कोणत्याही ॲपस्टोअरमधून डाऊनलोड करता येते. या ॲपद्वारे नागरिकांना आचारसंहिता भंगाबाबत तक्रार करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथकाद्वारे चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येते. राज्य शासन व केंद्र सरकारच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत एकूण ३४ कोटी ६२ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे, आचारसंहितेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी सुरु असल्याचेही डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले.

# शिंदे शिवसेनेत गेलेल्या पहिल्या काँग्रेसच्या माजी नगरसेवकांची घरवापसी

प्रतिनिधी
■ मुंबई

धारावी मधील शिंदे गटाचे माजी नगरसेवक हाजी बब्बू खान यांनी काल पुन्हा काँग्रेस मध्ये प्रवेश केला. यावेळी खासदार वर्षा गायकवाड, आमदार अमीन पटेल, आमदार अस्लम शेख तसेच खान यांच्या मतदारसंघातील मुस्लिम समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होता. हा प्रवेशाचा कार्यक्रम काल संध्याकाळी मुंबई काँग्रेस कार्यालयासमोरील शेड असलेल्या जागेत झाला.

खान हे २०१७ मध्ये काँग्रेस च्या तिकिटावर प्रथमच धारावी मधून निवडून आले होते. त्यांनी ऑगस्ट २०२३ मध्ये शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला होता. त्यावेळी त्यांच्या सोबत माजी नगरसेविका पुष्पा कोळी, गंगा माने, तसेच कुणाल माने व भास्कर शेट्टी यांनी ही शिंदे गटात प्रवेश केला होता. हा धारावीच्या आमदार असलेल्या व नुकतेच मुंबई काँग्रेस चे अध्यक्ष पद स्वीकारलेल्या वर्षा गायकवाड यांना मोठा धक्का मानला जात होता.




बब्बू खान यांनी काल पुन्हा काँगेस पक्षात प्रवेश केल्याने घरवापसी करणारे ते पाहिले नगरसेवक ठरले आहेत.माजी खासदार मिलिंद देवरा यांच्या नेतृत्वाखाली वर्षा बंगल्यावर झालेल्या कार्यक्रमात ही अनेक माजी नगरसेवकांनी २९ फेब्रुवारी २०२४ रोजी शिंदे गटात प्रवेश केला . हा काँग्रेसला दुसरा मोठा धक्का होता. शिंदे गटात जुलै २०२४ पर्यंत शिवसेना ठाकरे गटाचे ४८, काँग्रेसचे २०, राष्ट्रवादी काँग्रेस चे ४, एम आय एम १,समाजवादी पार्टी १ आणि अपक्ष २ अशा ७६ माजी नगरसेवकांनी प्रवेश केला आहे. पैकी काँग्रेसचे हाजी बब्बू खान यांनी काल घरवापसी केली आहे.


# बृहन्मुंबई महानगरपालिका

**विषय :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज पार्क मैदानातील स्टॉल वाटपाबाबत.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादर येथे येणा-या अनुयायीच्या सोयीसाठी छत्रपती शिवाजी महाराज पार्क मैदानात विविध संस्था आणि व्यक्ती इत्यादींमार्फत दरवर्षी विविध सेवा - सुविधा पुरविल्या जातात. तसेच समाज प्रबोधनासाठी पुस्तके व इतर साहित्यांची विक्री केली जाते. हे सर्व उपक्रम दरवर्षी आयोजित केले आतात.

त्यानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 68 व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ज्या व्यक्ती व संस्था या उपक्रमात सहभागी होऊ इच्छितात त्यांनी त्यांचे रितसर अर्ज सहाय्यक आयुक्त जी/उत्तर विभाग यांच्या मालमता अधिकारी कार्यालयात दि. 18.11.2024 या अंतिम दिनांकापर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी 11.00 ते दुपारी 04.30 या वेळेत प्रत्यक्ष सादर करावेत.

**अर्ज सादर करण्याची पद्धती व सुचना खालीलप्रमाणे आहेत.**

1. स्टॉलधारकाने आपले अर्ज आवक-जावक जी/उत्तर विभागात जमा करण्यापूर्वी मालमत्ता अधिकारी जी / उत्तर विभागात घेऊन यावेत. त्यानंतर सदर अर्ज आवक जावक विभागात स्विकारण्यात येतील.
2. आवक - जावक विभागात परस्पर अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच पोस्ट किंवा कुरियरने अर्ज पाठविल्यास ते रद्द समजण्यात येतील.
3. जाहीरातीत नमूद अंतिम दिनांकापर्यंत म्हणजेच दि. 18.11.2024 पर्यंतच अर्ज स्विकारले जातील त्यानंतर कोणतेही अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.
4. अर्ज कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी 11.00 ते दुपारी 04.30 पर्यंतच स्विकारले जातील.
5. अर्जासोबत स्वत:ची ओळख दर्शविणारे फ़ोटो असणारे (पॅनकार्ड, आधारकार्ड, पासपोर्ट, निवडणूक ओळखपत्र) कोणताही एक पुरावा ओळखपत्र म्हणून सादर करावा.
6. प्रत्यक्ष स्टॉलच्या कार्यस्थळी 05 स्वयंसेवक स्वच्छता करणे, गर्दीचे नियोजन करणे व इतर कामे करणे करीता पूर्णवेळ उपस्थित असणे अनिवार्य असून संबंधित स्वयंसेवकाचे ओळखपत्र (आधारकार्ड इ.) व मोबाईल क्रमांक अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे, त्याशिवाय अर्ज स्विकारले जाणार नाहीत. सदर स्वयंसेवक महापालिकेस योग्य ते सहकार्य करतील व दिलेल्या आदेशांचे पालन करतील.
7. प्राप्त अर्जाची वर्गवारी करून स्टॉलचे प्रत्यक्ष वाटप दि. 29.11.2024 रोजी सकाळी 11.00 वाजल्यापासून प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या तत्वावर करण्यात येईल. स्टॉलचे वाटप सकाळी 11.00 पासून संध्याकाळी 05.30 वाजेपर्यंत व स्टॉल शिल्लक असेपर्यत केले जाईल.
8. स्टॉल वाटपाच्या दिवशी वाटपत्र स्विकारण्यासाठी अर्जदाराने मूळ ओळखपत्रासह स्वत: हजर राहणे बंधनकारक आहे.
9. कोणत्याही कारणास्तव नातेवाईक किंवा प्रतिनिधीस वाटपपत्र देण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.
10. विहीत तारखेच्या म्हणजेच दि. 18.11.2024 रोजीच्या आत अर्ज जरी सादर केला असला तरी प्रत्यक्ष स्टॉल वाटप दिवशी जो अर्जदार प्रथम येईल त्याला प्रथम प्राधान्य देण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.
11. एका अर्जदारास फ़क्त एका वर्गवारीतील एक स्टॉलचे वाटप करण्यात येईल. अर्जदाराने एकापेक्षा अधिक वर्गवारीतील स्टॉलसाठी अर्ज केले असल्याचे किंवा एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त अर्ज केले असल्याचे निर्दशनास आल्यास त्याचे इतर अर्ज रद्द करण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी.
12. प्रत्यक्ष कार्यक्रमादरम्यान वाटप केलेल्या स्टॉलच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ व नीटनेटका ठेवण्याची जबाबदारी संबंधित स्टॉलधारकाची राहील, याची नोंद घ्यावी.
13. प्रत्येक स्टॉलधारकाकडून सौजन्याने व सामंजस्याने सामाजिक कार्य करणे हेतू सहकार्य अपेक्षित आहे. वाटप करण्यात येणा-या स्टॉलची वर्गवारी संख्या व शुल्क खालीलप्रमाणे आहे.

| अनु. क्र. | स्टॉलची वर्गवारी | स्टॉलचे शुल्क +18% GST | स्टॉलची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | मोफत पाणी वाटप | 25+ GST | 25 |
| 2 | मोफत अन्न वाटप | 25+ GST | 80 |
| 3 | कॅसेट स्टॉल | 100 + GST | 55 |
| 4 | मंडप | 750 + GST | 9 |
| 5 | सामान्य स्टॉल (औषध वाटप, पुस्तक स्टॉल इत्यादी) | 100 + GST | 300 |
| एकूण | | | 469 |

संपर्क पत्ता :- मालमता अधिकारी, खो.क्र. 45, दुसरा मजला, जी / उत्तर विभाग कार्यालय, हरिशचंद्र येलवे मार्ग, प्लाझा सिनेमाच्या मागे, दादर (पश्चिम), मुंबई - 400028. दूरध्वनी क्रमांक 69517800 / 990/991 / 992 वेळ सकाळी 10.30 ते दुपारी 02.00

टीप :- स्टॉलचे चलन मालमत्ता अधिकारी जी/उत्तर विभागात तयार करून स्टॉलबाबतचे शुल्क नागरी सुविधा केंद्र, जी / उत्तर विभाग कार्यालय, तळ मजला, ह. ये मार्ग, दादर (प.) मुं.- 400028 येथे सकाळी 11.00 ते संध्याकाळी 05.30 यावेळेतच भरणा करावा. (सार्वजनिक सुट्टी तसेच शनिवार व रविवार वगळून)

पीआरओ/१८०४/जाही/२०२४-२५

**स्वाक्षरी/-**
**सहाय्यक आयुक्त, जी / उत्तर**

स्वमर्जीने औषधोपचार करू नका.


# भातसा' पाणलोट क्षेत्रातील पावसामुळे नदीपात्रात गढूळ पाणी

## नागरिकांनी पाणी गाळून व उकळून पिण्याचे पालिकेचे आवाहन

प्रतिनिधी
■ मुंबई

भातसा जलाशयाच्या पाणलोट क्षेत्रात मागील ३ ते ४ दिवसांमध्ये सातत्याने पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे २१ ऑक्टोबर २०२४ पासून नदीपात्रात गढूळ पाणी आले आहे. परिणामी, मुंबई महानगरातील पूर्व उपनगरे व शहर विभागातील काही भागात गढूळ पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. गढूळता कमी करण्यासाठी महानगरपालिका जल अभियंता विभागामार्फत जलशुद्धीकरण केंद्रामध्ये योग्य ती उपाययोजना करीत आहे. पण खबरदारीचा उपाय म्हणून नागरिकांनी पाणी गाळून व उकळून प्यावे, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

मुंबईतील नागरिकांना सात जलस्त्रोतांद्वारे दैनंदिन पाणीपुरवठा केला जातो. या जलस्त्रोतापैकी भातसा जलाशयाच्या पाणलोट क्षेत्रात गत ३ ते ४ दिवसांत जोरदार पाऊस कोसळला आहे. परिणामी, नदीपात्रातून येणाऱ्या पाण्याची गढूळता २१ ऑक्टोबर २०२४ पासून वाढल्याचे निदर्शनास आले आहे.

मुंबई महानगरातील पूर्व उपनगरे आणि शहर विभागातील काही भागात गढूळ पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी महानगरपालिकेस प्राप्त झाल्या आहेत. पाण्यातील गढूळता कमी करण्याकरिता पाणी निर्जंतुकीकरणाकामी क्लोरीनचा देखील पुरेसा वापर केला जात आहे. या बाबी लक्षात घेता, नागरिकांनी गढूळ पाणीपुरवठा झाल्यास घाबरून जाऊ नये. गढूळ पाणी प्राप्त झाल्यास खबरदारीचा उपाय म्हणून पाणी गाळून व उकळून प्यावे, अशी विनंती करण्यात आली आहे.

# रेल्वेने दिवाळी साठी दादर - काझीपेट उत्सव विशेष ट्रेन

■ मुंबई

रेल्वेने दिवाळी मध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या वाढत्या संख्येची पूर्तता करण्यासाठी उत्सव दादर ते काझीपेट विशेष ट्रेनची सेवा वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. ०७१९६ / ०७१९५ दादर - काजीपेट साप्ताहिक विशेष (निजामाबाद, करीमनगर मार्गे) (१८ सेवा) तर ०७१९६ दादर- काजीपेट साप्ताहिक विशेष दि. २८ .११ .२०२४ ते दि. ३०.०१.२०२५ पर्यंत दर गुरुवारी चालवण्यासाठी वाढविण्यात आली आहे. (९ सेवा) गाडी क्रमांक ०७१९५ काझीपेट- दादर साप्ताहिक विशेष दि. २७.११.२०२४ ते २९.०१.२०२५ पर्यंत दर बुधवारी चालवण्यासाठी वाढविण्यात आली आहे. (९ सेवा), ०७१९६ / ०७१९५ चे थांबे: कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, नागरसोल, रोटेगाव, लासूर, औरंगाबाद, जालना, परतूर, सेलू, परभणी, पूर्णा, हजूर साहिब नांदेड, मुदखेड, उमरी, धर्माबाद, बसर, निजामाबाद, आरमुर, मेटपल्ली, कोराटला आणि लिंगमपेट जगित्याल असे आहेत.०७१९८ / ०७१९७ दादर- काजीपेट साप्ताहिक विशेष (पिंपळखुटी, बल्लारशाह मार्गे) (१६ सेवा) तर ०७१९८ दादर- काझीपेट साप्ताहिक विशेष ०१.१२.२०२४ ते २६.०१.२०२५ पर्यंत दर रविवारी चालवण्यासाठी वाढविण्यात आली आहे. (८ सेवा) तसेच ०७१९७ काझीपेट - दादर साप्ताहिक विशेष दर शनिवारी ३०.११.२०२४ ते २५.०१.२०२५ पर्यंत चालवण्यासाठी वाढविण्यात आली आहे. (८ सेवा)

# रेल्वे पोलिसांच्या तत्परतेने बारा तासात बॅग सापडली

प्रतिनिधी
■ मुंबई

दि.२१ रोजी संध्याकाळी लोअर परळ स्थानकात अज्ञात इसमाने गाडीत बसलेल्या मोहिनी कांबळे या महिलेचा मोबाईल हिसकाविण्याचा प्रयत्न केला. या घटनेत मोहिनी या चालत्या रेल्वेतून खाली पडल्या. त्यांना किरकोळ मुका मार लागला असून मुंबई सेंट्रल लोहमार्ग पोलीस ठाण्यात दोन अज्ञात इसमांविरोधात वेगवेगळया कलमांतर्गत गून्हा नोंदविण्यात आला आहे.

ग्रँट रोडला कामाला जात असताना घाटकोपर स्थानकावरून जलद रेल्वे पकडली. कामाला उशीर होत आहे; म्हणून संध्याकाळी पश्चिम रेल्वेच्या दादर येथून ७:४५ ची लोकल पकडली. घाई गडबडीत त्या दीव्यांगाच्या आरक्षित डब्यात चढल्या. व डब्यात दाराजवळ त्या मांडी घालून खाली बसल्या. लोअर परळ स्थानकात रेल्वे थांबली असता काही क्षणात एक इसम डब्यात चढला. व गाडी चालू झाली असता, अचानक त्या इसमाने मोहीनी यांचा मोबाईल हिसकाविण्याचा प्रयत्न केला. परंतू, मोबाईल त्यांनी घट्ट पकडला होता त्यामुळे त्या चालत्या रेल्वेमधून खाली स्थानकावर पडल्या. नशीबाने त्या रेल्वेखाली येता - येता अगदी थोडक्यात बचावल्या. यादरम्यान त्यांची बॅग रेल्वेमध्ये राहिली. त्या बॅगेत त्यांचा पगार व सोन्याची चैन आणि कानातील टॉप्स असा एकूण लाख भर रुपयाच ऐवज होता.

या घटनेमुळे मोहीनी फार भयभीत झाल्या होत्या. त्यांच्या शरीराचा थरकाप उडत होता. त्यांना किरकोळ मुका मार लागला आहे. त्यांनी ताबडतोब स्टेशन मास्टर स्नेहल जाधव, यांची भेट घेऊन झाला प्रकार सांगितला. या घटनेविरोधात मुंबई सेंट्रल लोहमार्ग पोलीस ठाण्यात दोन अज्ञात इसमाविरोधात रात्री गुन्हा दाखल केला. वरिष्ठ पोलीस निरिक्षक हेमराज कुंभार यांनी घटनेची गांभीर्याने दखल घेत तपासाची सूत्र फिरवली असता अवघ्या बारा तासाच्या आत एका आरोपीला अटक करण्यात आली त्यांच्याकडून चोरी झालेली बॅग हस्तगत करण्यात आली आहे. दुसरा आरोपी फरार असून पुढील तपास पोलीस उप निरीक्षक एन.आर.इंद्रोले करत आहेत.

# अवयवदानामुळे यावर्षी 133 नागरिकांना मिळाले जीवदान

## पुण्यकार्याला संमती देणाऱ्या कुटुंबांची संख्या वाढतेय

प्रतिनिधी
■ मुंबई

ज्यात अवयवांची गरज असणाऱ्या रुग्णांची मोठी प्रतीक्षा यादी आहे. कारण ज्या तुलनेत अवयवांची गरज असते, त्या तुलनेत आपल्याकडे मेंदूमृत (ब्रेनडेड ) व्यक्तीचे अवयवदान होत नाही. याचपार्श्वभूमीवर राज्यात अवयवदान आणि अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया या मोठ्या प्रमाणावर होण्यासाठी याच महिन्याच प्रथमच धोरण जाहीर करण्यात आले आहे. अशातच एक आनंदाची बातमी समोर येत आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी अवयवदानाला संमती देणाऱ्या कुटुंबीयांची संख्या वाढताना दिसत आहे. त्यामुळे यंदा राज्यात ११३ नागरिकांना जीवनदान मिळाले आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षभरात मेंदूमृत अवयवदानाला संमती देणाऱ्या कुटुंबीयांची संख्या वाढली आहे. गेल्या वर्षी ५० अवयवदान करण्यात आले होते. मात्र यावर्षी ऑक्टोबर महिन्याच्या 21 तारखेपर्यंत ५० मेंदूमृत नागरिकांचे अवयवदान करण्यात आले आहे. गेल्या वर्षीची संख्या ऑक्टोबरमध्ये पूर्ण झाल्याने पुढील दोन महिन्यांत हा आकडा आणखी वाढू शकतो, असे मत वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे.



वैद्यकीय तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, यावर्षी आम्हाला आशा आहे की, अवयवदानाचा आकडा हा ७५ पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. यासाठी अवयवदान जनजागृतीमध्ये नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेणे गरजेचे आहे. जर असे झाले तर अवयवांच्या प्रतीक्षेत असणाऱ्या रुग्णांना याचा फायदा होणार आहे. कारण आतापर्यंत मिळालेल्या ५० अवयवदानामधून १३३ नागरिकांना जीवदान मिळाले आहे. तसेच वैद्यकीय विश्वात अवयव प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया यशस्वी होत आहेत. त्यामुळे अवयव निकामी झालेले रुग्ण अवयव मिळविण्यासाठी प्रतीक्षा यादीत नोंद करून ठेवत आहेत. कोरोना पूर्व काळात २०१९ मध्ये ७३ मेंदूमृत अवयव दात्यांनी अवयवदान केले होते. मात्र कोरोनानंतर अवयवदानाची प्रक्रिया मंदावली होती. पण आता २०२४ मध्ये अवयवदानाच्या प्रक्रियेला पुन्हा वेग आला आहे.

### मुंबई, पुण्यातून ब्रेनडेड अवयवदानाचे मोठे काम

*राज्यात अवयवदान नियमनासाठी मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय अवयव प्रत्यारोपण संस्था काम पाहतात. या संस्था अवयवांसाठी विभागावर रुग्णांची प्रतीक्षा यादी बनवितात आणि त्यांना अवयव देण्याचे काम करतात. यामध्ये सर्वाधिक काम मुंबई आणि पुण्यातील संस्थांमधून मोठ्या प्रमाणात होते. आतापर्यंत या संस्थांमध्ये किडनी ७५ , लिव्हर ४३ , स्वादुपिंड १ , हृदय ८ , फुफ्फुस ५ , आणि छोटे आतडे १ दानामुळे मिळाले आहे.*



शिकणे कधीही थांबवू नका. वाढण्यासाठी आणि विकसित होण्यासाठी स्वत:ला आव्हान देत रहा.

- रतन टाटा
प्रसिध्द उद्योगपती

वृत्तमानस
मुंबई, बुधवार, २३ ऑक्टोबर २०२४

# फटक्या आधी सावध व्हा...

प्लास्टिकवर कितीही बंदी घातली असली तरी त्याचा रोजच्या जीवनात कोणत्या ना कोणत्या मार्गाने वापर करण्याचे धोरण आपण अंगीकारले आहे. त्यामुळे हा भस्मासुर कधी ना कधी तरी आपल्यावर उलटणार याची जाणीव असूनही त्याकडे सर्वजण कानाडोळा करतात. केवळ पर्यावरण नव्हे तर या प्लास्टिकने आता शेतीवर सुद्धा संक्रांत आणली असल्याचे एका अहवालात स्पष्ट झाले आहे. मुळात तसा प्लास्टिक आणि कृषी क्षेत्र यांचा जवळचा संबध आहे. एकूण प्लास्टिक निर्मितीमधील किमान सात ते आठ टक्के प्लास्टिक कृषी उद्योगात वापरले जाते, ज्यामध्ये पाण्याचा काटेकोरपणे वापर व्हावा म्हणून शेतजमिनीस मल्चिंग करणे, ठिबक सिंचन व्यवस्था, शेततळ्यांचे अस्तर, हरितगृह निर्मिती, धान्य मळणीसाठी, झाकण्यासाठी, धान्याच्या गोणी यासाठी मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक वापरले जाते, जे जेमतेम दोन वर्षे टिकते आणि नंतर शेतबांधावर अथवा शेतामध्येच कुठेतरी फेकून दिले जाते. तालुका पातळीवर गावामधून गोळा केलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याचे खत केले जाते. हे खत जवळपास ३० टक्के प्लास्टिकच्या लहान तुकड्यांनी भरलेले असते, जे शेतकऱ्यांना अल्प किमतीत सहज उपलब्ध होते. हे खत तेथून शेतात येते आणि शेतजमीन प्लास्टिकने समृद्ध होत असल्याने जमिनीची उत्पादन क्षमता बिघडत चालली असताना भूगर्भातील पाण्याचे प्रमाणसुद्धा आटत चालले असल्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे जगातील मातीत प्लास्टिक चिंताजनक वेगाने जमा होत असून, त्याकडे वेळीच गांभीर्याने पाहिले पाहिजे. शेतीमध्ये प्लास्टिक सर्वव्यापी आहे. मॅक्रोप्लास्टिक्सचा वापर पालापाचोळा आणि चाराभोवती संरक्षक आवरण म्हणून केला जातो. ते हरितगृह आणि घटकांपासून पिकांचे संरक्षण करीत असल्याने वापर वाढत चालला आहे. परंतु कालांतराने मायक्रो प्लास्टिक हळूहळू जमिनीत मुरते. हे मायक्रोप्लास्टिक्स पृथ्वीची भौतिक रचना बदलू शकते आणि तिची पाणी धरून ठेवण्याची क्षमता मर्यादित करू शकते. त्यामुळे मुळांची वाढ आणि पोषक द्रव्ये कमी होऊन झाडांवर परिणाम होऊ शकतो. प्लास्टिकमधील रासायनिक पदार्थ जे मातीत मिसळतात ते अन्नमूल्य साखळींवरदेखील परिणाम करू शकतात आणि आरोग्यावर परिणाम करू शकतात. काही देशांनी प्लास्टिकच्या मायक्रोस्फेअरवर बंदी घातली आहे. परंतु इतर अनेक मायक्रोप्लास्टिक पाण्याच्या प्रणालीमध्ये प्रवेश करीत आहेत, हे नाकारून चालणार नाही. यामध्ये सिगारेटच्या फिल्टरपासून ते टायरच्या घटकांपर्यंत, कपड्यांपासून सिंथेटिक फायबरपर्यंत सर्व गोष्टींचा समावेश आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की मायक्रोप्लास्टिक्सचे वेगवेगळे आकार आणि रचनेमुळे ते सांडपाण्यात आल्यावर काढणे कठीण होते. प्लास्टिकच्या मातीत होणाऱ्या परिणामांवर अजूनही मर्यादित संशोधन आहे. पण मातीच्या आरोग्यावर आणि उत्पादकतेवर नकारात्मक परिणाम झाल्याचे पुरावे मिळाले आहेत. ५० मायक्रो ग्रॅम किंवा त्यापेक्षा कमी जाडीच्या पिशव्यांच्या निर्मिती आणि वापरावर कायद्याने बंदी आणि कठोर शिक्षेची तरतूद असतानाही मोठमोठ्या महानगरांत, लहान-मोठ्या शहरांत या पिशव्या प्रतिदिनी कित्येक लाखांच्या संख्येने वापरल्या जातात. तेथून त्या ओल्या कचऱ्यात मिसळून विघटन होणाऱ्या काळया पिशवीमधून डम्पिंग ग्राउंडवर पोहोचतात. नियम असले तरी अनेक मोठमोठ्या दुकानांत नियम पाळले जातात, पण फुटकळ व्यापारी, टपरीवाले, भाजी बाजार येथे या नियमांचे अगदी सहजपणे उल्लघंन होते. कृषी क्षेत्रास म्हणजे शेतकऱ्यांना पुरविले जाणारे सर्व प्लास्टिक हे शासकीय अनुदानांची झालर लावून वाटले जाते. मग ते हरितगृहे असोत अथवा शेड नोट, शेततळे असोत किंवा ठिबक सिंचनाच्या नळया किंवा मल्चिंग हे सर्व प्लास्टिक खताप्रमाणे बांधावरच उपलब्ध होते आणि एकदा त्यांचा वापर संपला की ते पुन्हा बांधावर येऊन स्थिर होते, जे काही काळाने हवेत उडून जाते अथवा फारच अडचणीचे झाले तर त्याला जाळले जाते. कृषी क्षेत्रात प्लास्टिकचा वापर अनिवार्य आहे. म्हणूनच वापरानंतर ते कचरा म्हणून टाकून देण्यापेक्षा प्रत्येक गाव पातळीवर ग्रामपंचायत, नगर परिषद नियंत्रित प्लास्टिक पुनर्निर्माण केंद्र स्थापन होणे ही काळाची गरज आहे. मुळात वापरलेल्या हजारो किलो प्लास्टिकवर प्रक्रिया करण्यासाठी शेतकऱ्यांना दोन पैसे मिळतील याची व्यवस्था यामधून करण्यात यावी. ग्रामपंचायत, नगर परिषदेतर्फे कंपोस्ट प्रक्रियेपूर्वी कचऱ्यामधून प्लास्टिक काढून घेण्यात यावे. गावात प्लास्टिकला सार्वजनिक ठिकाणी फेकण्यास बंदी आहे, असे फलक लावले पाहिजेत. शाळा, महाविद्यालये, शासकीय, निमशासकीय कार्यालयांत प्लास्टिक बंदी, त्यासाठी गावपातळीवर जागृती निर्माण करणारा कक्ष आणि प्लास्टिकचे आरोग्यावर होणारे परिणाम याचा कृषी विभागाकडून वेळोवेळी जागर करण्यात आला तरच कृषी क्षेत्रामध्ये होणाऱ्या प्लास्टिक वापरावर नियंत्रण येऊ शकते. खरेतर प्लास्टिकचे उघड्यावर होणारे ज्वलन हवा प्रदूषित करते आणि अनेक घातक आजारांना आमंत्रण देते. या आजारांत श्वसनाचे आजार आणि कर्करोग यापैकी प्रथम क्रमांकावर कोण यासाठी आपापसात स्पर्धा सुरू आहे. एका संशोधनानुसार जगामधील तब्बल ५० हजार ७०२ नगरपालिका, महानगरपालिकांचे दैनंदिन कचरा व्यवस्थापन गृहीत धरले आहे. ही बंद काळी पिशवी महानगरपालिकेचे कर्मचारी विश्वासाने स्वीकारतात. डम्पिंग ग्राउंडवर कायम आग पेटलेली असते, ती तेथील मिथेन या ज्वलनशील घातक वायू आणि त्यात जळणाऱ्या प्लास्टिकच्या पिशव्यांमुळे. वाढत्या लोकसंख्येची भूक मिटविण्यासाठी शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्याशिवाय पर्याय नाही आणि जिथे विकसित तंत्रज्ञान येते तेथे प्लास्टिकशिवाय पर्याय नाही म्हणूनच येत्या काळात कृषी क्षेत्रात प्लास्टिकचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. कृषीमधील एक संशोधन सांगते की विकसनशील देशामध्ये शेतजमिनीत आज १२ टक्क्यांपेक्षा जास्त प्लास्टिक सूक्ष्म कणांच्या रूपात विसावलेले आहे. आपण वेळेतच नियंत्रण आणले नाही तर ही टक्केवारी निश्चितच वाढत जाणार यात शंकाच नाही. प्लास्टिक प्रदूषणामध्ये जगात सर्वप्रथम येण्याचा मान आपल्या देशाला मिळाला ते केवळ प्रशासनाच्या प्लास्टिक हाताळण्याच्या अकार्यक्षम प्रणालीमुळे. विशेष म्हणजे या संशोधनात कृषी क्षेत्रामधील वाढत्या प्लास्टिकचा कुठे उल्लेख नाही, मात्र भारतासारख्या कृषीप्रधान देशासाठी हा वापर उल्लेखनीय असू शकतो. म्हणूनच यासाठी शेतकऱ्यांना अनुदानावर प्लास्टिक पुरविणारे शासन आणि ते उचलणारे शेतकरीच एकत्र येऊन मोलाचे कार्य करू शकले तरच या भस्मासुराचे कृषी निगडीत अवयव निकामी होऊ शकतात. आज भारताची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. त्यानुसार प्लास्टिकचा वापर आणि मागणीसुद्धा वाढत चालली आहे. प्लास्टिक निर्मूलन हे जेवढे आपण कमीत कमी प्लास्टिक वापरू यावर अवलंबून आहे त्यापेक्षाही वापरलेल्या प्लास्टिकचे पुनर्निर्माण करो करता येईल, हे समजून घेणे तेवढं आवश्यक आहे. वैयक्तिक पातळीवर हे साध्य झाले की लोकसहभागातून हा प्रदूषणाचा ज्वलंत प्रश्न सहज सोडवता येतो. पालिकांचे हे काम आहे असे म्हणून जबाबदारी झटकण्यात आपणच सर्वजण आघाडीवर असतो. त्यामुळे आज आपण सर्वच प्लास्टिक कल्चरला वाहून गेलो आहोत. त्यात शेती आणि शेत जमिनीसुद्धा. या कल्चरचा मोठा फटका भविष्यात बसण्यापूर्वी वेळीच सावध होणे आवश्यक आहे.

# महान स्वातंत्र्य सेनानी राणी चेन्नमा



इंग्रजांनी आपल्या देशावर सुमारे पावणे दोनशे वर्ष राज्य केले. या पावणे दोनशे वर्षांत त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय अत्याचार केले. इंग्रजांच्या याच अन्याय अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात अज्ञात देशभक्त बांधवांनी लढा दिला त्यात काही महिलाही होत्या हे मात्र अतिशय कमी लोकांना माहीत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महिलांची यादी जर काढली तर अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या महिलांची नावे आपल्याला आठवतील कारण बऱ्याच महिला स्वातंत्र्य सैनिकांची म्हणा किंवा देशासाठी त्याग करणाऱ्या देशभक्त महिलांची म्हणा आपल्या इतिहासकारांनी नोंदच घेतली नाही त्यामुळे त्यांचा इतिहास नवीन पिढीच्या समोर आलाच नाही. अशाच एका देशभक्त महिला स्वातंत्र्य सेनानीच्या शौर्याची माहिती आज आपण या लेखातून घेऊ कारण आज त्या महान महिला स्वातंत्र्य सेनानीची जयंती आहे. त्या महान स्वातंत्र्य सेनानीचे नाव आहे कित्तुरची राणी चेनम्मा.

२३ ऑक्टोबर १७७८ रोजी बेळगाव येथील काकटी या छोट्या गावात राणी चेन्नमा यांचा जन्म झाला. लहानणापासूनच धाडसी असलेल्या राणी चेन्नमा यांना त्यांचे वडील धुळाप्पा देसाई गौड्रारू यांनी घोडेस्वारी करणे, तलवार चालवणे, भाला फेकणे याचे शिक्षण दिले. वयाच्या पंधराव्या वर्षी राणी चेन्नमा यांचा विवाह देसाई कुटुंबातील राजा मल्लसराज यांच्याशी झाला. मात्र १८२४ हे वर्ष त्यांच्यासाठी दुर्भग्याचे वर्ष ठरले कारण याच वर्षी त्यांच्या पतीचे आणि मुलाचेही निधन झाले. एकाच वर्षी पती आणि मुलगा सोडून गेल्याने त्यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. राजा मल्लसराज यांच्या निधनाने त्यांच्या राज्यात अस्थैर्य माजले याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी त्यांच्या राज्यावर आक्रमण करण्याचे ठरवले. इंग्रजांकडून राज्य वाचवण्याची फार मोठी जबादारी राणी चेन्नमा यांच्यावर येऊन पडली मात्र त्या डगमगल्या नाहीत. त्यांनी तात्काळ आपली राजधानी डोंगर भागात हलवली. राजगादीला वारस असावा म्हणून त्यांनी शिवलिंगप्पा नावाचा पुत्र दत्तक घेतला व त्याला राज्याचा उत्तराधिकारी बनवले मात्र तत्कालीन ब्रिटिश अधिकारी लॉर्ड डलहौसी याने दत्तक विधान नाकारत शिवलिंगप्पा याची राज्याचा वारसदार म्हणून हाकलपट्टी करण्याचा आदेश दिला. जर एखाद्या राज्याचा राजा निधन पावला आणि त्याला वारस नसेल तर दत्तक असलेला पुत्र राज्याचा वारस होऊ शकत नाही त्यामुळे ते राज्य खालसा करून तिथे ब्रिटिश अंमल सुरू करण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला होता त्यामुळे कोणत्याही परस्थितीत आपले राज्य इंग्रजांच्या ताब्यात जाऊ द्यायचे नाही असा निर्धारच राणी चेन्नमा यांनी केला होता.

कित्तुरचे राज्य हे धारवाड जिल्ह्यात येत होते. सेंट जॉन थाच्रेय हा त्यावेळी धारवाडचा गव्हर्नर होता तर चॅप्लिन हा कमिशनर होता. या दोघांनीही राणी चेन्नमा यांना राज्य खालसा करण्याची सूचना केली आणि तसे न केल्यास युद्धास तयार राहण्यास सांगितले. राणी चेन्नमा यांनी शेवटचा पर्याय म्हणून बॉम्बे प्रेसिडेंटचे लेफ्टनंट गव्हर्नर एल्फिन्स्टन यांना राज्य खालसा करण्याबाबत विनंती अर्ज केला मात्र त्यांनी तो धुडकावून लावत कितुरवर हल्ला चढवला. इंग्रजांनी कित्तुरवर हल्ला चढवला आणि कित्तुरचा खजिना लुटण्याचा प्रयत्न केला. कित्तुरच्या खजिन्यात त्यावेळी मौल्यवान दागदागिने आणि दीड कोट रुपये इतका खजिना होता. इंग्रजांच्या मद्रास नेटीव्ह हॉर्स अर्टेलरीच्या तिसऱ्या तुकडीत २० हजारांपेक्षा अधिक सैनिक होते त्यात सुमारे ४०० पेक्षा अधिक सैनिक हे बंदूकधारी होते मात्र राणी चेन्नमा यांचे सैन्यही कमी नव्हते त्यांनी इंग्रज सैन्या विरुद्ध निकराचा लढा दिला आणि इंग्रज सैन्याचा धुव्वा उडवला. राणी चेन्नमा यांचे सैन्य आपल्याशी अशाप्रकारे धैर्याने मुकाबला करतील अशी अपेक्षा इंग्रजांना नव्हती त्यांनी राणी चेन्नमाच्या सैन्याला हलक्यात घेतले. राणी चेन्नमाचे सैन्याचे बळ इंग्रजांच्या तुलनेत अल्प होते मात्र राणी चेन्नमा यांनी आपल्या सैनिकांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. आपली राणी महिला असूनही इंग्रजांशी निकराने लढते हे पाहून त्यांनाही स्फुरण चढले आणि त्यांनी इंग्रज सैन्याचा पराभव केला. या युद्धात सेंट जॉन हा गव्हर्नर मारला गेला. इंग्रजांच्या काही अधिकाऱ्यांना राणी चेन्नमा यांच्या सैनिकांनी बंदी बनवले. युद्ध बंदी करण्याच्या अटीवरच या अधियाऱ्यांची सुटका करण्यात आली. युद्ध बंदीचा करार करूनही इंग्रज अधिकाऱ्यांनी तो पाळला नाही. कमिशनर चॅप्लिन याने मोठ्या ताकदीनिशी कुत्तुरवर पुन्हा हल्ला केला. यावेळीही राणी चेन्नमाच्या सैन्याने निकराने लढा दिला मात्र बैल होगल किल्ल्यात राणी चेन्नमा पकडल्या गेल्या आणि त्यांना कैदेत टाकण्यात आले. २१ फेब्रुवारी १८२९ रोजी इंग्रजांच्या कैदेतच राणी चेन्नमा यांचे निधन झाले. राणी चेन्नमा यांच्या निधनानंतरही राणीचे सैन्य इंग्रजांशी लढत राहिले मात्र तो लढा अपयशी ठरला. मात्र राणी चेन्नमा यांचे शौर्य पाहून इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांना सलाम केला. राणी चेन्नमा यांचे शौर्य इतिहासाच्या पानावरील एक स्फूर्तिदायक अध्याय आहे मात्र आजही हा इतिहास तरुण पिढीपासून दूर आहे म्हणूनच हा लेख प्रपंच. भारतीय इतिहासातील एक सुवर्ण अध्याय म्हणून राणी चेन्नमा यांच्या लढ्याकडे पाहायला हवे. जयंतीदिनी राणी चेन्नमा यांना विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार
पुणे

## पत्र मानस

### दारात मातीच्या पणत्या लावा!

दिवाळी काही दिवसांवर येऊन ठेपल्याने बाजारपेठा रंगीबेरंगी कंदील, पणत्या, विजेची तोरणे, रांगोळीचे रंग यांनी सजल्या आहेत. जीवनातील निरुत्साह, निराशा आणि नकारात्मकतेच्या अंधकाराकडून उत्साहाच्या, चैतन्याच्या आणि सकारात्मकतेच्या प्रकाशाकडे जाण्याचा संदेश देणाऱ्या दीपावली सणाला हजारो वर्षांचा इतिहास आहे. दिवाळीला दीपावली असेही म्हटले जाते. दीपावली म्हणजे दिव्यांची रांग. दिवाळी खरेतर दिव्यांचा उत्सव. दिवाळीत मातीच्या पणत्यांमध्ये तेलाची वात लावून दारात दोन्ही बाजूंना, दारात काढलेल्या रांगोळीजवळ आणि तुळशीजवळ त्या ठेवल्या जातात. पूर्वी दारासमोर टांगलेल्या आकाशकंदिलातही मातीची पणती लावत. कालानुरूप यामध्ये बदल होत गेला आणि मातीच्या पणतींची जागा हळू हळू विद्युत दिव्यांनी घेण्यास सुरुवात केली आहे. पणतीसारखे दिसणारे लुकलुकणारे दिवे बाजारात मिळू लागले आहेत. सेल किंवा विद्युत प्रवाहावर चालणारे हे दिवे प्रकाश देत असले तरी पणत्यांमधून प्रक्षेपित होणारी सात्विकता यामध्ये नाही. विजेच्या कृत्रिम दिव्यांमुळे मातीचे दिवे बनवणारी आणि ती विकणारी गोरगरीब मंडळी यांच्यावर संक्रांत येऊ लागली आहे. मातीच्या दिव्याची सर या निर्जीव दिव्यांना कशी येणार ? त्यामुळे या लुकलुकणाऱ्या दिव्यांच्या मोहात न पडता दिवाळी सणामागील शास्त्र लक्षात घेऊन मातीच्या पणत्याच खरेदी कराव्यात. जेणेकरून त्या विकणाऱ्या आणि बनवणाऱ्या गरिबांच्या घरातही दिवाळी साजरी होईल.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

### न्यायिक नीतीमूल्ये की दैवी श्रद्धा ?

देशाच्या सरन्यायाधीशांनी अलीकडेच आपल्या गावाला भेट देऊन तेथील ग्रामदैवत असलेल्या यमाई देवीचे दर्शन घेतले. या वेळी त्यांनी एका निवाड्या प्रसंगी याच देवीने मार्ग सुकर केल्याचे व तिच्या आशीर्वादाने आपण या पदापर्यंत आल्याचे मत व्यक्त केल्याने त्यावर मतमतांतरे व्यक्त होताना दिसतात. यातून दैवी श्रद्धेमुळे जर सर्वोच्च पदावर जाता येत असेल, तर व्यक्तीची हुशारी, बुद्धिमत्ता, कर्तुत्व व सेवाजेष्ठता या गुणांचे काय ? भगवंत जर मार्ग शोधून देत असतील तर याचा अर्थ न्यायसंहिता कुचकामी ठरते असाच होतो. वास्तविक पाहता न्याय हा ईश्वरी श्रद्धेवर चालत नसून कायद्याच्या कलमानुसार चालतो. त्यामुळे प्रत्येकाने आपली धार्मिक श्रद्धा घरी ठेवूनच न्यायदेवतेच्या देवालयात येणे अपेक्षित आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे न्यायाची नेमकी देवता कोणती याचे उत्तर मात्र मिळत नाही. त्यामुळे न्यायव्यवस्था निष्पक्ष आहे का यावर प्रश्नचिन्ह उभे राहते. तसेच न्यायालयात अलीकडे धार्मिक प्रवृत्ती वाढीस लागत असल्याचेही स्पष्ट होते. तर दुसरीकडे न्यायमूर्ती बी.आर.गवई यांनी 'न्यायिक नीतीमूल्यांचे पालन अत्यावश्यक' असल्याचे मत एका समारंभात व्यक्त करून न्यायाधीशांना निष्पक्ष न्याय देण्याच्या दृष्टीने न्यायिक आचारसंहितेची आठवण करून दिली. जनतेचा न्यायपालिकेवरील विश्वास कायम राखण्यासाठी त्यांच्या विश्वासाला तडा जाणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे असते. अर्थात त्यासाठी नैतिक मूल्ये व सचोटी यांच्या अधीन राहून निर्भिड न्यायदान होणे अपेक्षित आहे. केवळ न्यायाला विलंब करून अन्याय व निष्प्रभतेची भावना वाढीस लागून जनतेचा न्यायावरील विश्वास उडू शकेल अशी भीती वाटते. म्हणूनच योग्य वेळेत अचूक व विश्वासार्ह न्यायदान होणे गरजेचे आहे. कारण न्यायाधीशांचे निवृत्तीपश्चातील वर्तन पाहता, त्यांच्या न्यायदानातील विश्वासार्हतेविषयी शंका वाटते. त्यामुळे न्यायमूर्तींनी व्यक्त केलेले राजकारणी, प्रशासकीय अधिकारी व जात - धर्म या संवेदनशील विषयांवर आधारित मार्मिक विचार व्यक्त करून सर्वांचे कान टोचले हे योग्यच झाले. तर एका ताज्या निकालातून सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना धर्मनिरपेक्षता हा राज्यघटनेच्या मूलभूत रचनेचा भाग असल्याचे स्पष्ट केले याचे समाधान वाटते. परिणामी या दोन भिन्न मतप्रवाहांतून न्यायिक नीतीमूल्ये, की दैवी श्रद्धा महत्त्वाची हा प्रश्न मात्र अनुत्तरीत राहतो.

**- पांडुरंग भाबल,भांडुप.**

### फटाक्यांचा अवैध साठा नको

राज्यात आगीच्या दुर्घटना कमालीच्या वाढल्या असल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाने फटाकांच्या अवैध साठवणीकीची गंभीर दखल घेतलेली आहे. दिवाळी जवळ आलेली आहे तर दुसरीकडे निवडणूकीचा हंगाम देखील आलेला आहे. जिथे सण आहे तिथे उत्साह आहे आणि जिथे उत्साह आहे तिथे फटाक्यांचा व्यवसाय नक्कीच जोरात आहे. व्यवसाय म्हटले की नफेखोरी आपोआप येतेच येते. मग नफा अधिक मिळविण्यासाठी बहुतेक फटाके विक्रेते मालाची अवैध साठवणूक करतात पण त्यामुळे मोठ्या प्रमाणात वायू व ध्वनी प्रदूषण होत असते. पर्यावरणाला हानिकारक आणि मानवी जीवनाला कायम अपायकारक ठरलेल्या फटाक्यांचा अवैध साठवणूकीची गंभीर दखल न्यायालयाने आता घेतलेली असून परवानगीशिवाय फटाकेची विक्री करणाऱ्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहे तेव्हा सातत्याने पर्यावरणाच्या हानी व वाढत्या अपघाताला कारणीभूत ठरलेल्या अवैध फटाकांचा साठा यापुढे तरी मुळीच नको असे वाटते.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

### जम्मू काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवादी हल्ले

जम्मू काश्मीरला विशेष अधिकार देणारे ३७० वे कलम हटवून त्या राज्याला केंद्र शासित प्रदेश घोषित केल्यानंतर काश्मीरमध्ये शांतता प्रस्थापित होईल अशी अपेक्षा होती, मात्र ती फोल होताना दिसतेय. कारण मागील काही दिवसांपासून जम्मू काश्मीरमध्ये दहशतवादी कारवायांनी जोर धरला आहे. काश्मीरमध्ये रोजच दहशतवादी हल्ले होत असून त्यात काही जवान शहीद होत आहेत अर्थात या दहशतवादी हल्ल्यांना आपले जवान तोडीस तोड उत्तर देत आहेत मात्र दहशतवादी हल्ले थांबायचे नाव घेत नाही. दहशतवादी नागरी वस्तीवर देखील हल्ले करीत आहेत त्यामुळे नागरिकांच्या मनात भीती निर्माण झाली आहे. केंद्र सरकार तसेच काश्मीरमधील ओमर अब्दुल्ला यांच्या नवनियुक्त सरकारने दहशतवाद्यांचे हे हल्ले गांभीर्याने घेऊन दहशतवाद्यांना त्यांची जागा दाखवून द्यावी. केंद्र तसेच काश्मीरच्या नवनियुक्त सरकारने दहशतवाद्यांच्या या कारवायांना किरकोळ समजून कानाडोळा केला तर भविष्यात त्याची मोठी किंमत मोजावी लागेल.

**- श्याम ठाणेदार, पुणे**

### मराठी भाषेचं वावडं आहे का ?

केंद्र शासनाच्या अखत्यारीत येत असलेल्या रेल्वे प्रशासनाला मराठी भाषेचा एवढा तिरस्कार का ? असा संतप्त सवाल पुन्हा पुन्हा विचारण्याचे कारण भांडुप ते बदलापूर जाण्याचा योग दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी आला. भांडुपमधून सायंकाळी ४.१३ ची लोकल पकडून बदलापूरला प्रस्थान करीत असताना एक दिड तासाच्या प्रवासादरम्यान मध्य रेल्वेचा खोडसाळपणा लक्षात आला असुन प्रवाशांसाठी ज्या प्रकारच्या सुचना, घोषणा मराठी भाषेत दयायचे सोडून हिंदीमध्ये दिल्या जात होत्या, काय गरज ? त्रिभाषा अंतर्गत केंद्र शासनाच्या अखत्यारीत येत असलेल्या यंत्रणेमध्ये मराठी भाषेचा वापर करणे बंधनकारक असुन सुद्धा लोकलमध्ये केवळ हिंदीचाच प्रचार का केला जातो ? त्यामुळे मराठी भाषेची गळचेपी केंद्र शासनाच्या मध्य रेल्वे प्रशासनाकडून होताना दिसत आहे असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. हिंदी भाषिक लोकांमुळे नव्हे तर मराठी माणसामुळे रेल्वे फायदयात आहे आणि हे विसरण्याची बेईमानी रेल्वेच्या संबंधीतांनी करून चालणार नाही. रेल्वेच्या महसूलात भर मराठी माणसामुळे आहे ही बाब रेल्वे प्रशासनाने नेहमीच लक्षात ठेवली पाहिजे. रेल्वे मधून प्रवास करणारे लोक बऱ्यापैकी मराठी भाषिक आहेत, मग लोकलमध्ये हिंदी भाषेत दिल्या जाणाऱ्या सुचना, घोषणा कोणाला ऐकवल्या जातात ? त्यामुळे यापुढे तरी मध्य रेल्वे प्रशासनाने लोकलमध्ये दिल्या जाणाऱ्या घोषणा, सुचनांमध्ये मराठी भाषेचा प्राधान्याने वापर करावा.

**- गणेश वराडे , भांडुप**

### पैसे वाटपाने सत्ता काबीज करण्याचा बेत

पुण्यातील खेड-शिवापूर परिसरात नाकाबंदीदरम्यान एका खासगी वाहनातून अंदाजे पाच कोटी रुपयांची रक्कम पोलिसांनी जप्त केली आहे. ऐन निवडणुकीत एवढ्या मोठ्या प्रमाणात रक्कम आढळून आल्यामुळे राज्यात मोठी खळबळ उडाली आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सत्ताधाऱ्यांवर गंभीर आरोप केले आहेत. लोकसभेलाही सत्ताधाऱ्यांनी पाण्यासारखा पैसा ओतून महाराष्ट्राच्या जनतेला विकत घेण्याचा प्रयत्न केला होता.महाराष्ट्र राज्य ताब्यात घेण्याच्या सत्ताधाऱ्यांचा मनसुबा असल्याने पाण्यासारखा पैसा ओतला जाणार आहे. प्रथम मोफत नंतर लाडक्या योजना आता पैसा वाटप अशा प्रकारे मतदाराला खरेदी करण्याचा खुलेआम बाजार मांडला आहे.सत्ता मिळविण्य़ासाठी वाटलेला पैसा सत्ता मिळाल्यावर जमा करण्य़ासाठी भ्रष्टाचार केला जातो.या लोकशाहीला कधी व कोण बदलणार? आपला कितीही विकास झाला तरी आपल्याला निवडणुकांत पैशांचा गैरवापर थांबवता आला नाही हे मान्य करावे लागते.निवडणुकीत काळाबाजार करणारे व्यापारी, साठेबाज, संघटित गुन्हेगारी वगैरे अवैध मार्गाने उपलब्ध होणारा काळ्या पैशांचा वापर कमी झालाच पाहिजे.मतदारसंघात पैसा वाटप झाल्यास तेथील सर्व पक्षांचे उमेदवार पुन्हा कधीच निवडणूक लढवू शकणार नाहीत असा निवडणूक आयोगाने नियम बनवावा.

**- विवेक तवटे, कळवा, ठाणे**

### 100 टक्के मतदान हीच खरी लोकशाहीची लक्षणे

भारतात स्वातंत्र्य मिळाल्यापासुन देशात अनेक निवडणुका झाल्या आहेत. मग त्या ग्रामीण भागातील खासदार, आमदार, जिल्हा परिषद, तालुका , शिक्षक मतदार संघ , गांव पातळीवरील ग्रामपंचायतीच्या निवडणुका सुद्धा असोत त्या चुरशीच्या होतात. शहरी भागात नगरसेवक, आमदार, खासदारांच्या, व शिक्षक मतदार संघाच्या निवडणुका होतात. परंतु ५५- ७० टक्केच मतदान होते. तर क्वचितच ८० टक्के मतदान पहायला मिळते. ग्रामीण भागात तर ३५-४० टक्के मतदान होऊन उमेदवार निवडुन येतो. देशातील "लोकशाही बळकट व सक्षम "होण्यासाठी १०० टक्के मतदान करण्यास प्रवृत्त करणे" खऱ्या लोकशाहीचेच लक्षण" आहे. ८५ - ९० टक्के मतदान व्हायलाच हवे. ३५ टक्के निवडुन आलेला उमेदवार १०० टक्के लोकांसाठी काम करीत असेल तर" शोकांतिका" आहे. कमी टक्केच्या मतदानात " योग्य व लायक "उमेदवार निवडले जातात असे नाही. यात "लोकशाहीचा खरा कस "लागत नाही " लोकांनी लोकांचे, लोकांसाठीचे लोकशाही शासन व जनतेचा खरा उमेदवार निवडला गेला पाहिजे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या घटनाकारांनी " संविधान " घटनेने दिलेला मतदानाच्या अधिकाराचा वापर सद् सद् विवेक बुद्धीने करणे "देशहितासाठी, जागृत नागरिकांसाठी व राज्यासाठी मोलाचे "आहे. सुजान "तरूण नागरिक" हेच या भारत देशाचे" बलस्थान" आहे. बलशाही जागृत नागरिक हीच राज्याची" शक्ति" आहे. आणि "जनमनाचा वैचारिक पायंडा लोकशाहीसाठी " सदैव " जपला गेला पाहिजे. तरच १०० टक्के मतदान अपेक्षित आहे.

**- अनंत दत्ताराम दाभोळकर. अंधेरी**

## 'हिट अँन्ड रन' प्रकरणातील आरोपीच्या अटकेची मागणी

**ठाणे :** आलिशान मोटारकारने सोमवारी पहाटे दुचाकीचालकाला उडविणाऱ्या अभिजित नायर (वय २६, रा. ठाणे) याची अपघातग्रस्त कार जप्त केल्याची माहिती सहायक पोलिस आयुक्त प्रिया डमाळे यांनी मंगळवारी दिली. नौपाडा पोलिसांनी मंगळवारी सायंकाळी अभिजितला ताब्यात घेतले आहे. या घटनेत दुचाकीचालक दर्शन हेगडे (वय २१, रा. ज्ञानेश्वर नगर, ठाणे) यांचा मृत्यू झाला. संत ज्ञानेश्वर नगरातील साईकृपा चाळीत राहणाऱ्या दर्शनच्या कुटुंबीयांची मनसेचे ठाणे-पालघर जिल्हाप्रमुख अविनाश जाधव यांनी भेट घेतली. त्यानंतर त्यांनी फरार आरोपीवर कडक कारवाईची मागणी केली. घटनास्थळी मिळालेल्या मोटारकारच्या नंबर प्लेटच्या आधारे नायर याच्या मोटारकारचा नौपाडा पोलिसांनी शोध घेतला. तो बंगळुरूमधील एका खासगी कंपनीत नोकरीला आहे. त्याचे वडील सुरेश बाबू नायर हे खासगी सुरक्षा सुपरवायझर आहेत. कारच्या शौकिन असलेल्या अभिजित याने अलीकडेच पावणेचार लाखांत जुनी मर्सिडीज मोटारकार घेतल्याचे त्याच्या वडिलांनी पोलिसांना सांगितले. त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवरही वेगवेगळ्या महागड्या कारसोबत त्याचे फोटो असल्याचे आढळले आहे.

**म ह त्त्वा चे**

### सुदाम पवाळी, उल्हास भुर्के यांचा शिवसेनेत प्रवेश

**कर्जत :** कर्जत विधानसभा मतदारसंघमधील विजयाची नांदी ही सुदाम पवाळी आणि उल्हास भुर्के यांच्या प्रवेशाने झाली आहे. आपल्या समोर कोण आहे? यापेक्षा या मतदारसंघावरून शिवसेनेचा भगवा पुन्हा फडकवत ठेवायचा आहे, यासाठी कटीबध्द व्हा, असे आवाहन आमदार महेंद्र थोरवे यांनी केले. पवाळी यांची तालुकाप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. कर्जत मुरबाड राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावरील पोसरी येथील शिवतीर्थ सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या पक्षप्रवेश सोहळ्याला कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे, पक्षाचे उत्तर रायगड जिल्हा प्रमुख संतोष भोईर, जिल्हा संपर्क प्रमुख विजय पाटील, जेष्ठ नेते हनुमंत पिंगळे, उपजिल्हाप्रमुख भाई गायकर, विधानसभा संघटक शिवराम बदे, कर्जत तालुकाप्रमुख संभाजी जगताप, खालापूर तालुकाप्रमुख संदेश पाटील, युवा सेना तालुका अधिकारी अमर मिसाळ, महिला आघाडी सल्लागार सुरेखा शितोळे, माजी उपसभापती मनोहर थोरवे आदी मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमात युवा सेना तालुका संपर्कप्रमुख जयवंत शिनारे पदावर नियुक्तीपत्र देण्यात आली. या कार्यक्रमात खालापूर, कडाव ग्रामपंचायत परिसर, नेरळ, कर्जत शहर, आदी भागातील कार्यकर्त्यांनी प्रवेश केला.

### बचत गटांच्या सरस महोत्सवांना आचार संहितेची झळ

**ठाणे :** दिवाळीच्या मुहूर्तावर विविध खाद्यपदार्थ, पणत्या, शोभेच्या वस्तू, विद्युत रोषणाई यांची महिला बचत गटांकडून जोरदार विक्री करण्यात येते. यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे तालुक्यांच्या ठिकाणी भव्य असे सरस महोत्सव भरवले जातात. यातून काही लाख रुपयांची आर्थिक उलाढाल देखील होते. मात्र यंदा दिवाळीच्या कालावधीत विधानसभा निवडणुकीचा आचार संहितेचा काळ असल्याने हे सर्व सरस महोत्सव यंदा रद्द करण्यात आले आहे. यामुळे महिला बचत गटांचा हिरमोड झाल्याचे दिसून येत आहे. ठाणे जिल्ह्याच्या शहरी आणि ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात महिला बचत गटांचे जाळे पसरले आहे. जिल्ह्यात सदुस्थितीत सुमारे १० हजार महिला बचत गट असून याद्वारे एक लाख महिला बचत गटांना जोडल्या गेल्या आहेत. गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत सरकारच्या विविध योजनांच्या माध्यमातून भरीव निधीची तरतूद झाल्याने जिल्ह्यातील बचत गटांनी उभारी घेतल्याचे विविध गटांच्या उपक्रमातून दिसून येत असते.

# मविआत फूट? शेतकरी कामगार पक्षाने जाहीर केले 5 उमेदवार



प्रतिनिधी
■ रायगड

विधानसभा निवडणुकीचे उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली तरीही महाविकास आघाडीचं जागावाटप जाहीर झाले नाही. विदर्भातील काही जागांवरून अद्याप ठाकरे गट आणि काँग्रेस यांच्यात रस्सीखेच सुरू आहे. त्यातच महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या शेतकरी कामगार पक्षाने ५ उमेदवार जाहीर केले आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीत फूट पडली का अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

मागील अनेक दिवसांपासून मविआ नेत्यांच्या सातत्याने बैठका सुरू आहेत. परंतु जागावाटपात तिन्ही पक्षांचा दावा असलेल्या जागांवर वाद होत आहेत. आज शेतकरी कामगार पक्षाने अलिबाग, पेण, उरण, पनवेल आणि सांगोला येथील उमेदवार जाहीर केले. त्यात अलिबागमधून चित्रलेखा पाटील, पेणमधून अतुल म्हात्रे, उरण प्रीतम म्हात्रे, पनवेल बाळाराम पाटील, सांगोला बाबासाहेब देशमुख यांना तिकीट देण्यात आले आहे. आम्ही महाविकास आघाडीत आहोत, दिलेला शब्द बदललेला नाही असं विधानही उमेदवारांची घोषणा करताना जयंत पाटील यांनी केले आहे. अलिबाग येथील शेतकरी भवनात आज शेकापची बैठक झाली. त्यात ५ उमेदवारांचा निर्णय घेण्यात आला.

महाविकास आघाडीत सांगोल्यासह काही जागांवर शेतकरी कामगार पक्षाने दावा केला होता.

## जयंत पाटलांनी केली घोषणा

मात्र सांगोला येथे विद्यमान आमदार शिवसेनेचा असल्याने ती जागा ठाकरे गटाला दिली. याठिकाणचे आमदार शहाजी पाटील हे शिंदेसोबत गेले असले तरी ही जागा सोडण्यास ठाकरे गटाने नकार दिला. इतकेच नाही तर या जागेवर इच्छुक असलेले राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते दीपक आबा साळुंखे यांना ठाकरेंनी त्यांच्या पक्षात प्रवेश दिला. या मतदारसंघात ठाकरे गटाकडून दीपक साळुंखे रिंगणात असतील असं बोललं जाते. त्यामुळे नाराज शेतकरी कामगार पक्षाने शरद पवारांची भेट घेतली. परंतु कुठलाही सकारात्मक तोडगा निघत नसल्याने आज अलिबाग येथे शेतकरी कामगार पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांची बैठक बोलावण्यात आली.

# गणपत गायकवाडांच्या पत्नीला भाजपकडून उमेदवारी मिळाल्याने शिंदे शिवसेनेत नाराजी

प्रतिनिधी
■ कल्याण

विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर भाजपाने पाच दिवसांनी आपल्या 99 उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. एका विद्यमान आमदाराचा पत्ता कट करत 79 जणांना संधी आहे. तर 4 विद्यमान आमदारांऐवजी त्यांच्या नातेवाईकांना उमेदवारी दिली आहे. या यादीत कल्याण पूर्वचे शहरप्रमुख महेश गायकवाड यांच्यावरील गोळीबार प्रकरणातील आरोपी भाजपाचे आमदार गणपत गायकवाड यांच्या पत्नीला उमेदवारी जाहीर केली आहे. मात्र भाजपाच्या निर्णयावर शिवसेना शिंदे गटाकडून विरोध होताना दिसत आहे. त्यामुळे सध्या महायुतीत नाराजीचे वातावरण



आहे.

भाजपा आमदार गणपत गायकवाड यांनी शिवसेना शिंदे गटाचे कल्याण शहर प्रमुख महेश गायकवाड आणि राहुल पाटील यांच्यावर 2 फेब्रुवारी 2024 रोजी रात्री उशिरा गोळ्या झाडल्या होत्या. धक्कादायक बाब म्हणजे हिललाइन पोलीस स्टेशनमध्ये वरिष्ठ पोलीस अधिकारी महेश जगताप यांच्या दालनातच हा थरारक प्रकार घडला होता. जमिनीच्या वादातून महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार केल्याचं गणपत गायकवाड यांनी सांगितले.

त्यांनी म्हटले होते की, माझ्या मुलाच्या अंगावर महेश गायकवाड धावून आले होते. पोलीस स्टेशनबाहेरही त्यांनी शेकडो मुलं जमा केली होती. हा सगळा प्रकार मला सहन झाला नाही. जर माझ्यासमोर माझ्या मुलाला ते हात लावत असतील, तर माझा जगून तरी काय फायदा? त्यामुळे आत्मसंरक्षणासाठी मी गोळीबार केला होता. मी केलेल्या गुन्ह्याचा मला अजिबात पश्चाताप होत नाही, असेही त्यांनी म्हटले होते. दरम्यान, या गुन्ह्याप्रकरणी गणपत गायकवाड हे तळोजा जेलमध्ये आहेत.

# अजित पवारांच्या राष्ट्रवादीला महाडमध्ये धक्का

प्रतिनिधी
■ महाड

रायगडमध्ये अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला धक्का बसलाय. महाड विधानसभा अध्यक्ष बाबू खानविलकर यांनी राष्ट्रवादीला रामराम ठोकलाय. ते उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. खानविलकर हे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचे निकटवर्तीय आहेत.

विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर होताच उमेदवारीसाठी नेत्यांकडून फिल्डिंग लावण्यात येत आहे. तर नाराज उमेदवार तिकीटासाठी एका पक्षातून दुसऱ्या पक्षात जात आहेत. विधानसभा निवडणूक पार्श्वभूमीवर महायुतीला महाड विधान सभा मतदार संघात मोठा झटका बसलाय. या पक्ष बदलाचा मोठा फटका अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला बसत आहे. गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी पक्षातून मोठ्या प्रमाणात आऊटगोइंग सुरू आहे.

राष्ट्रवादी पक्ष आणि चिन्ह्यावरील सुनावणीत सुप्रीम कोर्टाने अजित पवार गटाला दिलासा. मात्र पक्षातील बंड आणि होणारी ऑऊटगोइंग पाहता ऐन निवडणुकीच्या काळात अजित पवारांची चिंता वाढलीय. दररोज कोणता ना कोणता नेता किंवा पदाधिकारी पक्षाला रामराम ठोकत आहे. अजित पवारांना कोकणातून एकाच दिवसात दोन धक्के मिळालेत. सकाळी राजापूर लांजा साखरपा मतदारसंघातील नेते अजित यशवंतराव यांनी पक्षाला रामराम ठोकला.

त्यानंतर संध्याकाळी रायगडमधील महाड विधानसभा अध्यक्ष बाबू खानविलकर पक्ष सोडत असल्याची बातमी समोर आली. बाबू खानविलकर हे अजित पवार आणि सुनिल तटकरे यांचे निकटवर्तीय आहेत. बाबू खानविलकर देखील ठाकरे गटात सामील होणार आहेत. विशेष म्हणजे त्यांच्यासोबत निजामपूर विभागातील अनेक पदाधिकारीही ठाकरे गटात प्रवेश करणार आहेत. अजित पवार गट सोडण्याबाबत निर्णय का घेतला यासंदर्भात बाबू खानविलकर यांनी प्रतिक्रिया दिलीय.

यंदाची निवडणूक युतीतून लढवली जाणार आहे. त्यामुळे महाड विधानसभा मतदारसंघातील जागा शिंदे गटाला सुटली. शिंदे गटाकडून भरतशेठ गोगावले हे उमेदवार असणार आहेत. त्यामुळे आपण नाराज असून आपण आपला राजीनामा पक्ष श्रेष्ठींकडे सोपवलाय. येणाऱ्या २८ तारखेला उद्धव ठाकरे बाळासाहेब ठाकरे गटात आपण प्रवेश करणार असल्याचं त्यांनी म्हटलंय.

# विधानसभा निवडणूकीत मतदान करण्यासाठी नवी मुंबईत विविध माध्यमांतून आवाहन

प्रतिनिधी
■ उल्हासनगर

20 नोव्हेंबर रोजी होणा-या महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीत नवी मुंबईतील प्रत्येक मतदाराने आपला मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन करण्याच्या दृष्टीने स्वीप अर्थात मतदार जागरूकता कार्यक्रमांतर्गत विविध माध्यमांचा वापर करण्यात येत आहे.

या अंतर्गत आज दिघा येथील नमुंमपा माध्यमिक शाळा क्र. 108 मध्ये विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्व सांगत त्यांच्यामार्फत आई-बाबा व कुटूंबिय आणि शेजारी यांना मतदान करण्याकरिता प्रोत्साहित करण्याचे सांगण्यात आले. तसेच नमुंमपा माध्यमिक शाळा क्र. 113, महापे येथेही मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो या विषयावर रांगोळी व चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांमार्फत मतदानाचा संदेश प्रसारित




केल्याने त्यांना मतदानाचे महत्व कळतेच शिवाय त्यांच्यामार्फत त्यांच्या आईवडिलांपर्यंत तसेच परिचितांपर्यंत मतदानाचे कर्तव्य पार पाडण्याचा संदेश पोहचतो.

नेरूळ विभागात सेक्टर 29 येथील दैनंदिन बाजारामध्ये मतदार जनजागृती पथकाने भेट देत तेथील व्यावसायिक आणि ग्राहक यांच्याशी संवाद साधत त्यांना मतदानाचा हक्क बजावण्याविषयी सांगितले, तसेच याठिकाणी मतदान करणेबाबत सामुहिक शपथही ग्रहण करण्यात आली.

अशाच प्रकारे वाशी विभागात सेक्टर 15 ए येथील कर्मवीर भाऊराव पाटील अर्थात मॉडर्न महाविद्यालय वाशी येथे वर्गावर्गांमध्ये जाऊन युवकांशी संवाद साधण्यात आला व त्यांना मतदानाचे महत्व विशद करण्यात आले. पहिल्यांदाच मतदान करणा-या तरूणांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. त्यांच्यामार्फत त्यांच्या घरी तसेच परिसरातील व संपर्कातील नागरिकांनाही संविधानाने दिलेला मतदानाचा हक्क बजावण्याविषयी आवाहन केले जावे असे सूचित करण्यात आले. वाशी हायवे बसथांब्यावरील प्रवाशांमध्येही मतदानाविषयी जनजागृती करण्यात आली. उद्यानांमध्ये जॉगींगसाठी येणा-या नागरिकांसह तेथील कर्मचा-यांसह मतदानाविषयी शपथ घेण्यात आली. त्याचप्रमाणे नेरूळ, वाशी व तुर्भे विभाग कार्यालयांमधील कर्मचारी तसेच विभाग कार्यालयांना भेट देणारे नागरिक यांनी एकत्रितपणे मतदानाची शपथ ग्रहण केली.

# शैलेश वडनेरेंची अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याचा निर्धार

## मुरबाडमध्ये शरद पवार गटाला सुरुंग

प्रतिनिधी
■ बदलापूर

ठाणे जिल्ह्यातील मुरबाड विधानसभेत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे बदलापूर शहराध्यक्ष आणि इच्छुक उमेदवार शैलेश वडनेरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचा राजीनामा दिला आहे. यामुळे पक्षाला मोठा धक्का बसला आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर पक्षात आलेल्या लोकांना तिकीट मिळत असल्याने राजीनामा देत असल्याचं वडनेरे यांनी म्हटलं आहे.

मुरबाड विधानसभेत शिवसेना शिंदे गटाचे भिवंडी लोकसभा सहसंपर्क प्रमुख सुभाष पवार यांनी राष्ट्रवादी शरद पवार पक्षात प्रवेश केला. यानंतर पक्षाकडून त्यांनाच विधानसभेचे तिकीट मिळणार हे जवळपास निश्चित आहे. बाहेरून आलेल्याना तिकीट दिले जात असल्याचे म्हणत इच्छुक असलेले बदलापूर शहराध्यक्ष शैलेश वडनेरे नाराज झाले आहेत. या नाराजी नात्यातून



त्यांनी शरद पवार गटाला राम राम ठोकला आहे.

दरम्यान ज्यावेळी पक्ष अडचणीत होता, त्यावेळी आम्ही तन-मन-धन अर्पून पक्षाचे काम केले आणि लोकसभेला खासदार निवडून आणला. मात्र आज त्याच लोकांना पक्षात घेऊन तिकीट दिले जात आहे. त्यामुळे या गोष्टीचा निषेध करतो; असे म्हणत शैलेश वडनेरे यांनी थेट शहराध्यक्षपदाचा आणि पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. यानंतर वडनेरे यांनी अपक्ष लढणार असल्याची भूमिका घेतली आहे.

# डोंबिवली रेल्वे स्थानकातील फलाट पाचवर छताच्या उभारणीस प्रारंभ

■ डोंबिवली

डोंबिवली रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक पाचवरील दिवा बाजूकडील विस्तारित फलाटाच्या भागात छत उभारणीचे काम रेल्वे प्रशासनाने सुरू केले आहे. मागील दोन वर्षापासून या विस्तारित फलाटाच्या भागात छत नसल्याने प्रवाशांचे उन, पावसाच्या दिवसात हाल होत होते. या छताचे काम पूर्ण झाल्यावर प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

डोंबिवली रेल्वे स्थानकातील



फलाट क्रमांक पाचवर १५ डब्याची लोकल उभी राहण्यासाठी तीन वर्षापूर्वी फलाटाचे दिवा बाजूकडे विस्तारिकरण करण्यात आले. या विस्तारित फलाटावर १५ डब्याच्या, १२ डब्याच्या लोकल उभ्या राहू

## प्रवाशांचा उन, पावसात उभे राहण्याचा त्रास संपणार

लागल्या. लोकलचे तीन डबे छत नसलेल्या भागात फलाटावर येत होते. विस्तारित फलाटाच्या भागात छत नसल्याने प्रवाशांना उन, पावसात उभे राहून लोकल पकडावी लागत होती.

सकाळी गर्दीच्या वेळेत पाऊस असेल तर छत नसलेल्या भागातून लोकलमध्ये चढताना प्रवाशांचे हाल होत होते. जवळ छत्री असुनही चिंब भिजण्याची वेळ प्रवाशांवर येत होती. प्रवाशांना १५ डब्याच्या लोकलची सुविधा दिली. फलाटाचे विस्तारिकरण केले.

# महाविकास आघाडी जो उमेदवार देईल त्यालाच शेकापचे मतदान

## माजी आमदार विवेक पाटील यांची ठाम भूमिका

प्रतिनिधी
■ उरण

काही स्वयंघोषित इच्छुक अधिकृत घोषणा झालेली नसतानाही स्वतःहून प्रचार करू लागले आहेत. बंडखोरी करणाऱ्यांना आम्ही कोणताही पाठिंबा दिलेला नाही. महाविकास आघाडी उरण विधानसभा मतदारसंघात जो उमेदवार देईल, त्याचेच काम कार्यकर्त्यांनी करावे व त्याच उमेदवाराला शेकापचे मतदान करा, असे आवाहन माजी आमदार विवेक पाटील केले आहे.

शेकापचे नेते विवेक पाटील यांनी संदेश पाठवला असून त्यात पक्षाची भूमिका मांडली आहे. त्याची माहिती देताना मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व माजी सभापती राजेंद्र पाटील यांनी सांगितले की, शेकापने कोणत्याही मतदारसंघात उमेदवारांची नावे जाहीर केलेली नाहीत. तरीही काही जण स्वतःच उमेदवार असल्याचे सांगत प्रचार करीत सुटले आहेत. मात्र त्यांना शेकापचा कदापि पाठिंबा मिळणार नाही. शेकाप हा महाविकास आघाडीचा घटक पक्ष असून कोणत्याही परिस्थितीत प्रतारणा



केली जाणार नाही. आघाडीच्या अधिकृत उमेदवारांचेच काम शेकापचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी निष्ठेने करावे, अशी भूमिका विवेक पाटील यांनी घेतली असल्याची माहिती राजेंद्र पाटील यांनी दिली. त्यांच्या आदेशाचे पालन म्हणून महाविकास आघाडी जो उमेदवार देईल त्याच्या मागे खंबीरपणे उभे राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. राजेंद्र पाटील यांनी पुढे सांगितले की, प्रितम म्हात्रे यांनी उरण विधानसभा मतदारसंघातून आपली उमेदवारी ही स्वघोषित केली आहे. त्यांना आमचा विरोध नाही. मात्र पक्षाचे नेते माजी आमदार विवेक पाटील यांनी आम्हा पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आघाडीचा धर्म पाळत महाविकास आघाडी जो उमेदवार उभा करणार त्याचे एकदिलाने काम करण्याचे आदेश दिले आहेत.

# 15 वर्षीय प्रेयसीवर 19 वर्षीय प्रियकराचा बलात्कार; प्रियकराला अटक

प्रतिनिधी
■ ठाणे

एका १९ वर्षीय प्रियकरानं १५ वर्षीय प्रेयसीला लग्नाचं आमिष दाखवून बहाण्यानं स्वतःच्या घरी नेलं. त्यानंतर अल्पवीयन प्रेयसीशी शारीरिक संबंधास तगादा करत असतानाच, पीडित प्रेयसीनं संबंधास नकार दिला. मात्र नकार देवूनही दगाबाज प्रियकरानं प्रेयसीवर बळजबरीनं बलात्कार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना भिवंडी शहरानजीक असलेल्या एका गावातील इमारतीच्या पाठीमागे घडली. याप्रकरणी अल्पवीयन प्रेयसीच्या फिर्यादीवरून प्रियकरावर नारपोली पोलीस ठाण्यात अत्याचारासह पोक्सोन्वये गुन्हा दाखल करण्यात आला तसंच पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.

प्रेयसीला लग्नाचं आमिष - पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अल्पवीयन पीडित प्रेयसी भिवंडी तालुक्यातील काल्हेर येथील एका सोसायटीत राहात आहे. तर ती राहत असलेल्या परिसरात दुसऱ्या सोसायटीत दगाबाज प्रियकर राहात आहे. त्यातच एकाच भागात राहात असल्यानं दोघांची ओळख झाली. या ओळखीतून दोघांमध्ये ऑगस्ट २०२४ मध्ये जवळीक निर्माण होऊन प्रेमसंबंध जुळून आले. त्यानंतर प्रेमसंबंधातून आरोपी प्रियकरानं पीडित प्रेयसीला लग्नाचं आमिष दाखवून शारीरिक सुखाची मागणी केली.

# भेसळप्रकरणी अन्न आणि औषध प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करू नका! धर्मराज्य पक्षाची मागणी

प्रतिनिधी
■ ठाणे

अन्न आणि औषध प्रशासनाच्या (एफडीए) कोकण विभागाने अन्न पदार्थांबरोबरच, पिण्याच्या पाण्याच्या नमुन्यांच्या केलेल्या चाचणीमध्ये पाण्याचा एक नमुना असुरक्षित; तर, अन्नाचे काही नमुने कमी दर्जाचे असल्याची गंभीर घटना, प्रसिद्धीमाध्यमांद्वारे उघड झाली आहे. यासंदर्भातील धक्कादायक बाब म्हणजे, अन्न आणि औषध प्रशासनाच्या (एफडीए) कोकण विभागाकडे, अन्न-सुरक्षा अधिकारी उपलब्ध नसून, कर्मचाऱ्यांचा मोठ्याप्रमाणात तुटवडा असल्याने, प्रत्येक अन्न आस्थापनाची तपासणी करणे शक्य नसल्याचे, अन्न आणि औषध प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आलेले आहे.

एकप्रकारे हा, कायद्यातील कर्तव्यात हलगर्जीपणा करण्याचा गंभीर प्रकार असून, यामुळे अन्न पदार्थांमध्ये भेसळ अथवा गैरप्रकार करण्यास, विशेष म्हणजे, निवडणुकांच्या कालावधीत, अन्न आणि औषध प्रशासनाचे (एफडीए) कामकाज पूर्णपणे थंडावते. कारण, या विभागातील अधिकाऱ्यांवर निवडणुकीच्या कामकाजाची जबाबदारी सोपविण्यात येत असते. आगामी विधानसभा निवडणुकीच्या कामकाजासाठीदेखील, अन्न आणि औषध प्रशासनाच्या (एफडीए) कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या असल्याची माहिती, प्रसिद्धीमाध्यमांद्वारे प्रकाशित झालेली असल्याने, याच पार्श्वभूमीवर 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त एस. चोक्कालिंगम यांना पत्र लिहून, विधानसभा निवडणुकीसाठी, अन्न आणि औषध प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती न करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, अन्न आणि औषध प्रशासनाच्या (एफडीए) कोकण विभागाने, मागील सहा महिन्यांत अन्न पदार्थांचे एकूण २०९ नमुने घेतले असून, त्यातील २९ नमुन्यांच्या अहवालांपैकी, २२ अन्न पदार्थांचे नमुने हे, अत्यंत सुमार दर्जाचे आढळून आले आहेत. त्यातच आता दिवाळी सण काही दिवसांवर येऊन ठेपलेला आहे; तर, त्यानंतर महिन्याभरातच राज्यात विधानसभा निवडणुकांचा बिगुल वाजणार आहे. अशा परिस्थितीत जर, अन्न आणि औषध प्रशासनाच्या (एफडीए) कर्मचाऱ्यांची नियुक्ती, निवडणुकांच्या कामकाजासाठी करण्यात आली तर, अन्न पदार्थांत भेसळ करणाऱ्या भ्रष्ट-प्रवृत्तीच्या व्यावसायिकांच्या हातात कोलीत दिल्यासारखे होईल आणि त्यातून विषबाधेसारख्या, जीवितास धोका उत्पन्न होणाऱ्या घटना दुर्दैवाने घडल्याशिवाय राहणार नाहीत, असे 'धर्मराज्य पक्षा'चे सहसचिव नरेंद्र पंडित यांनी, आपल्या पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे. तरी, या संपूर्ण प्रकरणाचा सकारात्मक विचार करुन, आगामी विधानसभा निवडणुकांच्या कामकाजासाठी, अन्न आणि औषध प्रशासनाच्या (एफडीए) कर्मचाऱ्यांची, नियुक्ती करण्यात येऊ नये. जेणेकरुन, पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध होऊन, कर्मचाऱ्यांना अन्न आस्थापनांची योग्यपद्धतीने तपासणी करता येईल आणि पुरेशा कर्मचाऱ्यांच्या उपलब्धतेमुळे, अन्न पदार्थांमधील भेसळीला मोठ्याप्रमाणात खीळ बसेल, असे ठाम प्रतिपादन नरेंद्र पंडित यांनी, राज्याचे मुख निवडणूक आयुक्त एस. चोक्कालिंगम यांना पाठविलेल्या पत्रात केले आहे.


# व्यवसाय उपचार पद्धतीनं रुग्णांनी बनवल्या दिवाळी वस्तू

## मनोरुग्णांना स्वावलंबनाचे धडे

प्रतिनिधी
■ ठाणे

कुटुंबातील एखादी व्यक्ती मनोरुग्ण असेल तर पुढे त्याचं कसं होणार? हा प्रश्न सर्वांनाच सतावत असला तरी ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयात अशा रुग्णांना स्वावलंबी बनविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मनोरुग्णालयातील व्यावसायिक उपचार विभागामार्फत मनोरुग्णांचं मानसिक कौशल्य विकसित करण्याचा प्रयत्न केला जात असून दिवाळीनिमित्त रुग्णांना उटणे, पणत्या, दिवे, कंदील, फुलवाती, लोकरीचे तोरण, पताके बनविण्याचं प्रशिक्षण दिलं जातंय. दिवाळीच्या काळात या सर्व वस्तू प्रदर्शनात विक्रीसाठी ठेवल्या जाणार आहेत.

मनोरुग्ण दिसल्यावर हा पुढे काही



करू शकत नाही, असं अनेकांना वाटतं. एखाद्या कुटुंबात मनोरुग्ण असेल तर त्या कुटुंबाला ते अवघड बनून राहतं. मात्र, ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयामार्फत याला कुठेतरी छेद देण्याचा प्रयत्न केला जात आहे. मेंदूचा ताबा सुटलेल्या अनेक व्यक्तींवर या ठिकाणी उपचार केले जातात. परंतु उपचारासोबत रुग्णांचं अंतर्गत कौशल्य शोधण्याचा प्रयत्नही केला जातोय.सणासुदीच्या काळात लागणाऱ्या वस्तू तयार करून, मनोरुग्ण व्यक्तीचं कौशल्य जाणून ते विकसित करण्याचा प्रयत्न केला जातोय. दिवाळी आता काही दिवसांवर आली आहे. त्यामुळं रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. नेताजी मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवसाय उपचार पद्धतीनं मनोरुग्णांकडून विविध दिवाळीच्या वस्तू तयार करून घेतल्या जात असल्याची माहिती व्यवसाय उपचार तज्ज्ञ डॉ. हेमांगिनी देशपांडे यांनी दिली.

वृत्तमानस महाराष्ट्र
मुंबई, बुधवार, २३ ऑक्टोबर २०२४

## छोटा पुढारीला आले धमकीचे कॉल

**धाराशिव :** धाराशिव येथील सर्वसामान्य जनतेला होणारा रस्त्याचा त्रास व्यक्त केल्यानंतर छोटा पुढारी अर्थात घनश्याम दरोडे याला मंत्री तानाजी सावंत यांच्या कार्यकर्त्यांनी कॉल करत धमक्या दिल्या असल्याची माहिती घनश्याम दरोडे याने समाज माध्यमावर व्हिडिओ पोस्ट करत दिली आहे. तू हा मुद्दा उचललाच कसं काय? असे म्हणत मला धमकी दिल्याचा आरोप घनश्याम दरोडे याने केला आहे. छोटा पुढारी याने पोस्ट केलेल्या व्हिडिओमध्ये म्हणाला, मित्रांनो मला सांगा कधीपर्यंत मी नेत्यांच्या बाजूने बोलू? जे माझ्या जनतेचा सत्याचा आवाज आहे ते मांडू की नको? आज मला तानाजी सावंत साहेबांचा फोन येतोय, मला धमक्या दिल्या जात आहेत. जर मला धमक्यांचे फोन आले तर मी रीतसर कायदेशीर कारवाई करेल. मी तुमच्यासाठी नाही तर जनतेसाठी जगणार आहे. तानाजी सावंत यांच्या कार्यकर्त्यांचा मला धमक्यांचा कॉल आला तर मी लीगल कारवाई करेल, हे ध्यानात ठेवा, असा इशारा देखील छोटा पुढारी अर्थात घनश्याम दरोडे याने दिला आहे. पुढे आणखी एका व्हिडिओमध्ये घनश्याम दरोडे अर्थात छोटा पुढारी म्हणाला, आपण एक रस्त्याचा व्हिडिओ केला, तो व्हिडिओ बघून मला बऱ्याच लोकांनी ट्रोल केले, अनेकांनी मला विचारले सुपारी घेऊन व्हिडिओ बनवतो का? मला यांचा काहीच फरक पडत नाही.



# मराठा समाजातील उमेदवारीसाठी इच्छुकांच्या 24 तारखेला मुलाखती: मनोज जरांगेंची माहिती

## आपल्या नावाने पैसे गोळा करणाऱ्यांना दिला सज्जड दम

**प्रतिनिधी**
**जालना**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मंगळवारी विधानसभा निवडणूक लढवण्याची इच्छा असणाऱ्या मराठा समाजातील इच्छुकांच्या 24 तारखेला मुलाखती घेण्याची घोषणा केली आहे. 24 ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, नांदेड व लातूरसह 23 जिल्ह्यांतील प्रत्येक मतदारसंघातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती होणार असून, या मुलाखतींसाठी सर्वांनी उपस्थित रहावे, असे त्यांनी म्हटले आहे. यावेळी त्यांनी आपल्या नावाचा गैरवापर करून पैसे गोळा करणाऱ्यांनाही अशा कृत्यांपासून दूर राहण्याचा इशारा दिला आहे.



मनोज जरांगे म्हणाले की, मराठा समाजाने विधानसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार 24 ऑक्टोबर रोजी सकाळी 8 वाजेपासून दिवसभर मी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेईल. जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी येथे होणाऱ्या या मुलाखतीला केवळ इच्छुकांनी यावे. त्यांनी आपल्यासोबत कुणालाही आणू नये. यामुळे आंतरवालीत उगीचच गर्दी होईल.

24 तारखेला छत्रपती संभाजीनगर, जालना, हिंगोली, नांदेड, परभणी, लातूर, धाराशिव, बीड, जळगाव, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, सोलापूर, अहिल्यादेवी नगर, नाशिक, अमरावती, सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे, रायगड, ठाणे व नागपूर जिल्ह्यातील सर्वच विधानसभा मतदारसंघातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती होतील. मराठा समाजातील ज्या उमेदवाराची निवडणूक लढवण्याची इच्छा आहे, त्यांनी आपसातील गट-तट विसरून मुलाखतीला यावे. समोरचा गट मुलाखतीला गेला म्हणून मी जाणार नाही असे जमणार नाही.

आम्ही बंद दरवाज्याआड सर्व इच्छुकांशी निर्णय घेऊन योग्य तो निर्णय घेऊ. त्यानंतर ज्याला उमेदवारी दिली जाईल, त्याने अर्ज भरावा आणि ज्यांना मिळणार नाही त्यांनी सूचनेनुसार आपला उमेदवारी अर्ज मागे घ्यावा. एका मतदारसंघात एकच उमेदवार द्यायचे ठरले आहे. मलाच उमेदवारी मिळाली पाहिजे असे प्रत्येकाला वाटते. तसे वाटणे स्वाभाविकही आहे. पण सर्वांनीच निवडणुकीचे अर्ज भरले तर योग्य होणार नाही. त्यामुळे एका व्यक्तीने एकच अर्ज भरा. आपल्याला आपली ताकद दाखवायची आहेच. पण त्यासाठी शिस्त पाळणेही महत्त्वाचे आहे, असे मनोज जरांगे म्हणाले.

मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी आपल्या नावाचा गैरवापर टाळण्यासाठी कठोर सूचनाही दिल्या. निवडणूक असल्यामुळे अनेकजण आपल्या नावाचा गैरवापर करू शकतात. कुणी माझ्या नावाखाली पैसे गोळा करत असेल तर त्या लोकांचे पैसे वर्गणी गोळा करून परत करण्यात येतील. कुणाचा कपडा घेतल्याची तक्रार आली, कुणाची चप्पल घेतली म्हटले तर तीच चप्पल तोंडावर फेकून मारेन, असे ते आपल्या समर्थकांना इशारा देताना म्हणाले. माझ्या नावाचा वापर करणारे कोण आहेत, हे मला चांगलेच ठावूक आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

# 'डबल महाराष्ट्र केसरी' पैलवानाच्या घरी आयकर विभागाचा छापा

## भाजप नेत्याशी खास कनेक्शन

**प्रतिनिधी**
**पुणे**

राज्यात विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरु झाली आहे. अशातच पुण्यामधून एक मोठी बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र केसरी, हिंदकेसरी पैलवान अभिजित कटके यांच्या घरी आयकर विभागाने छापेमारी केली आहे. अभिजीत कटके यांच्या वाघोलीतील घरी ही छापेमारी केल्याने सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. महत्वाचे म्हणजे अभिजीत कटके हे भाजप नेते अमोल बालवडकर यांचे मेहुणे आहेत.



राज्याच्या राजकारणात सध्या विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरु आहे. निवडणुकांच्या दृष्टीने राजकीय वर्तुळात मोठ्या घडामोडी घडत आहेत. अशातच पुण्यामधून एक मोठी बातमी समोर आली आहे. पुण्यामध्ये भारतीय जनता पक्षाचे नेते, विधानसभेसाठी इच्छुक असलेले उमेदवार अमोल बालवडकर यांच्या सासऱ्यांच्या घरी म्हणजेच महाराष्ट्र केसरी, हिंदकेसरी पैलवान अभिजित कटके यांच्या घरी आयकर विभागाने छापेमारी केली आहे.

अमोल बालवडकर हे भारतीय जनता पक्षाचे नेते असून ते विधानसभा निवडणूक लढवण्याच्या तयारीत आहेत. त्यांनी भाजपने उमेदवारी जाहीर केलेल्या कोथरुडमधून चंद्रकांत पाटील यांच्याविरोधात विधानसभा लढवण्याची तयारी केली आहे. उमेदवारी न दिल्यास बंडखोरीच्या तयारीत असल्याचेही संकेत त्यांनी दिले होते. अशातच आता त्यांच्या सासऱ्यांच्या घरी छापेमारी करण्यात आल्याने राजकीय वर्तुळात चर्चा रंगल्या आहेत.

# भोरजवळ सापडलेल्या अजून चार गाड्या कुठे आहेत?

**प्रतिनिधी**
**अहिल्यानगर**

पुढील महिन्यात 20 तारखेला राज्य विधानसभेसाठी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यामध्ये काल, सोमवारी एका गाडीतून कोट्यवधी रुपये पोलिसांनी जप्त केले. यावरून विरोधक आक्रमक झाले असून त्यांनी महायुतीला घेरण्यास सुरुवात केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे (एनसीपी एसपी) आमदार रोहित पवार यांनी, अजून चार गाड्या कुठे आहेत? असा प्रश्न विचारला आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने 15 ऑक्टोबरला महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. त्याचवेळी राज्यात आचारसंहितादेखील लागू झाली आहे. त्यामुळे विविध ठिकाणी नाकाबंदी करून पोलिसांकडून गाड्यांची अत्यंत बारकाईने तपासणी होत आहे. अशातच सोमवारी पुणे ग्रामीण पोलिसांनी भोरजवळ राजगड पोलीस ठाण्याच्या हद्दीत खासगी गाडीची तपासणी करून अंदाजे पाच कोटी रुपये जप्त केले. ही गाडी पुण्याहून कोल्हापूरच्या दिशेने जात होती, अशी माहिती समोर आली आहे.



या पार्श्वभूमीवर एनसीपी एसपीचे आमदार रोहित पवार यांनी ट्वीट केले आहे. सत्ताधारी पक्षाच्या उमेदवारांना निवडणुकीसाठी पहिली इन्स्टॉलमेन्ट म्हणून 25 – 25 कोटी दिले गेले असल्याची चर्चा असून सोमवारी यातलीच एक गाडी खेड-शिवापूरच्या 'डोंगार झाडी'मध्ये पकडली गेली, असे सांगत त्यांनी शिंदे गटाचे आमदार शहाजी बापू पाटील यांना लक्ष्य केले आहे. तसेच, एक गाडी सापडली पण अजून चार गाड्या कुठे आहेत? असा प्रश्नही विचारला आहे. लोकसभेलाही सत्ताधाऱ्यांनी पाण्यासारखा पैसा ओतून महाराष्ट्राच्या जनतेला विकत घेण्याचा प्रयत्न केला, परंतु इथल्या स्वाभिमानी जनतेने महायुतीला कात्रजचा घाट दाखवला.

## हिंगोली- नांदेडमध्ये भूकंपाचे धक्के, नागरिकांची घराबाहेर धाव

**हिंगोली।** नांदेड आणि हिंगोली भूकंपाच्या धक्क्याने हादरले आहे. हिंगोली आणि नांदेडमध्ये आज सकाळीच्या सुमारास भूकंपाचे धक्के बसले. साखर झोपेत असताना भूकंपाचे धक्के बसल्यामुळे नागरिकांनी घराबाहेर धाव घेतली. नांदेडच्या हदगाव तालुक्यातील २ गावांना भूकंपाचे धक्के बसले. तर हिंगोलीच्या कळमनुरी, औंढा तालुक्यात भूकंपाचे धक्के जाणवले. नांदेडमध्ये ३.८ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाच्या धक्क्याची नोंद करण्यात आली आहे. यामुळे नांदेडमधील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नांदेड जिल्ह्यात सातत्याने भूकंपाचे धक्के बसत आहेत. मागील ३ महिन्यातील हा तिसरा भूकंपाचा धक्का आहे. आज सकाळी ६ वाजून ५२ मिनिटांनी नांदेड जिल्ह्याच्या हदगाव तालुक्यातील सावरगाव आणि मनाठा या गावांच्या परिसरात भूकंपाचा धक्का जाणवला. या भूकंपाची तीव्रता ३.८ रिश्टर स्केल इतकी नोंद भारतीय भूकंप मापण केंद्रावर झाली आहे. नांदेडच्या हदगाव तालुक्यातील पश्चिमेस असलेल्या सावरगाव हे या भूकंपाचे केंद्र बिंदू दाखवत आहे. या भूकंपाच्या धक्क्याने या परिसरातील नागरिकांमध्ये खळबळ उडाली. हे भूकंपाचे धक्के सौम्य असले तरी देखील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

# लोकसभेच्यावेळी मुख्यमंत्र्यांच्या विमानातून आले होते 40 कोटी

## खैरेंच्या आरोपाने खळबळ

**प्रतिनिधी**
**संभाजीनगर**

लोकसभा निवडणुकीत पैसे वाटून मते विकत घेण्यात आले, त्यासाठी लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याच्या दोन दिवस आधी शिवसेना नेते किरण पावसकर यांनी दिल्ली येथून हवालामार्गे १५-१५ कोटी रुपये पाठविले होते. एवढेच नव्हे तर मुख्यमंत्र्यांच्या विमानातून शहरात ४० कोटी रुपये आणण्यात आले आणि पोलिसांच्या मदतीने त्या पैशांची विल्हेवाट लावण्यात आल्याचा खळबळजनक आरोप उद्धवसेनेनेचे नेते माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी एका न्यूज चॅनलशी बोलताना केला.

खैरे म्हणाले की, पोलिसांनी खूप मोठ्या नोटा पकडल्याची बातमी न्यूज चॅनलवर पाहिली. हे पैसे यांच्याकडे कोठून येतात, असा सवाल त्यांनी केला. लोकसभा निवडणुकीतही पैसे वाटून त्यांनी माझ्यासारख्या कडवट शिवसैनिकाला पाडले, याचे मला खुप दु:ख होत असल्याचे ते म्हणाले. यात आमचेही लोक होते, असे म्हणत त्यांनी उद्धवसेनेलाही घराचा आहेर दिला.



खैरे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याच्या दोन दिवस आधी आपल्याला दिल्ली येथील मित्राने व्हिडिओ कॉल करून हवालामार्फत पैसे कसे पाठविले जात आहे, हे दाखविले. तेव्हा त्यात किरण पावसकर नोटांच्या बंडलांशेजारी बसलेले होते. याची माहिती शिवसेना नेते खा. संजय राऊत यांनाही मिळाली होती. यामुळे तेव्हा त्यांनी या हवाला नोटांची चौकशी करण्याची मागणी केली होती, मात्र चौकशी झाली नाही. लोकसभा निवडणुकीतही त्यांनी पैशाचा वापर करून मते विकत घेतल्याचा पुनरूच्चार त्यांनी केला. मुख्यमंत्र्यांच्या विमानातून ४० कोटी रुपये शहरात आणल्याचे आणि ही रक्कम पोलिस बंदोबस्तात पाठविल्याचे ते म्हणाले.

# आ. प्रताप सरनाईक यांनी कुटुंबियांसमवेत घेतले तुळजाभवानी मातेचे दर्शन



**प्रतिनिधी**
**तुळजापूर**

महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी तुळजापूर येथे श्री तुळजाभवानी देवीच्या मंदिरात शिवसेना आमदार प्रताप सरनाईक यांनी कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेचे सहकुटुंब दर्शन घेतले.

विधानसभा निवडणूक तोंडावर असताना सर्व आमदार तिकीट आणि आपल्या उमेदवारीसाठी धावपळ करत आहेत. परंतु यावेळी आमदार प्रताप सरनाईक यांनी सहकुटुंब तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले.

जनसेवेचे हे अखंड व्रत यापुढे अविरत सुरू राहो तसेच सर्व आव्हान पेलण्याचे बळ मिळो अशी प्रार्थना आमदार प्रताप सरनाईक यांनी तुळजाभवनी आई चरणी केली. यावेळी त्यांची पत्नी परिषा सरनाईक आणि मुलगा युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक, विहंग सरनाईक तसेच सुना, नातवंड असा संपूर्ण सरनाईक परिवार सोबत होता.

## दिवाळीत पुण्यातील वाहतुकीत बदल

**पुणे।** पुण्यामध्ये दिवाळी शॉपिंगसाठी चारचाकी वाहन नेत असणाऱ्यांसाठी ही महत्वाची बातमी आहे. दिवाळीमध्ये पुण्यातील वाहतुकीच्या नियमांमध्ये मोठे बदल करण्यात आले आहे. वाहतूक पोलिसांकडून चारचाकी वाहनांना शिवाजी रोडने जाण्यास मनाई करण्यात आली आहे. शिवाजी रोडजवळ पुण्यातील मोठ्या बाजार पेठा आहेत. दिवाळीसाठी शॉपिंग करण्यासाठी याठिकाणी मोठ्यासंख्येने पुणेकर गर्दी करतात. ही गर्दी लक्षात घेता पुणे वाहतूक पोलिसांनी वाहतूक नियमांमध्ये मोठे बदल केले आहेत. रविवार पेठ, मंडई, बोहरी आळी, लक्ष्मी रोड आणि कुमठेकर रोड यासारख्या बाजारपेठेत मोठी गर्दी होते. ५ नोव्हेंबरपर्यंत पुण्यातील शिवाजी रोड बंद राहणार आहे. पुणे वाहतूक पोलिसांनी वाहतुकीमध्ये केलेल्या बदलांची माहिती नागरिकांना दिली आहे. त्यांनी पर्यायी मार्ग देखील सांगितले आहे. त्यामुळे पुणेकरांनी ५ नोव्हेंबरपर्यंत याच पर्यायी मार्गांचा वापर करायचा आहे.

# कोकण सुपुत्र, वॉटर मॅन मनोज चव्हाण यांचा 'लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' पुरस्काराने सन्मान

**प्रतिनिधी**
**पुणे**

इंटरनॅशनल इकॉनॉमिक टाइम्स,आंतरराष्ट्रीय मानवधिकार राजदुत संघटना,युवा महाराष्ट्र फॉउंडेशन,पोलीस मित्र माहिती अधिकार,पत्रकार संरक्षण सेना यांच्या संयुक्त विद्यमाने "महाराष्ट्र उद्योजक पुरस्कार-२०२४ तसेच लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड पुरस्कार वितरण सोहळा पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन, घुले रोड,पुणे येथे संपन्न झाला. हा कार्यक्रम कोहिनुर ग्रुप चे चेअरमन /मॅनेजिंग डायरेक्ट तसेच अग्रवाल समाज फॉउंडेशन पुणे चेअरमन सन्मा. कृष्णकुमार गोयल,अविनाश संकुडे (इंटरनॅशनल सी. ई. ओ. लंडन बुक ऑफ वर्ड रेकॉर्ड ), लायन राजेश अग्रवाल(प्रेसिडेंट लायन क्लब) , तृप्ती देसाई(प्रेसिडेंट भूमाता ब्रिगेड ), रवी अग्रवाल (प्रेसिडेंट लायन क्लब हेल्थ डिपार्टमेंट ) यांच्यासह विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेले



मान्यवर प्रमुख पाहुणे यांच्या शुभहस्ते थाटामाटात पार पडला. याप्रसंगी प्रथम उद्योग रत्न, पद्मभूषण, पद्मविभुषण सन्मा.रतनजी टाटा यांना भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

ह्या सोहळयात कोकण सुपुत्र भांडुप मुंबई येथील रहिवाशी,मातोश्री ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त व मनसे कामगार सेनेचे अध्यक्ष मनसे सरचिटणीस वॉटर मॅन(पाणी दूत) मनोज भाऊ चव्हाण "लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड पुरस्कार-२०२४ देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमचे आयोजन डॉ.अविनाश धनंजय सकुंडे,राष्ट्रीय अध्यक्ष-भारतीय महा क्रांती सेना.आंतरराष्ट्रीय अध्यक्ष-आंतरराष्ट्रीय मानवधिकार राजदुत संघटना,आंतरराष्ट्रीय अध्यक्ष -पोलीस मित्र माहिती अधिकार पत्रकार संरक्षण सेना,इंटरनॅशनल इकॉनॉमिक टाइम्स सर्व पदाधिकारी, सदस्य,सभासद यांनी केले होते.कोकण सुपुत्र समाजसेवक, पाणी दूत मनोज भाऊ चव्हाण (वॉटर मॅन ) यांना पुणे येथे पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल मातोश्री ट्रस्टचे विश्वस्त व मनसे कामगार सेनेचे पदाधिकारी, सदस्य तसेच कोकणसह मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पुणेमधील अनेक मंडळ, समाज शाखा,मुंबई /ग्रामीण गाव, वाडी मंडळ, रहिवाशी, मित्र परिवार आणि हितचिंतक यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# एक कोटींच्या खंडणीसाठी अपहरण करुन डांबले

## पोलिसांनी सुटका करत तिघांना घेतले ताब्यात

**प्रतिनिधी**
**पिंपरी**

हिंजवडी पोलीस स्टेशन हद्दीतून एका व्यक्तीचा अपहरण करण्यात आलं होतं. यानंतर एक कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी करण्यात आली होती. मात्र पिंपरी चिंचवड पोलिसांनी तपास करत गंगा नदीच्या बेटावर डांबून ठेवलेल्या व्यक्तीची सुटका करत अपहरणकर्त्यांना ताब्यात घेतले आहे.

सदर प्रकरणात अपहरण झालेल्या व्यक्तीची पिंपरी चिंचवड शहर पोलिसांच्या खंडणी विरोधी पोलीस पथकाने सुटका केली आहे. पश्चिम बंगाल पोलिसांच्या मदतीने गंगा नदीवरील गोलढाब बेटावर धाड टाकून पोलीसांनी अपहरण करणाऱ्या तीन आरोपीना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. नसीम मणिरूल हक, लल्लू रुस्तम शेख



आणि साजीम करीम बबलू शेख या तीन आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. तर एक आरोपी हा फरार झाला आहे. दरम्यान अपहरण करणाऱ्या आरोपींनी आपल्या कल्याणी येथील एका मित्राच्या मदतीने अपहरण केलेल्या व्यक्तीच्या मुलाकडे मोबाईलवर एक कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी केली होती. खंडणी न दिल्यास वडिलांना जीवे ठार मारून टाकण्याची धमकी आरोपींनी अपहरत व्यक्तीच्या मुलाला दिली होती.

# उद्धव ठाकरे अन् फडणवीस निवडणुकीनंतर एकत्र येणार

**प्रतिनिधी**
**गोंदिया**

राज्यात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहत असून गेल्या काही दिवसांपासून अनेक राजकीय घडामोडी पाहायला मिळत आहेत. अशामध्ये महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यात जागावाटपावरून अनेक अंतर्गत वाद पाहायला मिळत आहेत. यावरून वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी मोठा दावा केला आहे. "विधानसभा निवडणुका झाल्यानंतर उद्धव ठाकरे आणि भाजप एकत्र येतील अशी भीती व्यक्त होत आहे" असा दावा त्यांनी केला.

वंचित आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर म्हणाले की, "उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये बैठका सुरू आहेत. निवडणुका झाल्यानंतर उद्धव ठाकरे आणि भाजप एकत्र येणार असल्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे बहुजन समाजाने आणि मुस्लिम समाजाने यांना बळी



पडून त्यांना मतदान करू नये. कारण येणाऱ्या दिवसांमध्ये उद्धव ठाकरे हे भाजपसोबत जातील," असा मोठा दावा त्यांनी केला. गोंदियामध्ये एका कार्यक्रमात ते बोलत होते. ते यावेळी पुढे म्हणाले की, "उद्धव ठाकरे यांच्यासोबत असलेले राष्ट्रवादी आणि काँग्रेस यांना, 'त्यांच्याकडून लिहून घ्या की ते पुढचे पाच वर्ष तुमच्या सोबत राहतील,' असे लिहून घ्या असे मुस्लीम समाज सांगत आहे. त्यामुळे आता काँग्रेस आणि राष्ट्रवादी मुस्लीम समाजाला काय आश्वासन देते? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे."

गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडताना दिसत आहेत. उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. तसेच, दिल्लीत शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी अमित शहांची भेट घेतल्याचा दावा काँग्रेस पक्षातील एका नेत्याने केल्याची चर्चा रंगली आहे. यावर शिवसेना ठाकरे गटाकडून स्पष्टीकरण आले असून असे काहीही घडलेले नसल्याचे स्पष्ट केले आहे. यावरून काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनादेखील माध्यमांसमोर विचारण्यात आला. यावरून त्यांनी भाजपकडून अशा बातम्या पेरल्या जात असल्याचे सांगत टीका केली.

# अहिल्यानगर-सोलापूर महामार्गावर भीषण अपघात, दोन युवक ठार

**प्रतिनिधी**
**सोलापूर**

नगर सोलापूर महामार्गावर कर्जत तालुक्यातील माहीजळगाव बायपास जवळ भीषण अपघात यामध्ये दोन तरुणांचा मृत्यू झाला असून एकाचा जागेवरच तर दुसरा मिरजगाव येथील लोकमान्य हॉस्पिटल उपचार घेत असताना मृत्यू झाला आहे. सोमनाथ दत्तात्रय कदम (वय २४) व शिवाजी बबन कदम (वय ३५) दोघेही राहणार कोकरवाडी तालुका परंडा जिल्हा धाराशिव येथील आहेत.

याबाबत घडलेली घटना अशी की आज दिनांक 22 ऑक्टोबर रोजी सोमनाथ कदम व शिवाजी कदम हे दोघे काही कामानिमित्त कोकरवाडी तालुका परंडा येथून करमाळा मार्गाने हिरो होंडा स्प्लेंडर या क्रमांक एम एच ४५ आर ९७१८ या दुचाकीवरून मिरजगावच्या दिशेने येत असताना व अज्ञात वाहन मिरजगाव कडून करमाळ्याच्या दिशेने जात असताना नगर सोलापूर महामार्गावर माहीजळगाव बायपास जवळ दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास समोरासमोर जोराची धडक होऊन सोमनाथ दत्तात्रय कदम याचा जागीच मृत्यू झाला तर शिवाजी बबन कदम याचा मिरजगाव येथील लोकमान्य हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान निधन झाले आहे. शिवाजी भगवान कदम हा विवाहित असून पत्नी व लहान दोन मुले असा परिवार आहे.

अपघाताची माहिती मिळताच मिरजगाव येथील जीवन ज्योत रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचून अपघातग्रस्तांना मिरजगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले तर शिवाजी कदम यांचा श्वास चालू असल्यामुळे त्यांना लोकमान्य हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी दाखल केले होते परंतु त्याची ही प्राणज्योत मालवल्यानंतर शिवछेदनासाठी मिरजगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात घेऊन आले. अपघाताची फिर्याद अपघातग्रस्त मयताचे नातेवाईक अशोक मधुकर लोखंडे राहणार मुर्शिदपूर तालुका आष्टी जिल्हा बीड यांनी दिली .

# गणपतराव देशमुखांच्या दोन नातवांमधील वाद मिटला

## आजीकडून नातवांचे मनोमिलन

**प्रतिनिधी**
**सांगोला**

सांगोल्याची विधानसभेची जागा ही पारंपारिक शेतकरी कामगार पक्षाकडे असताना महाविकास आघाडीने उद्धव ठाकरे गटाला दिल्याने आता शेतकरी कामगार पक्ष हा बंडखोरी करण्याच्या तयारीत आहे. शेकापचे सरचिटणीस भाई जयंत पाटील यांच्या उपस्थितीत उद्या सांगोल्यात मेळावा होत आहे. या मेळाव्यामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून स्वर्गीय गणपतराव देशमुख यांचे दोन नातू डॉक्टर अनिकेत देशमुख व डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांच्या गटात सुरू असलेला वाद मिटणार असून दोघांचे मनोमिलन होणार आहे. उद्याच्या शेकाप मेळाव्यात सांगोला विधानसभेसाठी उमेदवाराच्या नावाची घोषणाही केली जाणार आहे.

सांगोल्याच्या उमेदवारीसाठी स्वर्गीय गणपतरावांचे नातू डॉक्टर अनिकेत व डॉक्टर बाबासाहेब या



दोन भावंडात सुप्त संघर्ष सुरू होता. हा वाद संपवण्यासाठी अनेक दिग्गजांनी प्रयत्न केले होते. मात्र, हा दोघांमधील वाद मिटत नव्हता. दरम्यान हा वाद संपण्यास आज शेवटी या दोघांची आजी श्रीमती रतनताई देशमुख यांनी मध्यस्थी केली. त्यानंतर झालेल्या बैठकीत दोघांचे मनोमिलन घडवून आणले. यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे सर्व वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते. स्वर्गीय गणपतराव देशमुख यांच्याच घरात ही छोटी काही बैठक थोड्या वेळापूर्वी संपन्न होऊन श्रीमती रतन ताई यांनी दोघातले वाद संपवले. आता उद्या होणाऱ्या मेळाव्यात शेतकरी कामगार पक्ष एक संघरतीने एकत्रित येत असून सांगोला विधानसभा पूर्ण ताकतीने लढवण्याची तयारी करण्यात आली आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत आमदार शहाजी बापू पाटील व दीपक आबा साळुंखे हे एकत्र असूनही शहाजी बापू हे केवळ 768 मताने विजयी झाले होते .

गणपतराव देशमुख यांच्या जाण्याने आता पुन्हा एकदा शेतकरी कामगार पक्ष एक संघ बनला असून आता शेतकरी कामगार पक्षाची लढाई शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान आमदार शहाजी बापू पाटील व शिवसेना ठाकरे गटाचे दीपक आबा साळुंखे यांच्यामध्ये होणार आहे. सांगोला विधानसभा मतदारसंघात तब्बल 55 वर्ष स्वर्गीय गणपतराव देशमुख यांनी प्रतिनिधित्व केले होते.

## मध्य रेल्वे खो-खो संघाला जेतेपद

**मुंबई :** बिलासपूर (छत्तीसगड) येथे झालेल्या 18व्या अखिल भारतीय रेल्वे खो-खो स्पर्धेत मध्य रेल्वे, मुंबई संघाने विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात त्यांनी गतविजेत्या दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, बिलासपूर या संघाला 3 मिनिटे राखून हरवले. पश्चिम रेल्वेने तिसरा क्रमांक मिळवला. मध्य रेल्वेच्या रामजी कश्यपला स्पर्धेतील सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडूच्या पुरस्काराने गौरवण्यात आले. सर्वोत्तम चढाईपटू आणि सर्वोत्तम बचावपटूचा पुरस्कार अनुक्रमे रंजन शेट्टी आणि अरुण गुंकीने मिळवला. या स्पर्धेत देशभरातील सहा वेगवेगळ्या रेल्वेच्या विभागांनी सहभाग घेतला. त्यामध्ये 88 खेळाडू तसेच 13 ऑफिशियल व 4 निरीक्षक यांचा समावेश होता.




## आंतरशालेय बुद्धिबळ; त्वेषा, त्रिशा, क्रिशाची बाजी



प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई स्कूल स्पोर्ट्स असोसिएशन (एमएसएसए) आंतरशालेय बुद्धिबळ स्पर्धेत 10 वर्षांखालील मुली गटात ग्रीन लॉन्स हायस्कूलच्या त्वेषा जैनने बाजी मारली. 16 वर्षांखालील मुली गटात ग्रीन एकर्स अकॅडमीची त्रिशा जगताप आणि 12 वर्षांखालील मुली गटात पोदार इंटरनॅशनल स्कूलची क्रिशा जैनने विजेतेपद पटकावले.

9 वर्षांखालील मुली गटातील महाराष्ट्राची नंबर वन खेळाडू आणि देशातील तिसऱ्या सीडेड त्वेषाने सात फेऱ्यांमध्ये अव्वल स्थान पटकावताना जेतेपदावर नाव कोरले. अंतिम फेरीत तिने वासुदेव सी. वाधवा आर्य विद्यामंदिरच्या थीया वागळेवर विजय मिळवला. बॉम्बे स्कॉटिशची नित्या बंग आणि गिरिशा पै हिने अनुक्रमे दुसरा आणि तिसरा क्रमांक मिळवला. त्वेषाने यापूर्वी सप्टेंबरमध्ये पुणे आणि सोलापूरमध्ये झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धांत जेतेपदाचा मान पटकावला होता.

त्रिशाने 16 वर्षांखालील गटात सातही फेऱ्यांमध्ये एकहाती वर्चस्व राखले. आयईएस न्यू इंग्लिश स्कूलची जान्हवी गडदेने दुसरे आणि सेंट ग्रेगरीज् हायस्कूलच्या मन्वी चौधरीने तिसरे स्थान मिळवले. 12 वर्षांखालील गटात क्रिशाचा दबदबा राहिला. सीएनएम अँड एनडी पारेख स्कूलची महुआ देशपांडे आणि आर्य विद्यामंदिरची हिरणमयी कुलकर्णी यांना अनुक्रमे दुसरा आणि तिसरा क्रमांक मिळवला.

## पुणे कसोटी खेळपट्टी 'स्लो टर्निंग ट्रॅक' असणार

### काळ्या मातीचा वापरकरीत बनवलीय खेळपट्टी; टीम इंडिया तीन फिरकीपटूंसह उतरणार

प्रतिनिधी
■ पुणे

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात पुण्यात खेळल्या जाणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्याची खेळपट्टी 'स्लो टर्निंग ट्रॅक' ठरू शकते. ईएसपीएनच्या अहवालानुसार खेळपट्टीसाठी काळ्या मातीचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे बंगळुरूच्या तुलनेत पुण्यात कमी उसळी दिसू शकते. २४ ऑक्टोबरपासून पुणे कसोटीला सुरुवात होणार आहे.

बंगळुरूमधील पहिल्या कसोटी सामन्यातील पराभवामुळे, रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघावर मालिका जिंकण्याचे आणि जागतिक कसोटी चॅम्पियनशिप (WTC) अंतिम फेरीसाठी आपला दावा मजबूत ठेवण्याचे दडपण आहे. यासाठी भारताला न्यूझीलंडविरुद्धचे पुढील दोन कसोटी सामने जिंकणे आवश्यक आहे.

न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील दुसऱ्या आणि तिसऱ्या सामन्यासाठी भारतीय संघात बदल करण्यात आला आहे. अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदरचा संघात समावेश करण्यात आला आहे. बीसीसीआयने रविवारी ही माहिती दिली. दुसऱ्या कसोटीपूर्वी सुंदर पुण्यात संघात सामील होणार आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात भारतीय संघाला 8 विकेट्सनी पराभव स्वीकारावा लागला होता. संघात आर अश्विन, रवींद्र जडेजा आणि कुलदीप यादव हे तीन फिरकीपटू आधीच आहेत .

महाराष्ट्र क्रिकेट स्टेडियम (MCA), पुणे येथे होणारी ही तिसरी कसोटी असेल. 2016-17 मध्ये येथे पहिली कसोटी खेळली गेली होती ज्यात ऑस्ट्रेलियाने तिसऱ्या दिवशी चहापानाच्या विश्रांतीपूर्वी भारताला 333 धावांनी पराभूत केले होते. या सामन्याच्या खेळपट्टीला लहान-मोठे भेगा पडल्या होत्या आणि पहिल्या दिवसापासूनच खेळपट्टी वळायला लागली होती.

फिरकीपटूंनी सामन्यात 40 पैकी 31 विकेट घेतल्या, त्यानंतर सामनाधिकारी ख्रिस ब्रॉड यांनी खेळपट्टी खराब असल्याचे रेट केले.2019 मध्ये भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात पुण्यात दुसरी कसोटी खेळली गेली, ज्यामध्ये विराट कोहलीने द्विशतक झळकावले आणि 254 धावा केल्या. भारताने हा सामना एक डाव आणि 137 धावांनी जिंकला. या सामन्यातही पहिल्या दिवसापासूनच फिरकीपटूंना टर्न मिळू लागले.अहवालानुसार, नाणेफेक झाल्यानंतर सुमारे एक तासानंतरच खेळपट्टीवरून सीमची हालचाल संपेल. कोरड्या पृष्ठभागामुळे, रिव्हर्स स्विंग येथे आढळू शकते. अशा स्थितीत नाणेफेक पुन्हा एकदा महत्त्वाची ठरू शकते. नाणेफेक जिंकणारा संघ प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेऊ शकतो.



***बंगळुरूमध्ये ढग आणि पावसाने खेळ खराब केला होता***

*भारतीय संघ पुण्यात तीन फिरकीपटूंसह मैदानात उतरू शकतो. अशा स्थितीत पुन्हा एकदा रविचंद्रन अश्विन, रवींद्र जडेजा आणि कुलदीप यादव हे त्रिकुट एकत्र खेळू शकतात.बंगळुरूसाठीही संघाने अशीच रणनीती तयार केली होती, परंतु ढगाळ वातावरण आणि अधूनमधून पडणाऱ्या पावसामुळे एम चिन्नास्वामी स्टेडियमची खेळपट्टी पहिल्या दोन दिवसात वेगवान गोलंदाजांसाठी उपयुक्त ठरली. या कारणामुळे भारत पहिल्या डावात 46 धावांत ऑलआऊट झाला होता.*

## ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी भारतीय 'अ' संघाची घोषणा

### ईशान किशन परतला, ऋतुराजवर नेतृत्वाची धुरा



वृत्तसंस्था
■ नवी दिल्ली

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी भारतीय अ संघाची घोषणा केली आहे. टीम इंडियातून बाहेर असलेला ईशान किशनचाही १५ सदस्यीय संघात समावेश करण्यात आला आहे.ऋतुराज गायकवाड यांच्याकडे संघाचे कर्णधारपद सोपवण्यात आले आहे. भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या वरिष्ठ संघांमध्ये २२ नोव्हेंबरपासून ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जाणार आहे आणि त्याआधी दोन्ही संघांचे अ संघ दोन सामने खेळतील.

भारत अ संघ ऑस्ट्रेलिया अ विरुद्ध मॅकक्वॉय आणि मेलबर्न येथे दोन प्रथम श्रेणी सामने खेळेल, त्यानंतर पर्थ येथे वरिष्ठ भारतीय संघाविरुद्ध आंतर-संघ सामना खेळेल. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील अ संघांमधील पहिली कसोटी ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबरदरम्यान, तर दुसरी कसोटी ७ ते १० नोव्हेंबरदरम्यान खेळवली जाणार आहे. यानंतर १५ ते १७ नोव्हेंबरदरम्यान पर्थमध्ये इंट्रा स्क्वॉड मॅच होणार आहे.

**ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी भारतीय अ संघ**

*ऋतुराज गायकवाड (कर्णधार), अभिमन्यू ईश्वरन (उपकर्णधार), साई सुदर्शन, नितीश कुमार रेड्डी, देवदत्त पडिक्कल, रिकी भुई, बाबा इंद्रजीत, इशान किशन (यष्टीरक्षक), अभिषेक पोरेल (यष्टीरक्षक), मुकेश कुमार, खलील अहमद, यश डे. नवदीप सैनी, मानव सुथर, तनुष कोटियन.*

फेब्रुवारी 2024 मध्ये स्थानिक क्रिकेटला प्राधान्य न दिल्याने ईशानला बीसीसीआयच्या केंद्रीय करारातून वगळण्यात आले. त्यावेळी बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी टीम इंडियामध्ये न खेळणाऱ्या क्रिकेटपटूंना ताकीद दिली होती की, जे क्रिकेटपटू संघाबाहेर आहेत त्यांनी राष्ट्रीय संघात स्थान मिळवण्यासाठी देशांतर्गत क्रिकेटमध्ये सहभागी व्हावे. इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठीही ईशानची संघात निवड झाली नव्हती.

***ईशान गेल्या वर्षी डिसेंबरपासून टीम इंडियातून बाहेर***

*गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर संघात सामील झाल्यानंतर ईशान किशनने आपले नाव मागे घेतले होते. वैयक्तिक कारणांमुळे त्याने राष्ट्रीय संघातून ब्रेक घेतला. ईशानने 2 महिने कोणतेही स्पर्धात्मक क्रिकेट खेळले नाही आणि आता फेब्रुवारीमध्ये डीवाय पाटील टी-20 स्पर्धेतून पुनरागमन केले.*

## जीएमएएए जलतरण स्पर्धेत शिवांश आठल्ये, अनाही जैन सर्वोत्तम खेळाडू

प्रतिनिधी
■ मुंबई

छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलच्या (सीएसएमएसएस) शिवांश आठल्ये आणि वडाळा जलतरण तलावाच्या (डब्ल्यूएसपी) अनाही जैनने प्रत्येकी तीन सुवर्णपदकांसह जीएमएएए वार्षिक लहान वयोगट जलतरण स्पर्धेत 9 वर्षांखालील मुले व मुली गटांमध्ये अव्वल क्रमांक पटकावला.

खार जिमखाना येथे झालेल्या स्पर्धेत शिवांशने 50 मीटर ब्रेस्ट स्ट्रोक (00:48.59 सेकंद), 50 मीटर फ्रीस्टाइल (00:35.38) आणि 100 मीटर वैयक्तिक मेडले (01:31.20) प्रकारात तर अनाहीने 50 मीटर बॅक स्ट्रोक (00:43.30), 50 मीटर बटरफ्लाय (00:50:40) आणि 100 मीटर वैयक्तिक मेडली (015.92) प्रकारात अव्वल स्थान पटकावले.

स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी ओटर्सच्या कियान कपले याने 8 वर्षांखालील मुलांच्या गटात 50 मीटर फ्री स्टाईल प्रकारामध्ये (00:39.05) आणि 50 मीटर बॅक स्ट्रोक (00.39) सुवर्णपदक पटकावले. मुलींमध्ये पहेल शाह (सीएसएमएसएस) हिने 50 मीटर बटरफ्लाय स्ट्रोक (0051.59), 50 मीटर बॅक स्ट्रोक (00:49.49) आणि 50 मीटर ब्रेस्ट स्ट्रोक (00.52.62) प्रकारात सुवर्ण कामगिरी केली.

**सर्व विजेते:** मुली - 9 वर्षांखालील: अनाही जैन (डब्ल्यूएसपी)- 3 सुवर्ण. 8 वर्षांखालील: पहेल शाह (सीएसएमएसएस) - 3 सुवर्ण. 7 वर्षांखालील: शौर्य खर्डे (मुलुंड एसपी)-1 ; 6 वर्षांखालील: धिया पारिख (गतझक्र)-4; 5 वर्षांखालील: सावी गीते (सीएसएमएसएस)-3.

**मुले - 9 वर्षांखालील:** शिवांश आठल्ये (सीएसएमएसएस)- 3 सुवर्ण; 8 वर्षांखालील: कियान कपले (ओटर्स क्लब)- 2 सुवर्ण; 7 वर्षांखालील: ध्रुव खांडवाला (जेव्हीपीजी)-2; 6 वर्षांखालील: अगस्त्य राव (एसएमएसपी)-4; 5 वर्षांखालील: राघव चौधरी (जनरल ए. के. वैद्य (एसडब्ल्यूपी)- 3.



## भारतीय प्रशासकीय सेवेच्या अधिकाऱ्यांची बृहन्मुंबई महानगरपालिकेला भेट

प्रतिनिधी
■ मुंबई

भारतीय प्रशासकीय सेवेच्या २०२३ च्या तुकडीच्या ११ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांनी प्रशिक्षणाचा भाग म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय येथे मंगळवारी भेट दिली. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून पुरविण्यात येणाऱ्या विविध नागरी सेवा- सुविधांची माहिती तसेच सद्यस्थितीला पालिका क्षेत्रात सुरू असलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांबाबतची माहिती त्यांना देण्यात आली. पालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी परिविक्षाधीन अधिकाऱ्यां समवेत संवाद साधला.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा (पश्चिम उपनगरे), अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांची उपस्थिती होती. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्याचा आढावा घेणारा माहिती चित्रफीत यावेळी दाखवण्यात आला. त्यासोबतच महानगरपालिकेच्या कामकाजाचे सविस्तर सादरीकरणही यावेळी करण्यात आले.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांना आपल्या कार्यक्षेत्रात सुरूवातीच्या दिवसांमध्ये अधिकाधिक भेटी देऊन विषय समजून घेण्याची सूचना केली. तसेच अधिकाधिक वेळ हा स्थळ भेटींना देण्याचा सल्लाही त्यांनी दिला. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. अमित सैनी यांनी अधिकारी वर्गाची ओळख आणि कार्यक्षेत्राची माहिती करून घेतली. तसेच दैनंदिन कामकाजात येणारी आव्हाने कशा स्वरूपाची आहेत, याबाबतची माहितीही जाणून घेतली.

मुंबई किनारी रस्ता प्रकल्प, मुंबई सेंट्रल पब्लिक पार्क प्रकल्प आदी विषयावर परिविक्षाधीन अधिकाऱ्यांनी माहिती जाणून घेतली. तसेच पालिकेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांचे व एकूणच महानगरपालिकेच्या कामगिरीचे कौतुकही केले. एतिहासिक वारसा असलेल्या महानगरपालिकेच्या इमारतीचा 'हेरिटेज वॉक' देखील परिविक्षाधीन अधिकाऱ्यांनी केला. महानगरपालिकेची वास्तू पाहून उपस्थित सर्वच अधिकारी वर्ग भारावून गेला.



## राणी बागेत 10 महिन्यात 17 लाख पर्यटक ; 7 कोटींचे उत्पन्न

### पावसाच्या चार महिन्यात ५ लाख पर्यटक; २ कोटींचे उत्पन्न

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईची शान असलेल्या भायखळा येथील राणीच्या बागेत ( वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणी संग्रहालय) १ जानेवारी ते १९ ऑक्टोबर या १० महिन्यांच्या कालावधीत १७ लाख ५१ हजार ९२७ पर्यटकांनी भेट दिली. त्यामुळे महापालिकेला तब्बल ६ कोटी ९९ लाख ९ हजार १०८ रुपये इतके उत्पन्न मिळाले आहे.

मुंबई महापालिकेने आजपर्यंत राणी बागेच्या आधुनिकीकरणासाठी आणि आंतरराष्ट्रीय झू पार्क बनविण्यासाठी पेंग्विन कक्ष आणि नवीन प्राणी, आधुनिक पिंजरे आदींवर महापालिकेने कोट्यवधी रुपये खर्च केले आहेत. तो खर्च भरून काढण्यात सदर उत्पन्नामुळे मोठी मदत झाली आहे.

विशेष म्हणजे पावसाळ्यात म्हणजे जून ते सप्टेंबर या चार महिन्यांच्या कालावधीत राणीच्या बागेत ५ लाख १० हजार पर्यटकांनी भेट दिली. त्यामुळे पालिकेला २ कोटी ६ लाख २५ हजार रुपये इतके उत्पन्न मिळाले आहे. यामध्ये, १ ते १९ ऑक्टोबर या कालावधीत राणी बागेत भेट दिलेल्या ७४ हजार ९४८ पर्यटकांचा आणि त्यामुळे मिळालेल्या ३० लाख ५३ हजार रुपये उत्पन्नाचाही समावेश आहे.

मुंबईत गेट वे ऑफ इंडिया, जुहू चौपाटी, जहांगीर आर्ट गॅलरी, छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय, एलिफंटा, राणीचा रत्नहार, हँगिंग गार्डन आदी प्रेक्षणीय व पर्यटन स्थळे आहेत. त्याच सोबत भायखळा येथील राणीची बाग सुद्धा मुंबईची शान आहे. या राणीच्या बागेत दररोज हजारो पर्यटकांची गर्दी असते. विशेषतः गेल्या काही वर्षांपासून मुंबई महापालिकेने राणीच्या बागेचे आधुनिकीकरण करण्याचे काम हाती घेतले असून हे काम युद्धपातळीवर केले जात आहे. यामध्ये, राणीच्या बागेत नवनवीन प्राणी आणि पक्षी आणण्यात येत आहेत. यांपैकी एक पेंग्विन पक्षी विदेशातून २०१६ - १७ मध्ये राणीच्या बागेत आणण्यात आले. एका पेंग्विनचा जंतू संसर्ग झाल्याने दुर्दैवाने मृत्यू झाला होता. त्यामुळे पेंग्विनची संकल्पना मांडणारे आणि सत्यात आणणारे युवा नेते, माजी मंत्री आणि आमदार आदित्य ठाकरे यांच्यावर आणि पालिका प्रशासनाला विरोधकांनी चांगलीच टीका करीत तोफ डागली होती.

मात्र त्यानंतर आजपर्यंत एकही पेंग्विन मृत पावलेला नाही. उलट पेंग्विनच्या संख्येत वाढ झाली. या पेंग्विनला बघण्यासाठी मुंबईकर, महिला, तरुण वर्ग आणि बच्चे कंपनी मोठ्या प्रमाणात राणीच्या बागेत गर्दी करीत असतात.

त्यामुळे राणीच्या बागेत भेट देणाऱ्या देशी व विदेशी पर्यटकांच्या संख्येत वाढ होताना दिसत आहे. फक्त पावसाळ्यात जून ते सप्टेंबर या चार महिन्यात राणी बागेत भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या कमी असते. मात्र इतर वेळी म्हणजे जानेवारी ते मे आणि ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत पर्यटक जास्त संख्येने राणीच्या बागेत भेट देत असतात. त्यामुळे पालिकेच्या उत्पन्नात चांगलीच वाढ होत आहे.




**राणीच्या बागेत १ जानेवारी ते १९ ऑक्टोबर २०२४ या कालावधित राणी बागेत भेट देणारे पर्यटक व उत्पन्न याची माहिती**

| महिना | पर्यटक | उत्पन्न |
|---|---|---|
| जानेवारी | २,९१,१३६ | १,१४,६६,९८७ |
| फेब्रुवारी | १,९०,५७० | ७७,५३,६१० |
| मार्च | १,५०,०९१ | ६०,८९,०४५ |
| एप्रिल | २,१७,८९४ | ८६,४५,७८० |
| मे | ३,१७,२८७ | १,२२,७४,९६५ |
| जून | २,०४,७४५ | ८०,९३,६४१ |
| जुलै | ५७,८५३ | २४,७६,५०० |
| ऑगस्ट | १,१८,२११ | ४८,९९,२४० |
| सप्टेंबर | १,२९,१९२ | ५१,५५,९१५ |
| १९ऑक्टोबर पर्यंत | ७४,९४८ | ३०,५३,४२५ |
| एकूण | १७,५१,९५२ | ६,९९,०९,१०८ |

## महापालिकेच्या सेवानिवृत्तांचा सांस्कृतिक सोहोळा उत्साहात



■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनच्या गोरेगाव विभागातर्फे नुकतेच प्रबोधन क्रीडा भवनातील सभागृहात सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी मंत्री सुभाष देसाई आणि बृहन्मुंबई महानगरपालिका पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष कमलाकर क्षीरसागर उपस्थित होते. जुनी पेन्शन आणि नवीन पेन्शनमधील फरक समजावून सांगून महापालिका कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजनेसाठी प्रयत्नशील असल्याचे देसाई यांनी सभासदांना सांगितले.

या वेळी संघटनेच्या नीता मांजरेकर, राजश्री श्रोत्रिय, ललिता भट, संजय भातखंडे, गौरी वंदना, राजन नाईक, अजित कदम यांनी सुमधुर गाणी म्हणत श्रोत्यांचे मनोरंजन केले. आनंद पुरंदरे यांनी कवितांचे वाचन करीत सर्वांना आनंद दिला. या कार्यक्रमासाठी संजय मोरे, बळीराम कदम, ज्ञानदेव कदम, आनंद पुरंदरे, भुवड , बंगेरा, जगदाळे, सुनील माने, पडवळ, स्वरदा दाते, निलिमा जवंजाळ, प्रबोधन क्रीडा भवनाचे प्रमुख कार्यवाह गोविंद उर्फ विजू गावडे यांचे सहकार्य लाभले.

## शिवसहाय सिंह राणा यांच्या 40 वर्षांच्या निष्ठेवर जनतेचा विश्वास

प्रतिनिधी
■ मुंबई

गेल्या ४० वर्षांपासून काँग्रेसचे एक निष्ठावान सैनिक म्हणून काम करणारे शिवसहाय सिंह राणा हे उत्तर भारतीय नेते आहेत. ज्यांच्यावर जनतेचा पूर्ण विश्वास आहे. काँग्रेसच्या ढासळलेल्या परिस्थितीबरोबरच एका बाजूला मोठं मोठे उत्तर भारतीय नेते मंडळी इतर पक्षांमध्ये सामील झाले असताना, राणा मात्र काँग्रेस सोबत एक निष्ठावान सैनिक म्हणून, पक्षासाठी लोकांमध्ये काम करत राहिले. त्यामुळेच त्यांची अतूट निष्ठा लक्षात घेऊन जनतेचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास आहे.

त्यांनी 160, कांदिवली पश्चिम विधानसभा मतदारसंघातून तिकिटासाठी दावा केला आहे. त्यांची निष्ठा आणि जनतेमध्ये सातत्याने केलेले काम पाहता त्यांना तिकीट नक्कीच मिळेल, असा येथील जनतेला पूर्ण विश्वास आहे. अपक्ष नगरसेवक म्हणून राजकीय इनिंग सुरू करणाऱ्या राणा यांचा उत्तर भारतीय समाजात चांगलाच प्रभाव असल्याचे मानले जाते.लोकसभा निवडणुकीतही त्यांनी उत्तर मुंबईतून दावा केला होता.

उत्तर मुंबई हा उत्तर भारतीयांचा बालेकिल्ला मानला जातो. कांदिवली, बोरिवली आणि मालाड दिंडोशी भागात 30 ते 35 टक्के उत्तर भारतीय मतदार आहेत. शिवसहाय सिंह राणा हा उत्तर भारतीय समाजाचा लोकप्रिय आणि निर्दोष चेहरा मानला जातो. त्यामुळेच जनतेसह राजकारणाशी निगडित लोकांचाही विश्वास आहे.त्यामुळेच राणा यांना तिकीट दिल्याने काँग्रेसला फायदा होईल, असा विश्वास जनतेसोबतच राजकारणाशी संबंधित असलेल्यांनाही आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री नसीम खान आणि महाराष्ट्र अध्यक्ष नाना पटोले सातत्याने त्यांचे कौतुक करत आहेत. अशा स्थितीत दोन्ही नेत्यांचा त्यांच्यावर आशीर्वाद असल्याचे मानले जात आहे.



## मतदारांसाठी मतदान केंद्रावर किमान आवश्यक सुविधा उपलब्ध

### अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. अश्विनी जोशी

■ मुंबई

मतदारांना मतदान केंद्रावर किमान आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतचे निर्देश भारत निवडणूक आयोगाने दिले आहेत. त्यानुसार सर्व मतदान केंद्रांवर किमान आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी (मुंबई शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी सांगितले.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या निवडणूक कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्या बोलत होत्या. या पत्रकार परिषदेस मुंबई शहर जिल्हाधिकारी तथा अति. जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव, अतिरिक्त पोलीस आयुक्त डॉ. अभिनव देशमुख, अपर जिल्हाधिकारी तथा समन्वय अधिकारी निवडणूक फरोग मुकादम, उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्यामसुंदर सुरवसे तसेच मुंबई शहर जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित होते.

## टिळक नगर कर्नाटक संघाच्या वार्षिक कार्यक्रमात आमदार मंगेश कुडाळकर यांचा सन्मान




■ मुंबई

चेंबूर टिळक नगर येथील नवदुर्गा मित्र मंडळाच्या परिसरात टिळक नगर कर्नाटक संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत स्थानिक शिवसेना आमदार मंगेश कुडाळकर यांना विशेष पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. टिळक नगर कर्नाटक संघाचे अध्यक्ष सुरेश शेट्टी आणि त्यांच्या टीमने विभागात केलेल्या कामाबद्दल आमदार मंगेश कुडाळकर यांचे स्वागत करून शाल व श्रीफळ देऊन सन्मान केला. यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष टी आर शेट्टी यांनी कुडाळकर यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमात सचिव अरुण शेट्टी, खजिनदार गणेश पुजारी, ज.टी. सेक्रेटरी शशी पुजारी, माजी अध्यक्ष रमन्ना देवाडिगा, नवनिर्वाचित अध्यक्ष मालती मोईली, मावळत्या अध्यक्षा शालिनी शेट्टी, नागवेणी शेट्टी, संजय कदम, विभाग प्रमुख, प्रकाश बसरूर प्रभारी प्रशासक उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाला संस्थापक अध्यक्ष शेखर शेट्टी आणि माजी अध्यक्ष नित्यानंद शेट्टी आदीसह मोठ्या संख्येने कर्नाटकी समाज देखील उपस्थित होता.

## हसन नसरल्लाहच्या बंकरमध्ये सापडले 500 दशलक्ष डॉलर्सचे सोने; इस्रायलचा मोठा दावा

**बेरूत:** लेबनॉनची राजधानी बेरूतवर इस्रायलने २७ सप्टेंबर रोजी केलेल्या हवाई हल्ल्यात हिजबुल या दहशतवादी संघटनेचा प्रमुख हसन नसरल्लाहचा मृत्यू झाला. हसन नसरल्लाह इस्रायलच्या सर्वांत मोठ्या शत्रूंपैकी एक होता. तो बऱ्याच काळापासून आपली ठिकाणे बदलत राहून स्वतःला सुरक्षित ठेवत होता. मात्र, इस्रायलने त्याला ठार केले. यानंतर आता इस्रायलने एक मोठा खुलासा केला आहे. हसन नसरल्लाह ज्या बंकरमध्ये राहायचा त्या गुप्त बंकरमध्ये ५०० दशलक्ष डॉलर्सचे सोने आणि रोख रक्कम सापडल्याचा दावा इस्रायलकडून करण्यात आला आहे. लेबनॉनमधील एका हॉस्पिटलच्या खाली एक गुप्त बंकर आहे. त्यामध्ये ५०० दशलक्ष डॉलर्सपेक्षा जास्त किमतीचे सोने आणि रोख रक्कम आहे, अशी माहिती इस्रायल डिफेन्स दिली आहे. याबाबतचा एक व्हिडीओही आयडीएफने एक्सवर (ट्विटर) शेअर केला आहे. इस्रायली लष्कर आयडीएफच्या म्हणण्यानुसार, लेबनॉनमधील एका हॉस्पिटलखाली मोठे बंकर आहे. तो बंकर हसन नसराल्लाहचा होता. त्या ठिकाणी कोट्यवधी रुपयांचे सोने आणि रोकड ठेवण्यात आलेली आहे.



# विश्वास प्रस्थापित करायला वेळ लागेल...

## चीन म्हणतेय, मिळून वाद सोडवू



**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

भारत आणि चीन दरम्यान प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर (एलएसी) गस्त करारानंतर चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने मंगळवारी सांगितले की आम्ही आमचा सीमा विवाद एकत्र सोडवू.

भारताचे लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी मंगळवारी या कराराला चांगले पाऊल म्हटले आहे. ते म्हणाले- सर्वप्रथम दोन्ही देशांना पुन्हा विश्वास निर्माण करावा लागेल. त्यासाठी सैनिकांनी एकमेकांना पाहणे आणि बोलणे आवश्यक आहे. यासाठी योग्य वातावरण पेट्रोलिंगद्वारे उपलब्ध करून दिले जाईल.

भारत आणि चीनने एक दिवस आधी 21 ऑक्टोबर रोजी गस्त घालण्यावर सहमती दर्शवली होती. परराष्ट्र मंत्री एस जयशंकर म्हणाले होते की भारत आणि चीनमध्ये सीमेवर गस्त व्यवस्थेबाबत एक करार झाला आहे. यामुळे मे 2020 पूर्वीची परिस्थिती पूर्वपदावर येईल (गलवान संघर्ष). हे सकारात्मक आहे. लष्करप्रमुख म्हणाले- बफर झोन व्यवस्थापन, डी-एस्केलेशन आवश्यक आहे

भारत आणि चीन यांच्यातील करारानंतर लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी म्हणाले की, "आम्ही पुन्हा विश्वास संपादन करण्याच्या प्रक्रियेत आहोत. त्यासाठी वेळ लागेल. त्यासाठी सैन्य मागे घेणे आणि बफर झोन व्यवस्थापन हेही महत्त्वाचे आहे. आपण विश्वास कसा निर्माण करू? जेव्हा आपण एकमेकांचे ऐकू शकतो आणि एकमेकांना संतुष्ट करू शकतो. तयार झालेल्या बफर झोनमध्ये आम्ही जाऊ असा विश्वास व्यक्त करू शकू.

पेट्रोलिंगमुळे तुम्हाला ही प्रक्रिया करणे सोपे जाईल. दोन्ही बाजूंना एकमेकांचे मन वळवण्याची संधी मिळेल. एकदा विश्वास प्रस्थापित झाल्यानंतर, पुढील पाऊल उचलले जाईल." पूर्व लडाखमधील वास्तविक नियंत्रण रेषेवर (LAC) एप्रिल 2020 मध्ये पूर्वस्थिती पूर्ववत करण्यास चीन आणि भारत सहमत झाले आहेत. याचा अर्थ आता चिनी सैन्याने ज्या भागात अतिक्रमण केले होते तेथून माघार घेणार आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते विक्रम मिसरी यांनी सोमवारी सांगितले की, भारत आणि चीनच्या सीमावर्ती भागात गस्त घालून 2020 नंतर उद्भवणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी एक प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. दोन्ही देश यावर पावले उचलतील.

एप्रिल 2020 मध्ये लष्करी सरावानंतर चीनने पूर्व लडाखच्या 6 भागात अतिक्रमण केले होते. 2022 पर्यंत चिनी सैन्याने 4 भागातून माघार घेतली आहे. भारतीय सैन्याला दौलत बेग ओल्डी आणि डेमचोकमध्ये गस्त घालण्याची परवानगी नव्हती.

## पंजाबमधील हिंदू मंदिरासाठी पाकिस्तान सरकारने मंजूर केला १ कोटी रुपयांचा निधी



### ६४ वर्षांनंतर होणार जिर्णोद्धार

**वृत्तसंस्था**
**इस्लामाबाद**

पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील नारोवाल जिल्ह्यातील बाओली साहीब हिंदू मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी पाकिस्तान सरकारने १ कोटी पाकिस्तानी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. ६४ वर्षांनंतर आता या मंदिराचं बांधकाम करण्यात येणार आहे. त्यामुळे या गावातील हिंदू नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे. १९६० पासून हे मंदिर जीर्ण अवस्थेत असल्याची माहिती आहे.

पाकिस्तानातील अल्पसंख्यकांच्या प्रार्थनास्थळाशी संबंधित असलेली इव्हाक्यू प्रॉपर्टी ट्रस्ट ही संस्था या मंदिराचे बांधकाम करणार आहे. या मंदिराचा पाया खनण्याचे कामदेखील सुरु झालं आहे. या मंदिरांचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर हे मंदिर पाक धर्मस्थान समितीकडे सोपवण्यात येणार असल्याचे सांगितलं जात आहे. जवळपास ६४ वर्षांनंतर या मंदिरांचे बांधकाम होत असल्याने या गावातील नागरिकांनी समाधान व्यक्त केला आहे. गेल्या ६४ वर्षांपासून या गावात हिंदू धर्मियांसाठी कोणतेही प्रार्थनास्थळ नसल्याने येथील हिंदू नागरिकांना पुजा करण्यासाठी लाहोर किंवा सियालकोट येथील मंदिरांमध्ये जावं लागत होते. त्यामुळे या मंदिराचे बांधकाम करावं, अशी मागणी येथील गावकऱ्यांकडून करण्यात येत होती. पाक धर्मस्थान समितीकडूनही गेल्या २० वर्षांपासून या मंदिराच्या बांधकामासाठी पाठपुरावा करण्यात येत होता.

यासंदर्भात बोलताना, पाक धर्मस्थान समितीचे अध्यक्ष सावन चंद म्हणाले, गेल्या २० वर्षांपासून आम्ही मंदिराच्या बांधकामासाठी पाठपुरावा करतो आहे. आमच्या प्रयत्नांना आता कुठं यश आलं आहे. त्यासाठी पाकिस्तान सरकारचे आभार मानतो. या निर्णयामुळे आता गावातील हिंदू धर्मियांना गावात पूजा करता येणार आहे.

पान ९ वरुन

### पोलिसांच्या पाच कोटींच्या कारवाईला राजकीय ब्रेक

मात्र त्यानंतरच्या पुढील कारवाईची कोणतीच माहिती पत्रकारांना देण्यात आली नाही. यामुळे रक्कम नक्की किती होती,ती कोणाची होती व कोठुन कुठे चालवली होती,तसेच ताब्यात घेण्यात आलेल्या चौघा जणांबाबत कोणती कारवाई करण्यात आली. याबाबत उपस्थित सर्वच अधिकारयांनी एकमेकांकडे बोट दाखवत शिवापुर चौकी येथुन काढता पाय घेतला. ऐवढ्या मोठ्या कारवाई अचानक ब्रेक का लागला या बाबत राजकीय दबाव आल्याची चर्चा मात्र यामुळे सुरु झाली. रक्कम घेवुन चाललेल्या इनोव्हा कार च्या क्रमांकावरुन सदर कार ही अमोल नलावडे रा. सांगोला जिल्हा सोलापुर यांची असल्याचे स्पष्ट झाले तसेच कारवाई नंतर शिवापुर चौकी जवळ त्या सांगोला भागातील नेत्याचे कार्यकर्ते एक नगरसेवक उपस्थित होते. ताब्यात घेण्यात आलेल्या चौघांची नावे निष्पन्न केली असता त्यामध्ये सागर सुभाष पाटील रा. सांगोला, रफिक अहमद नदाफ रा. सांगोला, बाळासाहेब आसबे रा. आकोला ता. सांगोला व कार चालक शशिकांत कोळी रा. वासुद ता. सांगोला अशी असल्याचे समजले यावरुन कारवाईला अचानक कोठुन ब्रेक लागला या बाबत राज्यातील विरोधीपक्षाकडुन देखिल बोलले जावु लागले. या सर्व घडामोडीत रात्रभर कारवाईची गुप्तता पाळत ता. 22 रोजी पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास पँकिंग केलेली रक्कम राजगडचे पोलिस निरीक्षक राजेश गवळी यांनी त्यांच्या वाहनातुन ट्रेझरी मध्ये जमा करण्यासाठी नेली मात्र तरी देखिल कोणतीही माहीती प्रसार माध्यमांना देण्यात आली नाही.याबाबत सकाळी बातम्या प्रसिध्द होताच पुणे येथील सर्वच वृतवाहीन्यांच्या पत्रकारांनी राजगड पोलिस ठाणे येथे येऊन या बाबत बातम्या सुरु केल्या सर्वत्र विषय सुरु झाल्यावर पुणे पोलिस अधिक्षक पंकज देशमुख यांनी या कारवाईचा माहीती देताना कार मधुन रोख पाच कोटी रुपये हस्तगत केले असुन सदर रक्कम ट्रेझरी मध्ये जमा करण्यात येऊन संबधीत चार व्यक्तींना पुढील चौकशीसाठी आयकर विभागाच्या ताब्यात देण्यात आल्याचे सांगितले आहे.

### दबाव टाकून मविआ सरकार पाडण्याचा प्रयत्न

तर, त्याआधी सीबीआयकडूनही त्यांची चौकशी झाली होती. माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांनी पत्राद्वारे केलेल्या आरोपांनुसार सीबीआयने एप्रिल 2021 मध्ये त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. अनिल देशमुखांनी पब आणि हॉटेल चालकांकडून 100 कोटी उकळल्याचा दावा परमबीर सिंग यांनी केला होता. अनिल देशमुख हे 1995 साली पहिल्यांदा अपक्ष उमेदवार म्हणून काटोल मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निवडून गेले होते.

## जबलपूरमध्ये लष्कराच्या ऑर्डिनन्स फॅक्ट्रीत स्फोट : 2 कर्मचाऱ्यांचा मृत्यू



**वृत्तसंस्था**
**जबलपूर**

जबलपूरच्या आयुध निर्माणी खमारिया (OFK) मध्ये मंगळवारी सकाळी भीषण स्फोट झाला. 2 कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. 10 हून अधिक जळाले आहेत. दोघांची प्रकृती चिंताजनक असून, त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

कारखाना व्यवस्थापनाने घटनास्थळ गाठून तपास सुरू केला आहे. कारखान्याच्या F-6 विभागातील इमारत क्रमांक 200 मध्ये हा स्फोट झाला. स्फोटानंतर एक कर्मचारी बेपत्ता होता, त्याचा मृतदेह सापडला आहे. त्याचवेळी अन्य एका कर्मचाऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. OFK GM आणि इतर अधिकारी घटनास्थळी उपस्थित आहेत. तथापि, अधिकारी सध्या मीडियाशी कोणतीही माहिती सामायिक करत नाहीत. कॅन्ट विधानसभेचे आमदार अशोक रोहानी जखमींना पाहण्यासाठी खमरिया येथील रुग्णालयात पोहोचले. स्फोटात जखमी झालेल्या कर्मचाऱ्यांना ओएफके रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बॉम्ब भरत असताना स्फोट झाला मिळालेल्या माहितीनुसार, कारखान्याच्या एफ-6 विभागात बॉम्ब भरण्याचे काम सुरू होते. यावेळी हायड्रोलिक सिस्टीममध्ये अचानक स्फोट झाला. घटनेनंतर जखमी कर्मचाऱ्यांना ओएफके रुग्णालयात नेण्यात आले. प्रकृती चिंताजनक झाल्याने कर्मचारी रणधीर, श्यामलाल आणि चंदन यांना खासगी रुग्णालयात रेफर करण्यात आले. हा स्फोट कसा झाला आणि कोणाचा निष्काळजीपणा कारणीभूत आहे, याचा तपास सुरू करण्यात आला आहे. रहिवासी म्हणाले, भूकंप झाल्यासारखे वाटले स्फोटानंतर ओएफकेला लागून असलेल्या सुमारे 5 किलोमीटर परिसरात भूकंप झाल्यासारखे वाटले. लोक घराबाहेर पडले. मानेगाव, चंपानगर, नानक नगर येथे राहणाऱ्या लोकांनाही स्फोटाचा आवाज ऐकू आला. मानेगाव येथे राहणारे मनोज थरेजा यांनी सांगितले की, सुरुवातीला भूकंप झाल्यासारखे वाटत होते, त्यानंतर कारखान्यात स्फोट झाल्याचे समोर आले.

## बांधकाम सुरू असलेली इमारत कोसळली

### मुसळधार पावसाचा बंगळुरूमध्ये कहर

**वृत्तसंस्था**
**बंगळुरू**

बंगळुरूमध्ये आज मुसळधार पाऊस झाला. या पावसाने कहर केला आहे. पावसामुळे बांधकाम सुरू असलेली इमारत कोसळली आहे. या इमारतीमध्ये अनेक मजूर अडकल्याची भीती आहे. बंगळुरू पूर्व येथील होरामवू आग्रा भागात ही घटना घडली असून आपत्कालीन सेवा कामगारांचा शोध घेण्यासाठी घटनास्थळी पोहोचल्या आहेत.

अग्निशमन आणि आपत्कालीन विभागाच्या दोन रेस्क्यू व्हॅन बचाव कार्यासाठी तैनात करण्यात आल्या आहेत. या घटनेची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. शहरात मुसळधार पाऊस सुरू असताना ही घटना घडल्याचे त्यांनी सांगितले. पोलिसांनी दिलेली माहिती अशी, इमारतीत १७ लोक अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे आणि इतर एजन्सींच्या मदतीने समन्वित प्रयत्नात बचाव कार्य केले जात आहे.

## सनातनविरोधी वक्तव्यावर माफी मागणार नाही!




**वृत्तसंस्था**
**चेन्नई**

तामिळनाडूचे डेप्युटी सीएम उदयनिधी स्टॅलिन यांनी सनातन आजार असल्याच्या वक्तव्याबद्दल माफी मागण्यास नकार दिला आहे. ते सोमवारी चेन्नईतील एका कार्यक्रमात म्हणाले की, पेरियार, अन्नादुराई आणि करुणानिधी यांनीही सनातनबद्दल जे सांगितले तेच मी बोललो.

माझ्या वक्तव्याचा विपर्यास करण्यात आल्याचे उदयनिधी म्हणाले. तामिळनाडूसह देशभरात अनेक न्यायालयीन खटले सुरू होते. मला माफी मागण्यासही सांगण्यात आले होते, पण मी कलैगनर (कला अभ्यासक) यांचा नातू आहे. मी माफी मागणार नाही. माझ्या टिप्पण्यांचा उद्देश महिलांवरील कथित अत्याचारी प्रथा दर्शविण्याचा होता. हिंदू धर्मात स्त्रियांना शिक्षण घेण्याची परवानगी नव्हती. त्यांना घराबाहेर जाता येत नव्हते आणि त्यांचे पती मेले तर त्यांनाही मरावे लागले. पेरियार यांनी या सगळ्याविरोधात आवाज उठवला होता.

## मृतदेहावर अर्पण करण्यात येणारे पुष्पचक्र तुटलेल्या एस्केलेटरवर वाहून पार्थना केली

### केरळच्या वकिलांचे अनोख्या पद्धतीने आंदोलन



**वृत्तसंस्था**
**कोची**

केरळ उच्च न्यायालयाच्या वकिलांनी मंगळवारी उच्च न्यायालयात बसवण्यात आलेल्या एस्केलेटर (स्वयंचलित जिना) वारंवार खराब होत असल्याबद्दल विचित्र पद्धतीने आपला निषेध व्यक्त केला. यासाठी केरळ हायकोर्ट ॲडव्होकेट असोसिएशनचे माजी अध्यक्ष राजेश विजयन आणि अन्य एका वकिलाने एस्केलेटरवर मृतदेहावर वाहण्यात येणारे पुष्पचक्र अर्पण केले.

यानंतर त्यांनी हात जोडून प्रार्थनाही केली. आता या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

कोर्टात येणाऱ्या बहुतांश लोकांचे म्हणणे आहे की, गेल्या काही वर्षांत एस्केलेटर क्वचितच सुरू झाले. उच्च न्यायालय आठ मजली इमारतीत आहे. 2006 मध्ये त्याचे उद्घाटन झाल्यापासून, निकृष्ट दर्जाच्या बांधकामाच्या तक्रारी आहेत.

## टीएमसी खासदाराने वक्फ विधेयकाच्या बैठकीत बाटली फोडली

**कोलकाता**

मंगळवारी संसदेत वक्फ विधेयकावर जेपीसीच्या बैठकीत वादावादी झाली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, टीएमसी खासदार कल्याण बॅनर्जी आणि भाजप खासदार अभिजित गंगोपाध्याय यांच्यात जोरदार वाद झाला. यादरम्यान कल्याण बॅनर्जी यांनी टेबलावर ठेवलेली काचेची पाण्याची बाटली फोडली, त्यामुळे ते जखमी झाले. त्यांच्या अंगठ्याला आणि बोटाला दुखापत झाली. नंतर त्यांना उपचारासाठी नेण्यात आले. या घटनेनंतर काही काळ बैठक थांबवण्यात आली होती. उपचारानंतर एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी आणि आप नेते संजय सिंह त्यांना पुन्हा बैठकीच्या खोलीत घेऊन जाताना दिसले. वक्फ विधेयकावरील संसदीय समिती टीएमसी खासदार कल्याण बॅनर्जी यांना बैठकीत त्यांच्या बेशिस्त वर्तनासाठी निलंबित करण्याच्या प्रस्तावावर विचार करत आहे.

## 3 राज्यांतील 5 शाळांमध्ये बॉम्बस्फोटाची धमकी

### CRPFच्या 3 शाळांचा समावेश, मेलद्वारे दिली धमकी



**वृत्तसंस्था**
**हैद्राबाद**

केंद्रीय राखीव पोलीस दलाला (CRPF) दिल्लीतील 2 आणि हैदराबादमधील 1 शाळांना बॉम्बच्या धमक्या मिळाल्या आहेत. एएनआय या वृत्तसंस्थेनुसार, ही धमकी तीन शाळांच्या व्यवस्थापनाला ईमेलद्वारे पाठवण्यात आली होती. याशिवाय तामिळनाडूतील कोईम्बतूर येथील चिन्नवेदमपट्टी आणि सर्वनमपट्टी या दोन खासगी शाळांनाही बॉम्बच्या धमक्या मिळाल्या आहेत. मंगळवारी सकाळी बॉम्बशोधक पथक या सर्व शाळांमध्ये पोहोचले. शाळा रिकामी करून तपास केला जात आहे. मात्र, अद्याप काहीही संशयास्पद आढळले नाही.मयापूर्वी 20 ऑक्टोबरला दिल्लीतील रोहिणी येथील सीआरपीएफ शाळेत स्फोट झाला होता. मात्र, या हल्ल्यात कोणीही जखमी झाले नाही. फक्त दुकाने आणि शाळेच्या भिंतीचे नुकसान झाले.

## 'मुत्सद्दी राजनैतिक' अजित गुप्ते जर्मनीत भारताचे राजदूत



**वृत्तसंस्था**
**नवीदिल्ली/ बर्लिन**

अजित विनायक गुप्ते ह्यांची भारताचे राजदूत म्हणून जर्मनी येथे नियुक्ती झाली आहे. गुप्ते.ह्यांचा जन्म नागपूर येथे झाला.शालेय ,प्राथमिक,माध्यमिक शिक्षण नागपूर, अहमदनगर येथून झाल्यावर उच्च माध्यमिक मुंबई येथे सेंट झेवियर शाळेत झाले. चर्चगेट येथील जयहिंद कॉलेज ११वी,१२ वी केल्यानंतर सिडनेहम कॉलेज मधून त्यांनी बी. कॉम पदवी प्राप्त केली.


छात्र सेनेतर्फे( N CC)दिल्ली येथे होणाऱ्या कॅम्प मध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले.अखिल भारतीय NCC कॅडेट्स स्पर्धांमधून दुसरा क्रमांक पटकावला त्यामुळे त्यांची भारत - कॅनडा युथ exchannge साठी निवड झाली. तीन महिने भारत व तीन महिने कॅनडा असा हा प्रोग्राम होता .तेथून लगेच ते सिडनी ,ऑस्ट्रेलिया येथे रवाना झाले .अनेक युनिव्हर्सिटीमध्ये स्कॉलरशिप मिळत होत्या परंतु फॉरेन सर्व्हिस जॉईन करून देशसेवा करणे हे त्यांचे ध्येय होते त्यामुळे ते भारतात परत आले आणि UPSC सिव्हिल परीक्षा दिली .IFS टॉपर्स मध्ये नंबर मिळवला .त्यानंतर हाँगकाँग येथून चायनीज भाषा शिकले.

हाँगकाँग (98-2000),बीजिंग,(2000-2004) ढाका( 2004-2008). ICCR (2008-2010)डेप्युटी डायरेक्टर of cultural रिलेशन्स) डेप्युटी चीफ ऑफ मिशन 2010-2014 indian Embassy Berlin, तसेच Charge D ' Affairs Nine months in बर्लिन अशी त्यांची वाटचाल चालू होती.seniority वाढत होती तस तशी गुप्ते यांची कार्यक्षमता उजळत होती.जास्त जबाबदारी पडत होती उदा. दिल्ली2010-2017 येथे Lines of Credit ची जोखमीची जबाबदारी गुप्ते यांच्या वर सोपवली गेली.LOC म्हणजे शेजारची राष्ट्रे आणि आफ्रिकन देशांना देण्यात येणारी आर्थिक मदत. ही जबाबदारी त्यांनी समर्थपणे पेलली. आर्थिक किंवा राजकीय गुंतागुंती चया समस्या कुशलतेने सोडवण्याची त्यांची हातोटी ,analytical विचार पद्धती, बौद्धिक प्रगल्भता, शांतपणे विचार करणे वेळोवेळी निदर्शनास येत होते .

(2017-2021) Denmark येथे राजदूत म्हणून नेमणूक झाली. डेन्मार्क आणि भारताचे राजकीय संबंध frozen होते.परिस्थिती अत्यंत नाजूक होती.आपले कसे स्वागत होईल याची मनात धाकधूक होती .परंतु अजित गुप्ते यांचे आकर्षक व्यक्तिमत्व,आत्मविश्वास,सुहास्य चेहरा बघून डेन्मार्क वाल्यांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले.आपल्या मृदू बोलण्याने त्यांनी सर्वांची मने जिंकली.बरेच मित्र झाले.आणि Frozen Relation cha गुंता नाजूक,हळुवारपणे सोडवण्यात गुप्ते यशस्वीपणे. एक प्रकारे मानाचा तुरा मिळवला. 2021 मध्ये ईजिप्त ची राजधानी कैरो येथे नेमणूक झाली.इथेही संबंध फारसे सौहार्दपूर्ण नव्हते.हळूहळू ही कटुता कमी करण्यात यश मिळत गेले. ईजिप्त चे राष्ट्रपती सीसी यांना 26 जानेवारी या महत्त्वाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले. लगेच जून मधे पंतप्रधान नरेंद्र मोदी ईजिप्त भेटीवर गेले.त्यावेळी मोदींनी पाठ थोपटून गुप्ते यांचे कौतुक केले. संरक्षण मंत्री,तिन्ही दलांचे प्रमुख,अनेक महत्वाचे मंत्री यांनी इजिप्तला या ३ वर्षात भेटी दिल्या त्याचे श्रेय गुप्ते यांना जाते.

## इराणसाठी हेरगिरी केल्याप्रकरणी 7 इस्रायलींना अटक

### यामध्ये एका सैनिकाचा समावेश; हिजबुल्लाहने या माहितीवरुन केले होते हल्ले



**वृत्तसंस्था**
**तेल अवीव**

इराणसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपावरून इस्रायलमध्ये 7 इस्रायली नागरिकांना अटक करण्यात आली आहे. टाइम्स ऑफ इस्रायलच्या वृत्तानुसार, त्यांच्यावर दोन वर्षे इराणसाठी हेरगिरी करण्याचा आणि त्यांच्यासाठी शेकडो जॉब केल्याचा आरोप आहे.

इस्रायल पोलिसांच्या प्रवक्त्याने सांगितले की ही सर्वात गंभीर प्रकरणांपैकी एक आहे. यासाठी त्यांना फाशीची शिक्षा होऊ शकते. हे सर्व आरोपी हैफा किंवा उत्तर इस्रायलचे रहिवासी आहेत. यामध्ये काही वर्षांपूर्वी लष्करातून पळून गेलेल्या एका सैनिकाचा समावेश आहे. याशिवाय 16 ते 17 वर्षे वयोगटातील दोन अल्पवयीन मुलांचाही आरोपींमध्ये समावेश आहे. त्यांची ओळख उघड झालेली नाही.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, त्यांनी दोन वर्षांत सुमारे 600 टास्क पूर्ण केल्या. त्यांचे म्हणणे आहे की, आरोपी पैशाच्या लोभापोटी इराणसाठी गुप्तचर माहिती गोळा करत होते. त्यांनी इराणला इस्रायलचे लष्करी तळ आणि अण्वस्त्रे आणि दारूगोळा यांची माहिती दिली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे इराणने इस्रायलमध्येही अनेक ठिकाणी हल्ले केले.

आयर्न डोम आणि अणुऊर्जा प्रकल्पाची माहिती गोळा केली संशयितांवर तेल अवीव आणि नेवाटीम आणि रमत डेव्हिड विमानतळावरील संरक्षण मुख्यालयासह आयएफडी तळांवर छायाचित्रे काढण्याचा आणि माहिती गोळा केल्याचा आरोप आहे. हिजबुल्लाह आणि इराणने या ठिकाणी हल्ले केले आहेत. इराणने 1 ऑक्टोबर रोजी नेवाटीम तळावर दोन क्षेपणास्त्रे डागली होती. तसेच हिजबुल्लाहने रमत दाऊदवर हल्ला केला आहे.

इस्रायली चॅनल 12 च्या वृत्तानुसार, एकदा संशयितांनी फुग्यातून गॅलीलीतील लष्करी तळाच्या ठिकाणांची छायाचित्रे घेतली होती. सुमारे एक महिन्यानंतर, ऑक्टोबरच्या सुरुवातीला या जागेवर हिजबुल्लाहने क्षेपणास्त्र हल्ला केला होता. पोलिसांनी सांगितले की, आरोपींनी आयर्न डोम, बंदरे, हवाई दल, नौदल आणि हेडेरा पॉवर प्लांट यांसारख्या ठिकाणांची माहितीदेखील गोळा केली होती. इस्रायलच्या अंतर्गत सुरक्षा एजन्सीच्या अधिकाऱ्याने सांगितले की, आम्ही आरोपींनी इराणी एजंट्ससाठी गोळा केलेल्या वस्तू जप्त केल्या आहेत. यामध्ये फोटो आणि व्हिडिओंचा समावेश आहे.